**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**कोल्हापूरी चप्पल घालून जे.डब्ल्यू. मॅरियट या हॉटेलमध्ये प्रवेश करणाऱ्या मराठी चित्रपट कलाकारांना परवानगी नाकारल्याबाबत**

**(१) * ३७७०२ डॉ. निलम गोऱ्हे, श्री. किसनचंद तनवाणी , श्री. मधुकर चव्हाण, श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १४ डिसेंबर, २००७ रोजी वा त्या सुमारास मुंबईतील जे.डब्ल्यू. मॅरियट यांनी त्यांच्या पबमध्ये मराठी चित्रपट कलावंताना प्रवेश नाकारण्याचा दिनांक १५ डिसेंबर, २००७ महाराष्ट्र टाईम्स आदि वृत्तपत्रात आलेल्या वृत्ताकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रात राहून मुंबईत व्यवसाय करून मराठी कलाकारांना सदर पंचतारांकित आपल्या पबमध्ये प्रवेश नाकारण्याच्या कारणांचा शासनाने शोध घेतला आहे काय,

(३) असल्यास, मराठी सिनेकलाकारांना सदर हॉटेलने प्रवेश नाकारण्याची काही कारणे आहेत काय, असल्यास, ती कोणती,

(४) असल्यास, आपापल्या पंचतारांकित हॉटेलमध्ये प्रवेश बंदीबाबत शासनाचे अथवा पंचतारांकित हॉटेलचे शासनमान्य नियम आहेत काय ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय, तथापि सदर वृत्त हे दिनांक १६.१२.२००७ रोजीच्या महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात आले आहे.

(२) व (३) जेडब्ल्यु मॅरियट या हॉटेलमध्ये मराठी चित्रपट कलावंतांना प्रवेश नाकारण्यात आला नाही.

(४) नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हयातील कोल्हापूरी चपलेपुरताच मर्यादीत प्रश्न नाही. कोल्हापूर, सांगली व संपूर्ण महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या दृष्टीकोनातून त्यांची वेशभूषा आणि पेहराव याबाबतचे हे वैशिष्टय आहे. याबाबतीत काही हॉटेल्सच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

ता.प्र.क्र. 37702....

डॉ. नीलम गोऱ्हे....

व्यवस्थापनाने काही नियम केले असतील. त्या काळात केलेले नियम आणि प्रत्यक्ष होत असलेली अंमलबजावणी यामुळे वेगवेगळया प्रकारे स्थानिक वेशभूषा, स्थानिक पेहराव करणाऱ्यांबाबत जे.डब्लू.मॅरियट या हॉटेलच्या व्यवस्थापनाच्या वर्तनामधून अनादराची भावना दिसून येते. ही घटना या हॉटेलमध्ये घडल्यानंतर जे.डब्लू. मॅरियट हॉटेलच्या व्यवस्थापनाने माफी पत्र कामगार सेनेच्या आणि विद्यार्थी सेनेच्या कार्यकर्त्यांना लिहून दिले. असे असतांना याठिकाणी शासनाने दिलेले उत्तर अयोग्य आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, "होय, तथापि सदर वृत्त हे दिनांक 16.12.2007 रोजीच्या महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात आले आहे" तसेच, पुढे असेही म्हटले आहे की "या हॉटेलमध्ये मराठी चित्रपट कलावंतांना प्रवेश नाकारण्यात आला नाही". याबाबतीत या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. जे.डब्लू.मॅरियट या हॉटेलच्या व्यवस्थापनाने या हॉटेलमध्ये कोल्हापूरी चप्पल घालून कलावंतांनी किंवा सामान्य माणसांनी प्रवेश केला तर आम्ही कोणतेही निर्बंध आणणार नाही असे शासनाला लेखी लिहून दिले आहे काय? हा केवळ जे.डब्लू. मॅरियट या हॉटेलपुरता मर्यादीत प्रश्न नसून मुंबईतील सर्वच पंचतारांकित किंवा सामान्य हॉटेलमध्ये प्रवेश करीत असतांना सामान्य माणूस स्थानिक वेशभूषा करुन आणि कोल्हापूरी चप्पल घालून जात असेल तर त्याला अडविले जाणार नाही याबाबत कोणत्या प्रकारची दक्षता हे शासन घेणार आहे? हा प्रश्न एका घटनेचा नसून या निमित्ताने हॉटेल व्यवस्थापनाकडून जी वर्चस्वाची भावना, अपमानित करण्याची भावना दिसून येते याची गांभीर्याने नोंद घेतली पाहिजे. त्या दृष्टीने आपण लेखी उत्तरामध्ये सुधारणा करावी आणि या हॉटेलच्या व्यवस्थापनाला काय सूचना दिल्या आहेत त्या सांगाव्यात. तुमच्या आमच्यासारखे लोक कोल्हापूरी चप्पल घालून हॉटेलमध्ये जाणे आणि इतर लोकांनी जाणे यामध्ये फरक आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, हॉटेलमध्ये चप्पल घालून प्रवेश करण्यास कुणालाही विरोध करण्यात आलेला नाही. परंतु त्या हॉटेलच्या डिस्को पबमध्ये जायचे असेल तर बूट घालून गेले पाहिजे. हॉटेलच्या व्यवस्थापनाने त्या कलाकारांना बूट देऊ केले होते परंतु त्यांनी ते नाकारले. पबमध्ये भारतीय पेहराव करुन जाण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. पबमध्ये लोक नाचण्याकरिता जातात. नाचतांना जर दुसऱ्याच्या पायावर पाय पडला किंवा तेथील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

ता.प्र.क्र. 37702....

श्री. आर. आर. पाटील.....

टाईल्सवरुन चप्पल घसरली तर कदाचित इजा होऊ शकते अशाप्रकारे हॉटेलने लिहून दिले. त्यांनी हॉटेलमध्ये प्रवेश नाकारला नव्हता. त्यांनी फक्त पबमध्ये जातांना बूट घालून जावे अशी अट घातली होती. कलाकारांच्या पायामध्ये बूट नव्हते म्हणून हॉटेलने त्यांना बूट प्रोव्हाईड केले होते. कलाकारांनी बूट घालण्यास नकार दिला म्हणून त्यांना पबमध्ये जाऊ दिले नाही. याबाबत कलाकारांनी पोलिसांकडे तक्रार केली नाही. आणि हा विषय आम्हाला वाढवावयाचा नाही अशी कलाकारांनी भूमिका घेती. यासंबंधी हॉटेलच्या मॅनेजरचा जबाब घेतला असता त्याने जबाबात सांगितले की, पब मध्ये नाचत असतांना पाय घसरणे किंवा दुसऱ्याच्या पायावर पाय पडला तर इजा होण्याची शक्यता असते. तेव्हा पबमध्ये चप्पल न घालता बूट घालून जावे कां? याबद्दल शासनाने अजून अभ्यास केलेला नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37702 . . . .

श्री.आर.आर.पाटील . . . .

चप्पल घालून पब मध्ये गेल्यानंतर त्यामध्ये सुरक्षितता राहील काय ? याचाही शासन अभ्यास करील आणि त्यानंतर याबाबतीत काही निर्णय घ्यावयाचा असेल तर तो घेईल. समजा जर बूट घातलेल्या एखाद्या माणसाचा पाय, दुसऱ्या माणसाच्या पायावर पडला आणि त्यावेळी जर त्या माणसाने चप्पल घातलेली असेल तर मग त्याच्या पायाला इजा होण्याची शक्यता आहे. म्हणून आम्ही दोन्ही बाजूने याबाबतीत अभ्यास करु.

**उपसभापती** : माननीय गृहमंत्र्यांनी फार चांगले उत्तर दिले आहे. पण पब मध्ये चप्पल घालून गेल्यानंतर जर पायावर पाय पडला तर इजा होईल अशी भीती वाटते. पण आपण तर आयुष्यभर चप्पल घालीत आहात. आपण कधीही बूट घातल्याचे मी पाहिलेले नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्यामुळेच मला पबमध्ये जाता येत नाही.

**उपसभापती** : एकदा तुम्ही आणि मी चप्पल घालून पबमध्ये जाऊ आणि मग काय होते ते पाहू.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पबमध्ये दोन पुरुषांच्या जोडीने जाणे अपेक्षित नाही.

**उपसभापती** : आपल्याला सर्व माहिती आहे. पण तरी आपण माहिती घेऊन सभागृहामध्ये देतो असे सांगून सभागृहाची दिशाभूल करीत आहात.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ज्याप्रमाणे परदेशामध्ये कॅसिनोमध्ये, डिस्को थेक मध्ये जाण्यासाठी विशिष्ट पेहराव लागतो. तशा प्रकारे पंचतारांकित हॉटेलमध्ये जाण्यासाठी नियमावली केली आहे का ? किंवा डिस्को थेकमध्ये जावयाचे असेल तर विशिष्ट प्रकारचा पेहराव करावयास पाहिजे अशा प्रकारची नियमावली केली आहे का ? अशी नियमावली शासनाने केली नसेल परंतु पंचतारांकित हॉटेलवाल्यांनी केली आहे का ? याबाबतीत माहिती असेल तर ती देण्यात यावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पंचतारांकित हॉटेल मॅनेजमेंटनी अशा प्रकारचे नियम केले आहेत की, 21 वर्षाखालील व्यक्तींना याठिकाणी प्रवेश मिळणार नाही. तसेच पब मध्ये येताना दोघांनी आले पाहिजे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याठिकाणी हा प्रश्न विचारण्यामागील उद्देश ....

. . . .बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काय आहे, याची माहिती प्रश्नकर्त्यांनी दिलेली आहे. हा उद्देश विचारात न घेता, माननीय गृहमंत्र्यांनी याठिकाणी जे उत्तर दिलेले आहे, ते फक्त घडलेल्या प्रकारावर सारवण घालण्यासारखे आहे. "सारवण" हा कोकणातील शब्द आहे. पब असतील किंवा जेडब्ल्यु मॅरियट हॉटेल असो, ही हॉटेल्स् महाराष्ट्रात आहेत, या देशामध्ये आहेत. पबमध्ये जावयाचे असेल तर त्यासाठी काही विशिष्ट असे नियम आहेत आणि याची जाणीव तेथे येणाऱ्या लोकांना प्रथम दिली पाहिजे ही कल्पना सर्वश्रुत आहे. कारखान्यामध्ये काम करताना कोणते नियम पाळले पाहिजेत याबद्दलच्या स्टॅण्डींग ऑर्डर तेथे लावलेल्या असतात. त्यानुसार जर पबमध्ये जावयाचे असेल तर यासंबंधातील स्टॅण्डींग ऑर्डर, सूचना बाहेर लावलेल्या असतील तर आपण तेथे जावयाचे की नाही हे लोक ठरवतील.परंतु महाराष्ट्राचे शासन म्हणून आपला गृह विभाग या गोष्टींकडे कशा प्रकारे लक्ष ठेवणार आहे? एखाद्याने कोल्हापूरी चप्पल घातलेली आहे म्हणून त्याला प्रवेश नाही, एखाद्या साधा माणसाने बूट घातले नाहीत म्हणून त्याला प्रवेश नाही अशी कारणे देऊन त्यांना पबमध्ये प्रवेश नाकारणे हे "अतिथी देवो भव" या भावनेला अनुसरुन कितपत योग्य आहे ? पब मध्ये गेल्यानंतर काय करावयाचे हे अतिथी आणि मालक या दोघांनी मिळून ठरवावयाचे असते. परंतु याबाबतीत शासन काही काळजी घेणार आहे काय ? अशा घटनेची पुनरावृत्ती मुंबई शहरामध्ये किंवा अन्यत्र होऊ नये यासाठी शासन काही पावले उचलणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्यांनी पबच्या बाहेर स्पष्टपणे सूचना लावलेल्या आहेत. त्यामध्ये म्हटल्याप्रमाणे डिस्को थेक मध्ये येताना पायात बूट असणे आवश्यक आहे. तसेच तेथे येणाऱ्या व्यक्ती 21 वर्षावरील असणे आवश्यक आहे आणि दोन व्यक्तींची जोडी असणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या सूचना बाहेर लावलेल्या आहेत आणि बाहेर सूचना . . . .

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, शासनाने या सूचना सर्टीफाय केलेल्या आहेत काय ? या सूचनांना स्टॅण्डींग ॲप्रुव्हल दिलेले आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी येणाऱ्या लोकांनी कोणत्या पेहरावामध्ये यावे यासंबंधीच्या कोणत्याही अटी आजतरी या हॉटेल्स्नां लायसन्स देताना घालत नाही. याबाबतीत आपल्या अटी नाहीत. परंतु हॉटेल मॅनेजमेंटनी त्यांची जी नियमावली तयार केलेली ....

. . . .बी-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

आहे, त्यासंबंधीचे सूचना फलक बाहेर लावण्यात आले आहेत. चप्पल घालून पबमध्ये जावयाचे की नाही ? कारण चप्पल ही महाराष्ट्राची अस्मिता आहे. पबमध्ये चप्पल घालून गेल्यानंतर आणि आपल्यामध्ये जर स्किल्ड असेल तर नाच करावयास हरकत नाही. पण शक्यतो पबमध्ये चप्पल घालून काय जाऊ नये ? तर पब मध्ये येणारे लोक बहुतांशी मद्यधुंद असतात आणि नाच करतात. अशा वेळी पायामध्ये चप्पल घातली असेल आणि जर दुसऱ्या व्यक्तीचा पायावर पाय पडला किंवा ......

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37702 ....... श्री. आर. आर. पाटील .....

चप्पल घालून घसरुन जमिनीवर पडून इजा होऊ शकते म्हणून सुरक्षिततेच्या ....

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

ॲड. अनिल परब : अशा प्रकारची जी नियमावली हॉटेलने बनवलेली आहे त्याला शासन मान्यता देणार आहे काय ? कारण हॉटेल स्वतःच्या मर्जीप्रमाणे कोणत्याही प्रकारचे नियम बनवू शकते. ते कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने बसतात की नाही हे पाहून आणि त्यात ते बसवून शासनाने त्याला मान्यता द्यावी. अशी नियमावली मान्य न करणाऱ्या हॉटेलवर शासन कारवाई करणार काय ?

श्री. आर. आर. पाटील : कोणतीही सूचना देण्यापूर्वी हॉटेलने केलेले नियम सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य आहेत की नाही हे शासनाला तपासावे लागेल. चप्पल घालताना ती घसरते काय, कोणाच्या पायावर पाय पडतो काय याची आम्ही माहिती घेऊ.

**उपसभापती** : यामध्ये एक काम करावे. आपण आता जी सूचना केली त्याबाबत सांगू इच्छितो की, शासनाला अभ्यास करण्यास फारसा वेळ नाही. त्यामुळे येथीलच एक अभ्यास समिती नेमावी आणि ते येत्या एक आठवड्यात अहवाल देतील. आपल्याला मंजूर आहे काय ?

ॲड. अनिल परब : मंजूर आहे.

श्री. आर. आर. पाटील : ठीक आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

**बांधकाम व्यावसायिक राजेंद्र चतुर्वेदी यांना हत्येच्या कट रचण्याच्या खोट्या आरोपाखाली अटक केल्याबाबत**

**(२) * ३७५१३ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , डॉ. निलम गोऱ्हे , डॉ. दिपक सावंत , श्री. अरविंद सावंत , श्री. दिवाकर रावते , श्री. सुरेश जेथलिया , श्री. किसनचंद तनवाणी :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांधकाम व्यावसायिक राजेंद्र चतुर्वेदी यांना विजय ग्रुपच्या रश्मीकांत शहा यांच्या हत्येचा कट रचण्याच्या आरोपावरून जुहू पोलीसांनी अटक केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलीसांकडे सबळ पुरावा नसल्याने न्यायालयाने चतुर्वेदी यांना जामिनावर मुक्त केले असता चतुर्वेदी यांनी पोलीसांनी आपल्यावर खोटे आरोप करुन गोवले असून या प्रकरणाची सीआयडी चौकशी करण्याची मागणी केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सीआयडी चौकशी करण्यात आली असता वरिष्ठांच्या दबावामुळे आपण चतुर्वेदी यांच्यावर गुन्हा नोंदविला अशी कबुली जुहू पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाने दिली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सीआयडी चौकशी पूर्ण झाली असून एफआयआर दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सीआयडी चौकशीत कोणत्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नावे घेण्यात आली व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१), (२) व (३) होय.

(४) सदर गुन्ह्याच्या प्रकरणाची सीआयडी चौकशी सुरु आहे.

(५) सीआयडीच्या आतापर्यंतच्या चौकशीत श्री.बिपीन बिहारी (भापोसे) या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नाव उघडकीस आले असून त्यांच्याविरुद्ध कारवाई शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हे प्रकरण इतके भयानक आहे की, त्या ठिकाणी चोर सोडून सन्याशाला पकडण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. ज्या चतुर्वेदी प्रकरणामध्ये 13 अधिकाऱ्यांना आपण सस्पेंड केले आहे त्यामधील मुख्य सूत्रधार बाहेरच आहेत. या प्रकरणामध्ये श्री. बोरुलकर नावाचे गव्हर्नमेंट प्लिडर आणि प्रोसिक्युटर आहेत त्यांनी सी.आय.डी.च्या अधीक्षकांना 21 जानेवारीला एक पत्र लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "I have perused the statements of Shri. Pradeep Shinde, Sr.P.I. of Juhu Police Station, Mumbai, Shri Balasaheb Gade-P.I.,Shri Nagare API. These persons are best witnesses in the case who have helped the investigation to

...3...

ता. प्र. क्र. 37513 ....... श्री. मधुकर चव्हाण .....

reveal the truth and those persons should be treated as star witnesses. Their complicity in the action of their superior is only because of the pressure exerted by their superiors. Their actions are nothing more than the execution of order passed by the Superior Officers. They have time and again protested against the illegal orders issued by the superior officers to the concern higher authorities. Their conduct shows that they have no part of the conspiracy to commit the offence. No material is disclosed against them which warrants them to categories them as an accused. पुढचे वाक्य अतिशय महत्वाचे आहे असे मला वाटते. On the other hand, their disclosure will help the Investigating Officers getting conviction of the persons who have hatched the conspiracy and committed this offence." हा एक मुद्दा आहे. त्याच्या नंतर त्या ठिकाणी श्री. एस. पी. एस. यादव, अप्पर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग यांनी सी.आय.डी. संबंधी कोर्टात सादर केलेले जे पेपर्स आहेत ते अतिशय महत्वाचे आहेत आणि यापेक्षाही भयानक आहेत. यामधील जे मुख्य सूत्रधार श्री. पटनाईक आहेत त्यांना चौकशी करुन सोडून दिले. त्यांनी 8 फेब्रुवारीला रिपोर्ट दिला आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, परिशिष्ट "अ" मधील कसूरदार 13 पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करण्यात यावे. विशेषकरुन क्रमांक 1 ते 9 यांना निलंबित करण्यात यावे व क्रमांक 10 ते 13 यांच्यावर इतरांच्या तुलनेने सौम्य कारवाई करण्याची शिफारस आहे. कारण राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून करण्यात आलेल्या तपासात अनुक्रमांक 10 ते 13 मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी तपासी अधिकाऱ्यांला सत्य परिस्थिती सांगून मदत केलेली आहे व पुरावा गोळा करण्यास ( त्यांच्या स्वत:च्या विरुध्दही ) राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या तपासी अधिकाऱ्यांना मदत केलेली आहे. त्या व्यतिरिक्त ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी कसुरी केल्याचे निष्पन्न झाले आहे त्यांची यादी व कसुरी बाबतचे तक्ते परिशिष्ट "ब" आणि परिशिष्ट "क" प्रमाणे स्वतंत्र जोडलेले आहेत. सभापती महोदय, पुढचे वाक्य महत्वाचे आहे.

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

ता. प्र. क्र. 37513 ....... श्री. मधुकर चव्हाण .....

श्री. यादव असे लिहीत आहेत की, श्री. बिपिन बिहारी यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तपासात तसे निष्पन्न झाल्यास संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुध्द पुढील कायदेशीर कारवाई होण्याबाबत त्याचा कसुरी अहवाल सादर करण्याची तजवीज ठेवलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/ श्री.बरवडनंतर 13:15

ता.प्र.क्र.37513.... श्री.मधुकर चव्हाण.....

सभापती महोदय, माझे यासंबंधी तीन प्रश्न आहेत. या प्रकरणातील सूत्रधारापैकी श्री.दिलीप पालांडे, ए.पी.आय.हे एक आहेत. त्यांची पोस्टींग काळा चौकी पोलीस स्टेशनला झ ाालेली आहे. डी.एन.नगर पोलीस स्टेशनला ते प्रतिनियुक्तीवर आहेत. परंतु चौकशी करण्यासाठी ते जुहू पोलीस स्टेशनला जातात. त्याचे कारण काय ? पोलीस आयुक्त श्री.जाधव, सहआयुक्त श्री.पटनाईक, कायदा व सुव्यवस्था, यांचा क्राईमशी काही संबंध नाही. ॲडिशनल सी.पी. श्री.बिहारी, डी.सी.पी., झोन-3 श्री.चौबे, ए.सी.पी., श्री.आवटे आणि सिनियर पी.आय. त्यावेळी सिनियर यांनी सांगितले की, यांच्या विरोधामध्ये कोणत्याही प्रकारचा गुन्हा नाही,एफ.आय.आर.मध्ये माहिती नाही, आरोपींनी त्यांच्या नावाचा उल्लेख केलेला नाही, ज्यांना पकडलेले आहे त्यांची माहिती नाही, फिर्याददाराची माहिती नाही, त्यामुळे मी कशासाठी ॲरेस्ट करु ? त्यावेळी सगळयांसमोर श्री.पटनाईक यांनी असे म्हटले की, श्री.रश्मी शहा यांना बोलवा. त्यांच्या तोंडी स्टेटमेंटमध्ये श्री.चतुर्वेदी यांचे नाव टाका. असे बोलून त्यांना तेथे अटक करण्यास भाग पाडले, काय चालले आहे ? त्यांना अटक करण्याचे कारण काय आणि जे घडले ते सत्य आहे काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, श्री.पटनाईक यांच्याकडे कायदा व सुव्यवस्था आहे, त्यांचा क्राईमशी काही संबंध नाही. मग असे त्यादिवशी काय घडले होते ? ते बॉम्बे स्फोटातील आरोपी होते काय ? पोलीस अधिकारी याप्रकरणात सहभागी होते हे एक संकटच आहे, त्याबद्दल शंका नाही. It is concerned with the particular person not with the society in the larger interest. दिनांक 14 तारखेला तेथे काय घडले ? कायदा व सुव्यवस्थेचे सहआयुक्त श्री.पटनाईक यांचा क्राईमशी संबंध नसताना त्यांनी तेथे जाण्याचे कारण काय ? म्हणून माझी सरकारला विनंती आहे की, श्री.पटनाईक यांना दीर्घ रजेवर पाठवून त्यांना त्वरीत निलंबित करुन चौकशी केली जाईल काय ? तसेच ज्यांचा उल्लेख श्री.यादव यांनी केलेला आहे आणि श्री.बोरुलकर यांनी क्रमांक 10 ते 13 वरील लोक निरपराध आहेत असे लिहिले आहे, त्यांना पुन्हा कामावर घेणार काय, वाटल्यास त्यांच्याविरुध्द डी.इ.सुरु करावी आणि त्यात ते गुन्हेगार असल्याचे सिध्द झाल्यास त्यांना शिक्षा करणार काय ?

2.....



NTK/ MMP/ KGS/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणातील काही तपास अधिकारी मला सुध्दा भेटले होते, परंतु ते उशिरा भेटले होते. ते या सगळयांना अटक केल्यानंतर भेटले होते. सभापती महोदय, सरकारने घेतलेल्या ॲक्शन्स बघितल्यानंतर कोणत्याही चुकीला पाठीशी घालण्याची भूमिका मी कधीही घेतलेली नाही. या प्रकरणामध्ये एवढया लोकांना निलंबित केल्यानंतर सरकारची भूमिका तीच आहे हे यातून स्पष्ट होते. माननीय सदस्य क्रमांक 9 ते 13 वरील लोकांबद्दल बोलत आहेत. सी.आय.डी.कडून आलेल्या अहवालातील पहिला परिच्छेदही त्यांनी वाचला आहे. या परिच्छेदात असे नमूद केले आहे की, ' क्र.1 ते 13 वरील लोकांना निलंबित करावे, पुढे असे म्हटले आहे की, या लोकांना सौम्य शिक्षा द्यावी.' नियमामध्ये निलंबन ही शिक्षा नाही. तो चौकशीचा भाग आहे. चौकशीत व्यत्यय येऊ नये म्हणून संबंधितांना निलंबित केले जाते. सी.आय.डी.च्या अहवालातील पहिल्या स्टेटमेंटप्रमाणे कोणालाही पाठीशी न घालता सरकारने या तेराच्या तेरा लोकांना निलंबित केलेले आहे. त्यामध्ये आय.पी.एस.अधिका-यांना दयामाया दाखविलेली नाही, हे सर्व लोक निलंबित आहेत. हा संपूर्ण परिच्छेद वाचल्यानंतर सरकारने सी.आय.डी.ला पुन्हा विचारले आहे की, तुम्ही या 13 लोकांसंबंधी आमच्याकडे जो अहवाल दिलेला आहे तो विसंगत आहे आणि जर त्यात विरोधाभास असेल तर स्पष्ट अभिप्राय, कारणासह शासनाला कळवावेत. सभापती महोदय, या लोकांना निलंबित केल्यानंतर दुस-याच दिवशी सी.आय.डी.कडून हा अहवाल सरकारने मागविला आहे. जर सी.आय.डी.ने असा स्पष्ट खुलासा केला की, या या लोकांवर कारवाई करण्याची आवश्यकता नाही तर या लोकांचे निलंबन रद्द होऊ शकते. परंतु ते अहवालावर अवलंबून आहे. याप्रकरणी ॲडिशनल सी.पी.ला सुध्दा निलंबित करण्यास शासनाने मागेपुढे पाहिलेले नाही. चौकशीमध्ये काहीही निष्पन्न झाले तर सरकारची हीच भूमिका राहील. परंतु चौकशी होण्यापूर्वी आपण कोणताही निष्कर्ष काढणे बरोबर नाही. ही गोष्ट कबूल करीन की, काही वेळा पोलिसांकडून गॅंगस्टर्सच्या लढाया लढल्या गेल्या. इतिहास आणि वस्तुस्थिती कोणालाही बदलता येणार नाही, मीही तो बदलण्याचा प्रयत्न करणार नाही. एक गोष्ट या सदनाला आणि आपल्या सगळयांमार्फत पोलीस दलाला संदेश देऊ इच्छितो की, पोलिसांना बिल्डरच्या लढाया मी मुळीच लढू देणार नाही. वरिष्ठातील वरिष्ठी अधिकारी असोत किंवा कनिष्ठ अधिकारी असू देत. जे चुकीचे वागतील ते पोलीस दलामध्ये राहणार नाहीत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : याठिकाणी माननीय गृहमंत्र्यांनी रेफरन्स वाचून दाखविला. त्यांनी त्यामधील पहिलेच वाक्य वाचले. दुसरे वाक्य जे पहिल्या वाक्याशी संबंधित आहे ते त्यांनी वाचलेले नाही. या दोन्ही वाक्यामध्ये कुठेही स्वल्पविराम किंवा पूर्णविराम नाही. पुढे असे लिहिलेले आहे की, विशेषकरुन 1 ते 9 निलंबित करण्यात यावेत व 10 ते 13वर इतरांच्या तुलनेत सौम्य कारवाई करावी. हे वाक्य वाचण्याचे माननीय गृहमंत्र्यांनी का टाळले ? हे स्टार विटनेसेस आहेत आणि त्यांना तुम्ही जेलमध्ये घातलेत. त्यांना शिक्षा झाल्यानंतर ते आमची साक्ष चुकीची आहे असे सांगून ते उद्या कोर्टात बाजू फिरवतील. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, पटनाईक यांना रजेवर पाठवा. तिघांचे निलंबन त्वरित मागे घ्यावे. वाटल्यास या तिघांची डी.ई. करा.

श्री. आर.आर.पाटील : सभागृहाने देखील संयम राखयला पाहिजे. एखादी बाब न्यायप्रविष्ट असेल तर त्यावर चर्चा करता येत नाही. सी.आय.डी. तपास चालू आहे. आपण या ठिकाणी जी वक्तव्ये करतो त्याचा परिणाम चौकशीवर होण्याची शक्यता असते. मी सभागृहाला आश्वासन दिलेले आहे की, ज्या दिवशी सी.आय.डी.निष्कर्ष काढील त्या दिवशी जे कोणी दोषी सापडतील त्यांच्यावर कारवाई करण्याची भूमिका शासनामार्फत घेतली जाईल कोणालाही पाठिशी घालण्यात येणार नाही. सी.आय.डी. शासनाच्या वर नाही. ज्या लोकांना सस्पेण्ड केले त्यांनी तर वरिष्ठांची चुकीचे आदेश का मानले हा प्रश्न शिल्लक राहातो. उद्या कोणीही काही करील आणि वरिष्ठांच्या सूचनेचे पालन केले असे म्हणेल. म्हणून शासनाचे स्पष्ट धोरण असे आहे की, बेकायदेशीर आदेश असतील तर त्याचे कनिष्ठ कर्मचा-याने पालन करावयाचे नाही, बेकायदेशीर कृती करायची नाही असे असताना यांनी तसे का केले असा प्रश्न निर्माण होतो. या प्रकरणी सी.आय.डी. चौकशी होईपर्यन्त सभागृहाने संमय राखला पाहिजे. मी सभागृहाला आश्वासन देऊ इच्छितो की, कोणत्याही अधिका-यावर अयोग्य कारवाई होणार नाही. तसेच कोणीही चूक केली असेल तर त्याला सोडण्याची भूमिका शासन घेणार नाही.

ॲड.अनिल परब : पोलिसांच्या गँगवॉरचा हा विषय आहे. या प्रकरणी जे स्टार विटनेसेस आहेत त्यांच्यावरच कारवाई झालेली आहे. माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, चुकीचे आदेश मानायचे नाहीत असे शासकीय परिपत्रक आहे. असे आदेश न मानता काम करु शकेल असा एक

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तरी अधिकारी माननीय गृहमंत्र्यांनी दाखवावा. बिपीन बिहारी पर्यन्त कारवाई केलेली आहे. हा खटला न्यायप्रविष्ट नाही. बी-समरी केसचा तपास चालू आहे. अद्यापपर्यन्त कोर्टामध्ये प्रकरण गेलेले नाही. तेव्हा ज्या अधिका-यांना जेलमध्ये घातलेले आहे त्या सर्व अधिका-यांना त्यांची चौकशी होईपर्यन्त बाहेर ठेवून आणि रजेवर पाठवून वरिष्ठ अधिका-यांची चौकशी करणार आहात काय ? यामध्ये प्रमुख रोल पटनाईक यांचा आहे. त्यांच्या आदेशानुसार पुढची सर्व कारवाई झालेली आहे असे सर्व कागदपत्रावरुन दिसते. तेव्हा त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवून या प्रकरणी चौकशी करणार आहात काय ?

श्री. आर.आर.पाटील : या सर्व प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी सुरु आहे. चौकशी अधिका-याचे निष्कर्ष येऊ द्यावेत. चौकशी अधिका-यांचे निष्कर्ष आल्या बरोबर ज्या कारवाया करणे आवश्यक असतील त्या सर्व कारवाया केल्या जातील. चौकशीमध्ये जे निर्दोष असतील त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न नाही. जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 1.25

ता. प्र. क्र. 37513....

श्री. विनोद तावडे : माननीय सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये स्थगन प्रस्ताव दिला होता. हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले की, वरिष्ठांचे आदेश जर चुकीचे असतील तर मानावयाचे नाही असे परिपत्रक आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, पोलीस आयुक्त हे अतिरिक्त पोलीस आयुक्तांच्या कार्यालयात गेले ही गोष्ट इतिहासात पहिल्यांदा घडली. सह पोलीस आयुक्त श्री.अरुप पटनायक, अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री.बिपीन बिहारी, पोलीस उपायुक्त हे सगळे समोर बसतात. बुलाव, डालो, असे झाल्यानंतर सुध्दा यांनी अटक केली नाही तर डी.एन.नगरचे 25 पोलीस अधिकारी बाहेर उभे होते. तुम्ही त्यास उचलले नाही तर आम्ही त्यास उचलणार असे सांगत होते. अशी परिस्थिती असताना तुम्ही कशी अपेक्षा करता ? शासनाला खरोखरच पोलिसांचे मनोबल वाढवावयाचे असेल तर या प्रकरणाच्या बाबतीत सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. मी राजकीय चर्चेत जाऊ इच्छित नाही. तो संयम मी पाळतो आहे. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, हे प्रकरण सगळयात अगोदर आपणास मी सांगितले होते. त्यानंतर हे प्रकरण मी सभागृहात उपस्थित केले होते. ज्यावेळी श्री. चतुर्वेदी जेलमध्ये होते त्यावेळी हे प्रकरण मी उपस्थित केले होते. हे प्रकरण अतिशय सिरिसय आहे. विकासक आणि पोलीस अधिकारी एकत्र आले तर मुंबई शहराची वाट लागेल. या प्रकरणाचा सिरियसनेस पाहून मी संयम पाळला आणि हे प्रकरण खाजगी भेटीत सांगितले. त्या भेटीच्या अनुषंगाने काही कार्यवाही झाली नाही म्हणून हे प्रकरण सभागृहात उपस्थित करण्यात आले. आपल्याला जर श्री. अरुप पटनायक आणि श्री. बिपीन बिहारी यांना आपल्याला सोडवयाचे असेल तर या चौघाना जेलमध्ये टाका. त्याबाबतीत आमचे काही म्हणणे नाही. परंतु आम्हाला सांगा की, या अधिका-यांना आम्हाला सोडवावयाचे आहे. त्यानंतर आम्ही या प्रकरणासंदर्भात राजकीय भाष्य करु. माझी नम्र विनंती आहे की, एका वरिष्ठ पोलीस अधिका-यांने ही सगळी घटना सी.आय.डी. समोर सांगितली. त्यात त्यांनी श्री. अरुप पटनायक यांचा सहभाग कसा आहे ही देखील माहिती सी.आय.डी. समोर सांगितली. अशी परिस्थिती असताना हे प्रकरण केवळ श्री. बिपीन बिहारी यांच्यापर्यंतच येऊन का थांबले ? सदर प्रकरण पुढेपर्यंत का आले नाही? श्रीृ अरुप पटनायक हे सेवेत राहून जर अडथळा उत्पन्न करणार नसतील, तर हे साधे इन्स्पेक्टर आणि पोलीस सब इन्स्पेक्टर चौकशी कसे करतील. माननीय उप मुख्यमंत्री महोदय, या ठिकाणी

2...

ता. प्र. क्र. 37513....

श्री. विनोद तावडे...

जी लॉजिकल माहिती देत आहात ही माहिती आम्हाला लॉजिकल वाटत नाही. म्हणून माझी मागणी आहे की, श्री. अरुप पटनायक यांचे विरुध्द ताबडतोबीने कारवाई झाली पाहिजे. त्या शिवाय या प्रकरणाच्या मुळाशी सरकार जाऊ शकत नाही. म्हणून श्री. अरुप पटनायक यांचे विरुध्द तातडीने कारवाई करण्यात येईल काय ? माननीय उपमुख्य महोदय हे या ठिकाणी वारंवार सांगता आहेत की, या चार अधिका-यांना केवळ निलंबीत केले आहे. ते चौकशी दरम्यान अडथळा करतील म्हणून त्यांना निलंबीत केले आहे. त्यांच्या चौकशीमुळे हे प्रकरण उभे राहिले असे एस.पी.एस.यादव आणि पोलीस प्रोसीक्यूटर म्हणतात. सगळे म्हणतात. ते कशाला अथळला आणतील. त्यांनी एखाद्या अधिका-यासमोर साक्ष दिली तर ती साक्ष फिरविता येते. ती साक्ष फिरविता येऊ नये म्हणून यांनी ही साक्ष मेट्रोपोलिटन मॅजिस्टेट समोर जाऊन दिली. नंतर दबाव आल्यानंतर साक्ष फिरवावी लागू नये म्हणून त्यांनी मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेट यांचे समोर साक्ष दिली. अशा व्यक्ती चौकशीत अडथळा कशा आणू शकतील ? या बाबतीत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी माहिती सदनाला द्यावी. आपल्याला हे प्रकरण सोडवावयाचे आहे की नाही ? या प्रकरणाची आपणाला लिखापोथी करावयाची आहे ? यासंबंधीची माहिती माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सदनाला द्यावी.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, एवढया गंभीर प्रकरणामध्ये शासनाने कधी ॲक्शन घेतली असेल असे मला वाटत नाही. अनेक वेळा सी.आय.डी.चे आणि ए.सी.बी.चे रिपोर्ट येतात. धूळ खात पडतात. पण इतक्या गतीने सी.आय.डी.ची माहिती शब्दश: खरी मानून या प्रकरणी शासनाने संबंधितांवर सस्पेन्शची कारवाई केलेली आहे. या ठिकाणी काही वरिष्ठ अधिका-यांची नावे घेतली जात आहेत. या प्रकरणी सी.आय.डी.ला तपासामध्ये काही प्रुफ जर आढळले तर निश्चितपणाने संबंधित दोषी अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यात येईल. सी.आय.डी. या प्रकरणी प्रामाणिकपणे तपास करण्याचे काम करीत आहे. सी.आय.डी. यांचेकडून अहवाल प्राप्त होताच जी कारवाई करणे आवश्यक असेल ती निश्चितपणे करण्यात येईल. या प्रकरणी चार कर्मचा-यांच्या सस्पेन्शच्या बाबतीत सहानुभूतीने यावे असे सी.आय.डी. यांनी सुचविले आहे. यासंदर्भात सी.आय.डी. यांचे स्पष्ट अभिप्राय मागितले आहेत. एका आठवडयात ते अभिप्राय प्राप्त

3...



ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 1.25

ता. प्र. क्र. 37513....

श्री. आर.आर. पाटील...

होतील असे अपेक्षित आहे. अभिप्राय आल्यानंतर शासनाला मदत करणा-या आणि कायद्याचे पालन करणा-या अधिकारी आणि कर्मचा-यांच्या बाबतीत शासनाचे धोरण सहानुभूतीचेच आहे. सी.आय.डी.ने ज्यांच्या बाबतीत स्पष्ट अहवाल दिला आहे, त्या संबंधितांना सस्पेंड केलेले आहे. या प्रकरणाची चौकशी सुरु आहे. चौकशीत दोषी आढळून आले तर कोणालाही पाठिशी घातले जाणार नाही.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या प्रकरणी अधिका-यांनी चुकीचे आदेश का पाळले ? या अधिका-यांनी आणखी काय करावयास पाहिजे होते याबाबतीत मला माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगावे. दिनांक 16 मार्च, 2007 ला या अधिका-यांनी स्टेशन डायरी केली. त्या डायरीमध्ये त्यांनी असे लिहिले की, गु.र.क्र.19/07,भारतीय दंडविधान संहिता कलम 120 (ब),सह कलम 302,315 ग्रा.ह.का.कायदा कलम 3, 25,27 सह मु.पो.कायदा कलम 37 (ए) मधील अटक आरोपी यांना महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायदा लावण्यात यावा. माननीय अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,यांच्याकडून सदर बाबत विचारणा करण्यात आली. तेंव्हा सदर गुन्हयात गुन्हा लावण्या इतपत सबळ पुरावा गोळा झालेला नाही असे सविस्तर सांगण्यात आले. माननीय अपर पोलीस आयुक्त, पश्चिम विभाग, हे संबंधित गुन्हयात वर नमूद कायदा का लावत नाहीत याबाबतीत जबरदस्ती करीत आहेत. सदर वरील कायदा लावण्याबाबत माननीय उपायुक्त, परिमंडळ-9, यांना सुध्दा सदर आरोपीस संबंधित कायदा लावण्या इतपत सबळ पुरावा नाही हे समजावून सांगण्यात आले आहे व तशी नोंद डायरीमध्ये केलेली आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37513 पुढे सुरु .....

श्री. अरविंद सावंत ...

सभापती महोदय, आणखी काय करावयाला पाहिजे ? हे प्रकरणे वाटते तेवढे साधे नाही. श्री. अरुप पटनायक पडद्याआड राहून काम करीत आहेत. सीआयडी चौकशीमध्ये जे काय होईल त्यानुसार कारवाई करु असे असे माननीय उपमुख्यमंत्री महोदय सांगत आहेत. सीआयडी चौकशीमध्ये त्यांचा उल्लेख केलेला आहे. Govt. Pleader ने आपल्या अहवालात असे म्हटले आहे की, "Their actions are nothing more than the execution of order passed by the Superior Officers. They have time and again protested against the illegal orders issued by the superior officers to the concerned higher authorities. Their conduct shows that they have no part of the conspiracy to commit the offence. No material is disclosed against them which warrants them to categories them as an accused. On the other hand, their disclosure will help the Investigating Officers getting conviction of the persons who have hatched the conspiracy and committed this offence."

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांपर्यंत अहवाल आला कसा ? माहितीच्या अधिकारात आला काय याचा शासनाला तपास करावा लागेल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माहितीच्या अधिकारात आला.

श्री. आर.आर.पाटील : माहितीच्या अधिकारात अहवाल कधी घेतला ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सामान्य अधिकाऱ्यांचा बळी द्यावयाचा आणि बडया अधिकाऱ्यांना वाचवायचे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, श्री. अरुप पटनायक काय कोणीही असेल आणि कितीही वरिष्ठ असला तरी माननीय सदस्यांच्या सांगण्यावरुन ना कोणाला सस्पेंड करणार ना क कोणाला सहानुभूती दाखविली जाणार. मेरीटवर जे कोणी दोषी असतील आणि ज्यांच्या विरोधात पुरावे आढळून येतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल. ज्या प्रकरणाचा तपास सुरु आहे आणि शासनाकडे अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही त्यांच्या बाबतीत सस्पेंड करण्याची मागणी मान्य करण्याची अपेक्षा कशी केली जाते ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्याचे नांव आले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37513....

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, केवळ नांव येणे पुरेसे नाही. चौकशी पूर्ण व्हावी लागते. शासन कुणालाही वाचवत नाही आणि कुणाविरुध्द सूडाने वागत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, जे रेकॉर्ड माननीय सदस्यांनी सभागृहात वाचून दाखविले ते अधिकृत आहे किंवा नाही हे कसे काय विचारले जाते ?

**उपसभापती** : जो अहवाल गोपनीय होता तो माननीय सदस्यांपर्यंत कसा आला याची विचारणा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केली ते सयुक्तिक आहे. याठिकाणी एक प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे ....

यानंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 13:35

**उपसभापती**......... ता.प्र.क्र.37513....

ज्याप्रमाणे आपण याठिकाणी सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारला, तसा प्रश्न गृह विभागाच्या संदर्भात अनेक प्रकरणांमध्ये निर्माण होऊ शकतो. समजा राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून अशी एखादी बाब आपल्या निदर्शनास आणली की, समजा माझ्या संदर्भातील चौकशी असेल आणि त्या चौकशीचा अहवाल मी सादर केला, कारण गृह विभागाकडे सिक्रेट रेकॉर्ड असते. सिक्रेट डॉक्यूमेंट संबंधितांना उपलब्ध करुन दिले जात नाही. माहितीच्या अधिकारात देखील उपलब्ध करुन दिले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर जर माझ्या संदर्भात एखादे प्रकरण असेल आणि मी एखादा शासनाचा गोपनीय अहवाल आहे तो मी जर न्यायालयासमोर उद्‌धृत केला आणि त्या अहवालाचा जर एक्झिबीट म्हणून वापर केला, जी कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत शासनाच्या परवानगीशिवाय बाहेर जाऊ शकत नाहीत, एवढेच नव्हे तर ती कागदपत्रे बाहेर जाऊ देण्यास शासन परवानगी देऊ शकणार नाही अशा बाबतीत सबळ पुराव्यानिशी एखादे प्रकरण पुढे आले तर त्याबाबत कारवाई करणार आहात का? अशी गंभीर प्रकरणे बरीच आहेत. आपण अत्यंत प्रामाणिक हेतूने प्रश्न विचारला असला तरी सन्माननीय सदस्यांचा गैरसमज झाला असेल. परंतु आपला सद्‌हेतू आणि कार्यपध्दती लक्षात घेतल्यानंतर माझ्यासारख्या माणसाला हे मुद्दाम विचारावेसे वाटते की, जी सिक्रेट डॉक्यूमेंट आहेत, शासन कधीही कोणालाही कोर्टाच्या कामासाठी देऊ शकत नाही, कोर्टाने मागितली नसतील तर, कधीकधी कोर्टाकडून मागणी केली जाते त्यावेळी अशी कागदपत्रे दिली जातात, परंतु कोर्टाकडून मागणी केली गेली नसेल आणि शासनाची परवानगी न घेता जर अशा प्रकारची डॉक्यूमेंट्स कोर्टात उद्‌धृत केली असतील तर त्याबाबत शासन गंभीर दखल घेणार आहे का?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, निश्चितपणे घेतली जाईल. हे प्रकरण पहिल्या दिवसापासून शासनाने गंभीरपणे घेतले. या सदनामध्ये काही सन्माननीय सदस्यांनी खाजगीमध्ये भेटून सुध्दा तपासाबद्दल संशय व्यक्त केला होता. स्वत: शासनाने हे प्रकरण सीआयडीकडे दिले. लोकांच्या तक्रारीनुसार शासनाने गंभीरपणे दखल घेतली नसती तर स्वत:हून हे प्रकरण सीआयडीकडे देण्याची आवश्यकता नव्हती. ज्या अधिकाऱ्यांना निलंबीत करावे असे सीआयडीने कळविले त्यांना शासनाने निलंबीत केले. चार लोकांबद्दल सहानुभूतीने वागा असे सीआयडीने सांगितले. एका प्रकरणी निलंबीत करा असे आणि एका प्रकरणी सहानुभूतीने वागा असे सीआयडी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणते. यामध्ये विसंगती दिसून येते. म्हणून सीआयडीने स्पष्ट अभिप्राय द्यावेत. एक तर सर्वच लोकांना सस्पेंड करावे. चार लोकांबाबत का सहानुभूती दाखवावी याची कारणे द्यावीत. त्यांचा अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल. या प्रकरणात कोणाला वाचवायचा हेतू असता तर हे प्रकरण शासनाने सीआयडीकडे दिले नसते. त्यामुळे हेतू स्पष्ट आहे, तो म्हणजे सत्य बाहेर यावे. कोणीही पोलीस कर्मचाऱ्यांनी चुकीचे वागू नये, चुकीचे वागले तर शासन त्यांना पाठिशी घालत नाही हे यातून स्पष्ट होते. आतापर्यंत सीआयडीने चौकशी केली. माझी देखील त्यांच्याशी चर्चा झाली. आतापर्यंत जो तपास झाला, त्यामध्ये जे काही पुरावे सापडले त्यानुसार त्यांनी प्राथमिक अहवाल दिला. उर्वरित तपास चालू आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर उद्या आणखी कोणी दोषी आढळले तर मी इतकीच ग्वाही देईन, की कोणालाही पाठिशी घालण्याची भूमिका सरकारकडून घेतली जाणार नाही. जे चुकले ते घरी जातील.

श्री.विनोद तावडे : 164(बी) नुसार कोणी अधिकारी स्टेटमेंट देतो हे पुरेसे आहे. याचे महत्व सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना देखील माहित आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**उपसभापती** : या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी समर्पक उत्तर दिले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 164(बी) नुसार जे स्टेटमेंट दिले जाते ते कायद्याचा आधार घेऊन दिले जाते. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, प्राथमिक अहवाल आलेला आहे आणि श्री.अरुप पटनाईक हे दोषी आढळले आहेत. प्राथमिक अहवालानुसार जर श्री.अरुप पटनाईक दोषी असतील तर त्यांना सस्पेंड करण्यामध्ये कोणती अडचण आहे?

श्री.आर.आर.पाटील : दोषी पकडल्याचा निष्कर्ष अद्याप काढलेला नाही. शक्यता वर्तविली आहे. चौकशी सुरु असून चौकशीचा अहवाल आम्ही लवकरात लवकर मागवू.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37513.........

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, कलम 164 (ब) नुसार जे स्टेटमेंट दिलेले असते त्याला कायद्याचा आधर असतो, ते पुरेसे नाही काय ?

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. आर.आर.पाटील : या एकंदर प्रकरणाबद्दल शासनाला संशय होता म्हणूनच हे प्रकरण सीआयडीकडे दिले आहे. त्यांनी स्पष्टपणे या लोकांना निलंबित करतो म्हणून अहवाल दिलेला आहे आणि पुढच्या लोकांच्या बाबतीत काहीच दिलेले नाही. सीआयडीचा तसा अहवाल नसतांना आणि चौकशी चालू असतांना कुठल्या आधारावर निलंबित करणार ? तसेच विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य दबाव टाकून निलंबित करण्याचा आग्रह धरत असतील तर अशा प्रकारे दबावाखाली येऊन कोणत्याही प्रकारचा निर्णय शासन घेणार नाही.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपली जागा सोडून माननीय सभापतींच्या दालनासमोर येतात.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांतता राखावी.

श्री.आर.आर.पाटील : विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आग्रह धरतात त्यानुसार जर सीआयडीचा अहवाल प्राप्त झाला तर एका तासाच्या आत निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात येईल परंतु केवळ दबावाखाली कुठलाही निर्णय घेण्याची शासनाची भूमिका राहणार नाही.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.आर.आर.पाटील : केवळ शंका व्यक्त करण्याने अधिकारी सस्पेंड करायला लागले तर गृह विभाग चालविणेच अवघड होऊन जाईल. ज्यांच्या विरोधात पुरावे सापडले तसेच त्यांच्या संबंधीचा अहवाल आला म्हणून त्यांना सस्पेंड केले आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी सभागृहात चुकीची मागणी करु नये.

**उपसभापती** : वारंवार सांगूनही सन्माननीय सदस्य ऐकण्याच्या मन:स्थितीत दिसत नाही. म्हणून मी पुढील प्रश्न पुकारतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उपसभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नाही म्हणून मी सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करतो.

( दुपारी 1.43 ते 1.53 पर्यंत बैठक स्थगित झाली.)

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितनीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**ता.प्र.क्र. : 37513** .........

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सभापती महोदय, मला मूलभूत प्रश्न उपस्थित करावयाचा आहे. या विषयावर जी काही चर्चा झालेली आहे वा होत आहे त्यावर काय निर्णय होईल ते सभागृह बघून घेईल. या चर्चेच्या अनुषंगाने या सदनाचे नेते माननीय गृहमंत्री यानीं,

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 13.55

ता.प्र.क्र.37513.. श्री.सरपोतदार..

सर्व विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना असा प्रश्न सदनामध्ये विचारला होता की, ही माहिती तुम्हाला कोठून मिळाली होती ? या प्रश्नाचे त्यांनी उत्तर दिले आहे किंवा नाही हे मला माहीत नाही परंतु त्याचे उत्तर देण्याची काही आवश्यकता नाही. हें मला आपल्याला सांगावयाचे आहे. आपण जबाबदार गृह मंत्री आहात. आम्हाला कोठून माहिती मिळाली आहे हे सांगण्याचे आमच्यावर बंधन नाही. आम्ही या सदनाचे लोकप्रतिनिधी आहोत आणि लोकप्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रातील आणि देशातील कोणतीही माहिती गोळा करुन सदनामध्ये त्या संबंधीचा मुददा आम्ही उपस्थित करु शकतो . जर ही माहिती चुकीची निघाल्यास आपण त्याबाबतीत आपल्याला जे काही बोलावयाचे असेल ते बोलू शकता. परंतु जोपर्यंत आम्हाला मिळालेली माहिती आम्ही आपल्यासमोर मांडत आहोत आणि त्या माहितीच्या आधारे आम्ही आपल्याकडे कोणत्या तरी कारवाईची किंवा अन्य दुस-या कोणत्या तरी शिफारशीची मागणी करीत आहोत तोपर्यंत आपल्याला असा प्रश्न विचारता येत नाही हे मला सदनाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला जे काही अधिकार मिळालेले आहेत त्यातील हा एक मुलभूत अधिकार आहे.तेव्हा सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, येथे असलेल्या लोकप्रतिनिधींना ही माहिती आम्ही कोठून आणली आहे हा प्रश्न आपण कृपाकरुन भविष्य काळात विचारु नका. हा प्रश्न अत्यंत गैरलागू आहे. तेव्हा हे शब्द माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मागे घ्यावेत आणि अशा प्रकारची पुनरावृत्ती या सदनात होणार नाही याची दक्षता घ्यावी एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांच्या मताशी मी सहमत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, श्री.अरुप पटनायक यांच्या संबंधी आमचे असे म्हणणे आहे की, त्यांना निलंबित करण्यात यावे. या प्रकरणामध्ये चार जणांना निलंबित करण्यात आलेले आहे. त्यांनी वरिष्ठ अधिका-यांचे आदेश ऐकून कारवाई केलेली आहे, त्यांना जबरदस्तीने कारवाई करण्यास भाग पाडले आहे . तेव्हा 164 खाली ज्यांचे स्टेटमेन्ट झालेले आहे आणि सकृतदर्शनी जो अधिकारी दोषी आढळून आला आहे अशा अधिकाऱ्याच्याविरुध्द कारवाई करण्याची आम्ही मागणी करीत आहोत. त्या अधिकाऱ्याला निलंबित करण्यात यावे अशी आमची मागणी आहे. एखाद्या अधिकाऱ्याला निलंबित करणे ही काही शिक्षा होऊ शकत नाही. सी.आय.डी.च्या चौकशीत जर ते निर्दोष आढळून आले तर ते पुन्हा कामावर येऊ शकतात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेव्हा या अधिकाऱ्याला सस्पेन्ड करण्यात यावे अशी विरोधी पक्षाच्या वतीने आम्ही मागणी करीत आहोत. या मागणीला माननीय उप मुख्यमंत्र्यांनी होकर द्यावा अशी माझी त्याना विनंती आहे आणि हा विषय जास्त लांबवू नये अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे.

श्री.आर.आर. पाटील : सभापती महोदय, ज्या कर्मचाऱ्यांनी पुरावे गोळा करण्यासाठी आणि या तपास कामामध्ये मदत केलेली आहे आणि ज्यांच्या कडे सी.आय.डी.चा दृष्टीकोन सहानुभूतीने पहावा असा आहे त्यांच्या बाबतीत शासनाचा दृष्टीकोन देखील सहानुभूतीचाच राहील तसेच याबाबतीत लवकर निर्णय घेण्यात येईल. सभापती महोदय, सी.आय.डी.मार्फत जुलै महिन्यापासून ही चौकशी सुरु आहे. सी.आय.डी.ला असे निदेश देण्यात येतील की त्यांच्याकडे जी काही माहिती आलेली आहे त्या आधारे त्यानी अधिवेशन संपण्यापूर्वी निष्कर्षाप्रत यावे आणि अंतिम रिपोर्ट देऊन चौकशी पूर्ण करावी. अधिवेशन संपण्यापूर्वीच सी.आय.डी.ची चौकशी पूर्ण होईल आणि त्यामध्ये जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : एक तासाच्या आत कारवाई करण्यात येईल ना ?

श्री.आर.आर.पाटील : गृह मंत्री म्हणून सी.आय.डी.चा अहवाल माझ्या हातात आल्यानंतर एक तासाच्या आत कारवाई होईल.

श्री.मधुकर चव्हाण ( बसून ) : श्री.अरुप पटनायक दोषी असले तरी कारवाई करणार आहात ना ? .

श्री.आर.आर.पाटील : मी स्वत: असलो तरीही .

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## जळगाव व सांगली जिल्ह्यात बनावट नोटा छापून व्यवहारात आणणाऱ्या टोळीला अटक केल्याबाबत

**(३) * ३७४६९ श्री.दिलीपराव सोनवणे , श्री. रामनाथ मोते , श्री. वसंतराव खोटरे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. सुधाकर गणगणे , श्री. शरद रणपिसे , श्री. गोविंदराव आदिक , श्री.सय्यद जामा :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात बनावट नोटा छापून त्या व्यवहारात आणणारी टोळी व त्याचा सूत्रधार पालिसांच्या हाती लागला असून सदर टोळीसंदर्भात अहमदाबाद पोलीस (गुजरात राज्य) दलाने शोध घेतला आहे, तसेच सांगली येथील जूने स्टेशन चौकात दिनांक १ सप्टेंबर, २००७ रोजी वा त्यादरम्यान बनावट नोटा बाळगणाऱ्या तरुणाला अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील घटनांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने यासंदर्भात पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) होय.

(२) होय.

(३) गुजरात राज्यातील अहमदाबाद शहरातील शाहीबाग पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्याच्या चौकशीसाठी मुक्ताईनगर येथे राहणारा श्री.गणेश झांबरे, रा.मुक्ताईनगर यास चौकशीकामी गुजरात पोलीस गुजरात येथे घेऊन गेले आहेत, हे खरे आहे. या संदर्भातील गुन्हा गुजरात राज्यात नोंदण्यात आलेला असून गुजरात पोलीस तपास करीत आहेत. महाराष्ट्र पोलीसांकडून या बाबत कारवाई करण्याचा प्रश्न सध्या उद्‌भवत नाही.

सांगली येथे दि. १ सप्टेंबर, २००७ रोजी ५०० रुपयांची एक बनावट नोट आढळल्याने सखोल तपासाअंती सदर नोट कोणत्या बँकेतून अथवा व्यवहारातून आली याचा ठोस पुरावा उपलब्ध झाला नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी सांगली शहर पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आलेला गुन्हा गु.र.नं.१३६/०८ भादंविस ४८९ (ब) हा "अ" फायनल मंजूर होण्याकरीता दि. २६.१२.२००७ रोजी न्यायालयात अहवाल सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, जळगाव जिल्हयामध्ये बनावट नोटा छापणे आणि त्या व्यवहारात आणणे या गुन्हयासंबंधीचा त्या टोळीचा सूत्रधारसुध्दा गेल्या अनेक दिवसापूर्वी हाती लागलेला आहे. या प्रश्नाचे अपेक्षित उत्तर मला मिळालेले नाही. त्या टोळीचा सूत्रधार श्री. गेला काठेवाडी हा जळगाव जिल्हयात राहणारा असतांना त्यासबंधीची माहिती पोलीस यंत्रंणेला नाही. स्थानिक गुन्हा शाखेला या सबंधीची माहिती असूनही उत्तरामध्ये मात्र "काहीही माहिती नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे तेव्हा माझा असा प्रश्न आहे की, महाराष्ट्र पोलिसांनी या संदर्भात कोणती कारवाई केलेली आहे ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37469 ....

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, गुजराथमध्ये बनावट नोटा तयार करणारी आणि त्या मार्केटमध्ये आणणारी एक टोळी आढळून आली आणि त्याचा सगळा तपास करीत असताना तेथील पोलिसांना असे आढळून आले की, त्या टोळीतील एक आरोपी झांबरी हा जळगावचा आहे आणि तो त्या टोळीत कार्यरत होता. त्यामुळे गुजराथ पोलिसांनी महाराष्ट्र पोलिसांची मदत मागितली आणि आपल्या पोलिसांनी त्यांना तो माणूस पकडून दिलेला आहे.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

***

...... एल 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : **लेखी उत्तरे.**

**मु.शी.** : तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवणे.

विशेष कार्याधिकारी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 12 मार्च 2008 ची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उपसभापती** : दिनांक 12 मार्च 2008 ची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी. )

...... एल 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दि रेल्वे गुडस् क्लिअरींग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस् लेबर बोर्ड फॉर ग्रेटर बॉम्बेचा सन 2002-03, 2003-04, 2004-05 व 2005-06 चा अनुक्रमे सव्वीसावा, सत्ताविसावा, अठ्ठाविसावा व एकोणतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही जी कामगारांशी संबंधित मंडळे आहेत त्यांचे अहवाल आज 5-5, 10-10 वर्षांनी सभागृहासमोर सादर केले जात आहेत. 2002-03 वर्षाचा अहवाल आज येथे सादर होतो आहे. अशा प्रकारे अहवाल सभागृहासमोर ठेवण्यास विलंब का होतो आहे हे सभागृहाला समजले पाहिजे. आम्ही प्रत्येक अधिवेशनामध्ये हा मुद्दा उपस्थित करीत आहोत परंतु शासनाकडून, मंत्री महोदयांकडून त्याबाबत स्पष्टीकरण होत नाही. तेव्हा निदान आता तरी या विलंबाबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मैंने इसके बारे में कल ही स्पष्टीकरण दिया है. वर्ष 1995 से ये रिपोर्ट पेंडिंग हैं. लेकिन जब से यह आघाड़ी सरकार बनी है तब से हम इस संबंध में ध्यान दे रहे है. पिछले साल दो अधिवेशन से पूरे को-आपरेटिव्ह लाईन में ऑडिट सिस्टम शुरु करके उसे स्ट्रीमलाईन करने का प्रयास कर रहे हैं. मैं यह सारे बोर्ड के बारे में कह रहा हूं.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

***

एल -4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, केशवराव मानकर यांनी "नागपुरातील इंडोरामा कामगार गृहनिर्माण संस्था मर्यादित, बुटीबोरी या संस्थेला कामगार वसाहतीकरिता भूखंड मंजूर झाला असून सदर वसाहतीसाठी एम.आय.डी.सी.ने विविध सेवा पुरविण्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी "सहकार मित्र श्री.चंद्रकांत बढे अर्बन को.क्रेडिट शाखा, उल्हासनगर या पत संस्थेतील मुदत संपलेल्या सुमारे 2 कोटी 60 लाखाच्या ठेवी परत करण्यास संस्थेने नकार दिला असल्याने ठेवीदारांची झालेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "अचलपूर जिल्हा अमरावती येथील व्यापारी श्री.बजरंग मोतीलाल खंडेलवाल यांच्यावर दिनांक 3 मार्च 2008 रोजी सशस्त्र हल्ला झाल्याने त्यात त्यांचा झालेला मृत्यू." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी "भातसा धरणाची उंची वाढविल्यामुळे धरणाच्या पाणी साठ्यात वाढ होऊन धरणाच्या पाण्याच्या मागील बाजूची सर्व जमीन पाण्याखाली गेल्याने पूर्णपणे नापिक होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

एल - 5


KBS/KGS/MMP. श्री.गायकवाड नंतर --- 14.00
असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ....

सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, पाशा पटेल, जगदीश गुप्ता यांनी "गडचिरोली जिल्ह्यातील भगवानपूर नवीन सिंचाई तलाव कुरखेडा येथील कामास सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असतानाही त्यात एन.पी.व्ही. रकमेचा समावेश न करणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.अरविंद सावंत यांनी "दिनांक 13 मार्च 2008 रोजी जगप्रसिद्ध अजिंठा लेण्याच्या परिसरात भीषण आग लागून सुमारे 50 हेक्टर जंगल जळून भस्मसात होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी "10 वी च्या परीक्षेसाठी परीक्षा मंडळाने नियमित व रिपीटर विद्यार्थ्यांसाठी दोन स्वतंत्र वेळापत्रक तयार केल्यामुळे व इंग्रजी विषयाचा पेपर दोन वेगवेगळ्या तारखांना असल्याने या विद्यार्थ्यांमध्ये उडालेला गोंधळ." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, डॉ.दीपक सावंत यांनी "जिल्हाधिकाऱ्यांचे आक्षेप असतानाही अकोला महानगरपालिकेने शहरात बी.ओ.टी. तत्त्वावर वाणिज्य संकुलाची निर्मिती करणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "मुंबईतील पोद्दार व पेटिट या रूग्णालयांनी जैविक कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

...6..



**उपसभापती** ....

सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "राज्यातील 56 अशासकीय सामाजिक संस्थांच्या माध्यमातून राज्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नक्षलवादी कारवायांसाठी आर्थिक मदत मिळविली जात असून त्यांच्यावर कारवाई करण्यास पोलीस महानिरीक्षकांनी असमर्थता व्यक्त करणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर व श्री.विनोद तावडे यांनी "डी.एड.चा 1 वर्षाचा अभ्यासक्रम 2 वर्षांचा करून शासनाने दिनांक 1 फेब्रुवारी 2008 पासून विद्यार्थ्यांना 6 महिने इंटर्नशीप करण्याची केलेली सक्ती." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "अकोला जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गेडाम हे आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांना वारंवार मानसिक त्रास व इतर त्रास देत असल्याने त्यांच्या दडपशाहीकबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील व प्रा.शरद पाटील यांनी "अलिबाग, जिल्हा रायगड येथील जिल्हा कारागृहात खून प्रकरणी अटकेत असलेल्या प्रभाकर नाईक या व्यक्तीचा दिनांक 16 मार्च 2008 रोजी गूढरित्या झालेला मृत्यू." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख यांनी "वर्धा जिल्ह्यातील देवळी व सेलू तालुक्यात वीज वितरण कंपनीने वेळापत्रकात अचानक बदल करून वीजपुरवठा खंडित केल्यामुळे रब्बी पिकांचे झालेले नुकसान." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे. ....एम 1

**उपसभापती**...

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील, जैनुद्दीन जव्हेरी यांनी "मुंबई विद्यापीठाने जाहीर केलेले तृतीय वर्ष कला शाखेचे परीक्षा वेळापत्रक सदोष असणे, विद्यार्थ्यांनी 2 पेपर्स एकाच वेळी व एकाच तारखेला द्यावयाचा असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली. आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-----

नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनासंबंधी

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शुक्रवार दिनांक 14.3.2008 रोजी या सभागृहामध्ये नियम 93 च्या सूचनेवर आपण स्वत: उभे राहून कळव्याच्या खाडीसंबंधी माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांना सोमवारी म्हणजे आज निवेदन करण्याचे आदेश दिले होते. तथापि, शासनाकडून निवेदन करण्यात आलेले नाही.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, निवेदन आजही करता येईल. परंतु संपूर्ण माहिती घेऊन उद्या निवेदन करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सदरहू अनधिकृत बांधकामे पोलिसांची मदत घेऊन तोडण्याचे आपण आदेश दिले होते...

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांनी ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांशी चर्चा करुन त्यांना यासंबंधी त्वरीत कारवाई करण्यास सांगावे. कळव्याच्या खाडीमध्ये मोठया प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे. हे अतिक्रमण कायदा धाब्यावर बसवून झाले आहे. तेव्हा ते ताबडतोब काढले गेले पाहिजे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये वसई तालुक्यातील बारा वर्षाच्या मुलीवर बलात्कार झाला आहे. काल मी स्वत: त्याठिकाणी जाऊन त्या मुलीला भेटून आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

याबाबत अतिशय चुकीच्या पध्दतीने आणि घाणेरडा एफ.आय.आर. तेथील टिंगल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनी लिहिला आहे. यासंबंधी तेथील लोकांची तीव्र भावना आहे. आरोपी कोर्टामध्ये लपून बसला होता, तरीही पोलिसांनी त्याला पकडण्यात दिरंगाई केली. नियम 93 च्या निवेदनाअन्वये जर हा मुद्दा सदनासमोर आला तर त्या मुलीला संरक्षण मिळेल आणि एफ.आय. आर. दुरुस्त होईल. त्यादृष्टीने आपण शासनाला तात्काळ निवेदन करण्यास सांगावे.

**उपसभापती** : शासनाने दोन दिवसाच्या आत निवेदन करावे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 चे निवेदन क्रमांक एक संबंधी**

**उपसभापती** : नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनावर माननीय सदस्यांनी फक्त एकच प्रश्न विचारावा. त्यापेक्षा अधिक प्रश्न विचारु नयेत अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझ्या पहिल्या निवेदनावर उत्तर देण्याकरिता संबधित मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : संबंधित मंत्रिमहोदयांना सभागृहात उपस्थित रहाण्यास मी सूचना देतो. मंत्रिमहोदय सभागृहात आल्यानंतर आपले निवेदन पुन्हा चर्चेला घेण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांचे विविध कारणांनी झालेले मृत्यू

**मु.शी.**: मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांचे विविध कारणांनी झालेले मृत्यू याबाबत डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी "मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांचे विविध कारणांनी झालेले मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा असल्यामुळे मंत्रिमहोदयांनी याबाबत मुद्देसूद उत्तर द्यावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. या निवेदनामध्ये 1 एप्रिल 2007 ते सप्टेंबर 2007 या कालावधीत घन कचरा व्यवस्थापन खात्यातील 122 कामगार विविध कारणांनी मृत्यू पावल्याचे शासनाने कबूल केले आहे. या सफाई कामगारांचे मासिक सरासरी मृत्यूचे प्रमाण 20 येते. माझा पहिला प्रश्न असा आहे की, या ठिकाणी कर्मचाऱ्यांना मेडिक्लेमचा फायदा मिळावा यासंबंधीची सुविधा राज्य शासन त्यांना उपलब्ध करुन देणार आहे काय? तसेच, निवेदनामध्ये तिसऱ्या परिच्छेदात म्हटले आहे की, "सफाई कामगारांच्या औषधोपचारांसाठी महानगरपालिकेकडून रुग्णालयात रु.30,00,000/- इतकी रक्कम राखीव ठेवली असून सन 2008-2009 या वित्तीय वर्षाकरीता सर्व महापालिका रुग्णालयात रु.65,00,000/- ची तरतूद महानगरपालिकेकडून करण्यात आली आहे". ही अतिशय क्रूर आणि जीवघेणी चेष्टा आहे. या निधीचे प्रमाण आपण जर काढले तर प्रत्येक कामगारामागे रु.235 रुपये इतके येते. यानंतरचा प्रश्न असा आहे की, महानगरपालिकेच्या सफाई कामगारांची नियमित वैद्यकीय तपासणी संपूर्ण इन्व्हेस्टिगेशनसह करण्यात येणार आहे काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी नियम 93 च्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या दृष्टीकोनातून खरोखरच महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. याठिकाणी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्या बाबतीत मी ॲडीशनल माहिती सांगू इच्छितो की, हायकोर्टामध्ये एक पी.आय.एल. दाखल करण्यात आली होती. त्यानंतर हाय कोर्टाने एक कमिटी गठीत केलेली असून त्यामध्ये कामगारांचे प्रतिनिधी, ज्या एन.जी.ओ.यांनी पी.आय.एल. दाखल केली होती, त्यांचे प्रतिनिधी आणि कार्यकारी अभियंता इ.समावेश आहे. याबाबतीत महानगरपालिका कोणकोणती कामे करणार आहे याविषयी ॲडिशल कमिशनर,महानगरपालिका, यांनी ॲफीडेव्हीट करुन माहिती दिलेली आहे. तसेच माननीय उच्च न्यायालय सुध्दा या गोष्टींमध्ये लक्ष घालत आहे. सन्माननीय सदस्यांनी मेडिक्लेम इन्शुरन्स्च्या बाबतीत उपस्थित केलेला मुद्दा अतिशय चांगला आहे. महानगरपालिकेच्या आयुक्तांना या कामगारांच्या मेडिकल इन्शुरन्स्च्या विषयी सूचना दिल्या जातील आणि मेडिक्लेम इन्शुरन्स् करण्याच्या संबंधातील कार्यवाही तातडीने करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी 65 लाख रुपयांच्या तरतुदीबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. यामध्ये एक गोष्ट नक्की आहे की, याठिकाणी जे काम केले जाते, ते हाताने होऊ नये, तर मेकॅनिकली व्हावे. ही पध्दत देशात विकसित झाली असून, त्यादृष्टीकोनातून मुंबई महानगरपालिकेमध्ये देखील ती विकसित व्हावयास पाहिजे. त्यानुसार रस्त्यांची सफाई मेकॅनिकल पध्दतीने केली तर निश्चितपणे कामगारांच्या मृत्यूचे प्रमाण कमी होईल. या बाबीकडे सुध्दा निश्चित प्रकारे लक्ष दिले जाईल. तसेच या सदनातील सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन 65 लाख रुपयांची तरतूद वाढविण्याच्यादृष्टीने सूचना दिल्या जातील. सन्माननीय सदस्यांनी रेग्युलर मेडिकल तपासणीबाबत देखील उल्लेख केला आहे. मात्र तो त्यांच्या कार्यक्रमाचा एक भाग आहे. त्यामुळे रेग्युलर मेडिकल तपासणी केली जाते. परंतु आरोग्याच्या तपासणी संदर्भात अधिक जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून सुध्दा कार्यवाही केली जाते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कामगारांसाठी मेडिक्लेम इन्शुरन्स काढण्याच्या बाबतीत, 65 लाख रुपयांची तरतूद वाढविण्याच्या बाबतीत आणि नियमितपणे आरोग्याची तपासणी करण्याच्या बाबतीत जे तीन प्रश्न उपस्थित केले आहेत, त्यांच्या बाबतीत "होय"असेच उत्तर राहील.

-----

. . . .एन-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई विद्यापीठामध्ये वाणिज्य शाखेचा एम.फिल. अभ्यासक्रम नव्याने सुरु करणे

**मु. शी.** : मुंबई विद्यापीठामध्ये वाणिज्य शाखेचा एम.फिल. अभ्यासक्रम नव्याने सुरु करणे याबाबत सर्वश्री. रामनाथ मोते,संजय केळकर,प्रतापराव सोनवणे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, संजय केळकर,प्रतापराव सोनवणे यांनी "मुंबई विद्यापीठामध्ये वाणिज्य शखेचा एम.फिल.अभ्यासक्रम नव्याने सुरु करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते: सभापती महोदय, मुंबई विद्यापीठामध्ये गेल्या अनेक वर्षापासून वाणिज्य शाखेचा एम.फिल.अभ्यासक्रम बंद झाला होता. परंतु आता वाणिज्य शाखेचा एम.फिल.अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्याचा मुंबई विद्यापीठाने निर्णय घेतलेला आहे. यासंदर्भात 2007-2008 मध्ये विद्यापीठाने विभागाकडे हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी डिसेंबर 2006 मध्ये प्रस्ताव पाठविला होता.परंतु अद्यापि त्याला मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे 2007-2008 या शैक्षणिक वर्षामध्ये वाणिज्य शाखेचा एम.फिल.अभ्यासक्रम सुरु होऊ शकला नाही. आता 2008-2009 मध्ये हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनाने अजूनही कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही. म्हणून आपल्या माध्यमातून मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, सध्या सुरु असलेले अधिवेशन संपण्यापूर्वी मुंबई विद्यापीठामध्ये वाणिज्य शाखेचा एम.फिल.अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी परवानगी देण्याच्या बाबतीत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 2007-2008 मध्ये वाणिज्य शाखेचा एम. फिल. अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी केवळ हिंदुजा कॉलेज ऑफ कामर्सकडून मुंबई विद्यापीठाकडे अर्ज आला होता. एम. फिल. अभ्यासक्रमाची मागणी वाढल्यामुळे शासनाने ठरविले की, वाणिज्य शाखेचा एम.फिल.अभ्यासक्रम नव्याने सुरु करावयाचा आहे त्यासाठी संबंधित महाविद्यालयांना मान्यता देण्यापूर्वी एक कमिटी नेमण्यात यावी. त्यानुसार संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञाची समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये बोर्ड/विद्यापीठाचे प्रत्येकी एक असे एकूण 10 प्रतिनिधी आहेत. या कमिटीची शिफारस दहा दिवसामध्ये प्राप्त होईल. यावर्षी मुंबई विद्यापीठाकडे यासंदर्भात 11 प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. एक्सपर्ट कमिटीचा रिपोर्ट आल्यानंतर पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होईल, त्यावेळी परवानगी देऊ.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,तज्ज्ञ कमिटी गठीत करुन सहा महिने झाले आहेत. तेव्हा सध्या सुरु असलेले अधिवेशन संपण्यापूर्वी वाणिज्य शाखेचा एम.फिल.अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी परवानगी मिळणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यासंदर्भात तज्ज्ञ कमिटीला लवकर रिपोर्ट सादर करण्यास सांगितले आहे. यासंदर्भात जेवढे अर्ज आलेले आहेत, ते तपासून पुढच्या शैक्षणिक वर्षामध्ये आपण यासाठी लवकरात लवकर परवानगी देऊ.

-----

यानंतर श्री.बरवड . . . .



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या वर्षभरापासून होणारा अपुरा व अनियमित धान्य पुरवठा

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या वर्षभरापासून होणारा अपुरा व अनियमित धान्य पुरवठा याबाबत श्री परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बाबा सिद्दीकी ( अन्न व नागरीपुरवठा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या वर्षभरापासून होणारा अपुरा व अनियमित धान्य पुरवठा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये मत्स्य दुष्काळ निर्माण झालेला आहे. मालवण तालुक्यामध्ये धान्य दुकानांमध्ये महिलावर्ग सकाळी 5.00 वाजल्यापासून रांगा लावतात आणि धान्य न मिळाल्यामुळे त्यांनी 13 तारखेला जेलभरो आंदोलने केले व त्यात 300 लोकांना अटक झाली हे खरे आहे काय ? मालवणच्या तहसिलदारांनी 170 टन धान्याची मागणी नोंदवूनही फक्त 70 टन धान्याचा पुरवठा केला जातो. या ठिकाणी पूर्णपणे धान्य पुरवठा होत आहे असे जे सांगितले आहे ते खरे आहे काय ? माननीय मंत्रिमहोदयांनी धान्य दुकानदार धान्य उचलत नाहीत अशा प्रकारे जे सांगितले त्यानंतर धान्य दुकानदारांनी मागणी प्रमाणे धान्याचा पुरवठा मिळत नाही अशी कैफियत मांडली हे खरे आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : यह सही है कि जेल भरो आंदोलन हुआ था. जो धान्य वितरण हुआ था, उसके अन्तर्गत बीपीएल योजना में 7566 टन चावल और 3384 टन गेहूं का वितरण हुआ था और अंत्योदय योजना के अन्तर्गत 4170 टन चावल और 7125 टन गेहूं का वितरण हुआ था. मालवण तालुका में जो धान्य वितरण हुआ है, उसके बारे में जांच की जाएगी. अगर वहां पर धान्य की पूर्ति कम हुई होगी तो वह पूरी करेंगे. मैंने इस बात को नोट कर लिया है.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**नियम 93 च्या निवेदन क्रमांक 5 आणि 6 बाबत**

**उपसभापती** : नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने क्रमांक 5 आणि 6 माननीय मंत्रिमहोदय आता सभागृहात उपस्थित नसल्यामुळे उद्या घेण्यात येतील. यानंतर निवेदन क्रमांक 1 घेण्यात येईल.

....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : सहावा वेतन आयोग लागू करण्याची शासकीय कर्मचाऱ्यांची मागणी

**मु. शी.** : सहावा वेतन आयोग लागू करण्याची शासकीय कर्मचाऱ्यांची मागणी याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. सुनील देशमुख ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते यांनी "सहावा वेतन आयोग लागू करण्याची शासकीय कर्मचाऱ्यांची मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, यामध्ये महाराष्ट्राच्या इभ्रतीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आधी महाराष्ट्र राज्य हे देशातील अग्रणी राज्य म्हणून समजले जावयाचे या ठिकाणी नोकऱ्या मिळाव्यात म्हणून सर्व स्तरातील लोक महाराष्ट्र राज्य सरकारची नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असत. परंतु आता राज्यातील आय.ए.एस. अधिकारी राज्य सरकारची नोकरी सोडून जात आहेत. एम.एस.ई.बी.मध्ये इलेक्ट्रीकल इंजिनिअर्सच्या 320 जागा रिक्त आहेत. विद्युत मंडळाने तीनवेळा जाहिरात काढली पण एकानेही अर्ज केला नाही. अकाऊंटंटच्या पोस्ट आहेत. चांगले टॅलेंटेड असे जे विद्यार्थी आहेत ते महाराष्ट्र सरकारची नोकरी नको असे म्हणतात. याचे एक कारण असे आहे की, सहाव्या वेतन आयोगाच्या बाबतीत मार्केटमध्ये या पध्दतीच्या नोकऱ्यांना जो पगार मिळतो आणि महाराष्ट्र सरकारचा आजचा जो पगार आहे आणि ज्या जबाबदाऱ्या आहेत त्यामध्ये खूप तफावत आहे. याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि मंत्रिमडळ या प्रश्नाकडे किती बेपर्वाईने बघतात हे या निवेदनातून लक्षात येते. यामध्ये दोन स्पेसिफिक गोष्टी व्हावयास पाहिजेत. पाचव्या वेतन आयोगातील त्रुटी सहावा वेतन आयोग लागू होण्यापूर्वी दूर करावयास पाहिजे होत्या. अजूनही निवेदने, नियम 93 च्या सूचना देऊनही त्रुटी दूर झालेल्या नाहीत. सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भात राज्य कर्मचाऱ्यांच्या संघटनांशी जी बोलणी चालू आहे ती सुध्दा बेपर्वा पध्दतीने चालू आहे. त्यांनी केलेल्या मागण्या, या पध्दतीच्या कामाला कर्मचाऱ्यांना मिळत असेलला पगार तसेच सरकारी नोकरी असल्यामुळे त्यामध्ये असलेले वेगळ्या पध्दतीचे स्टेटस लक्षात घेता या त्रुटी दूर व्हावयास पाहिजे होत्या. सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी ज्या पध्दतीच्या मागण्या केल्या त्यावर मंत्रिमहोदयांनी त्यांच्याशी कधीही चर्चा केली नाही. सचिव स्तरावर चर्चा झाली. ती चर्चा सुध्दा हसतखेळत पध्दतीने, बेपर्वा पध्दतीने झाली. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरलेला आहे. महाराष्ट्र सरकार ते देण्याच्या मन:स्थितीमध्ये नाही. काहीही निर्णय घेण्याच्या मन:स्थितीमध्ये राज्य सरकार नाही. अशी परिस्थिती असल्यामुळे सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या बाबतीत आतापर्यंत मंत्रिमंडळ स्तरावर कर्मचारी संघटनेबरोबर एकही बैठक झालेली नाही. सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या बाबतीत कर्मचाऱ्यांनी ज्या मागण्या केल्या त्यानुसार शासनावर किती कोटी रुपयांचा भार येणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. श्रीकांत जोशी .....

याबाबतीत निश्चित धोरण ठरविण्याच्या मन:स्थितीत शासन आले आहे काय ? यादृष्टीकोनातून किती तारखेपर्यंत आणि कशा पध्दतीने कार्यवाही करण्याच्या मन:स्थितीत सरकार आहे ?

यानंतर श्री. खंदारे ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, केंद्र सरकारने त्यांच्या कर्मचा-यांसाठी सहावा वेतन आयोग गठित केलेला आहे. त्या आयोगाने अद्याप सरकारला अहवाल सादर केलेला नाही. 20 मार्च, 2008 रोजी अहवाल सादर होण्याची शक्यता आहे. तो अहवाल सादर झाल्यानंतर काही गोष्टी स्पष्ट होतील. आयोगाने केंद्र सरकारला 20 मार्च, 2008 ही डेडलाईन दिलेली आहे. त्यानंतर या सहाव्या वेतन आयोगासंबंधी राज्य सरकारला निर्णय घ्यावयाचा आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 1 बाबत</u>

**उपसभापती** : क्रमांक 1 वरील लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यासाठी माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नाहीत. मघाशी नियम 93 वरील निवेदनाच्या वेळी सुध्दा 2-3 संबंधित मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नव्हते. आता लक्षवेधी सूचना पुकारल्यानंतर माननीय शालेय शिक्षण मंत्री उपस्थित नाहीत. हे अत्यंत अयोग्य आहे. शासनाने यासंबंधी गांभीर्याने दखल घ्यावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. सभागृहामध्ये अनुपस्थित असलेल्या मंत्रिमहोदयांनी आपल्याला माहिती दिली आहे काय ? माहिती दिली नसेल तर ही कोणती शिस्त आहे ? हे कोणत्या संसदीय पध्दतीमध्ये बसते ? कृपया याचा आपण खुलासा करावा.

**उपसभापती** : दोन्ही मंत्रिमहोदयांनी मला इंटिमेशन दिलेली नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2.30 पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.21 ते 2.30 पर्यंत स्थगित झाली. )

-------

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ. शी.** : मराठवाडयातील शाळांमध्ये केंद्र पुरस्कृत मध्यान्ह भोजनाच्या योजनेचा उडालेला बोजवारा

**मु. शी.** : मराठवाडयातील शाळांमध्ये केन्द्र पुरस्कृत मध्यान्ह भोजनाच्या योजनेचा उडालेला बोजवारा यासंबंधी सर्वश्री सुरेश जेथलिया, गोपीकिसन बाजोरिया, डॉ.नीलम गो-हे सर्वश्री. परशुराम उपरकर व किशनचंद तनवाणी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"केंद्र शासन पुरस्कृत मराठवाड्यातील इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय मध्यान्ह भोजनाची व्यवस्था 1 जानेवारी 2008 पासून मराठवाड्यातील गंगाखेड, जिंतूर, मानवत, परभणी, पाथरी, पूर्णा, सेलू, सुरु करण्यात आल्याची शासनाने केलेली घोषणा, सदर मध्यान्ह भोजनासाठी तांदळाची मागणी करुनही अद्याप तांदूळ न पुरविल्याने शेकडो शाळा तांदळाच्या प्रतिक्षेत असणे, तेथील शाळांची सुमारे चार हजार क्विंटल तांदळाची मागणी असताना एक क्विंटलही तांदूळ अद्याप शासनाने न पुरविल्याने तांदळाविना मध्यान्ह भोजनाचा कार्यक्रम कागदावर राहिला असून हा कार्यक्रम राज्याच्या अन्य भागातही तांदळाअभावी राबविण्यात येत असलेली अडचण, सदर योजना ही केंद्र शासन पुरस्कृत असून त्यासाठी लागणारा कोट्यवधी रुपयांचा निधी राज्य शासनाकडे आलेला असून तांदूळ वेळेवर न पुरविल्याने सदर योजनेचा उडालेला बोजवारा, परिणामी विद्यार्थी व पालोकंमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता राज्यातील प्राथमिक शाळांना विशेषत: मराठाड्यातील शाळांना तात्काळ तांदूळ मिळण्याबाबत शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

श्री. सुरेश जेथलिया : सहावी ते आठवीच्या किती विद्यार्थ्यांनी मध्यान्ह भोजनाच्या योजनेचा लाभ घेतलेला आहे ? किती शाळांमध्ये ही योजना सुरु आहे ? या योजनेंतर्गत आतापर्यन्त किती निधी व तांदूळ केन्द्र शासनाकडून प्राप्त झालेला आहे ? निधीच्या वाटपाची सद्य:स्थिती काय आहे? परभणी जिल्ह्यातील वरिष्ठ अधिका-यांनी या योजनेच्या अंमलबजावणीची पाहणी केली आहे काय ? निवेदनामध्ये गोलमाल उत्तर दिलेले आहे. प्रत्यक्षात परभणी जिल्हयातील कोणत्याही शाळांमध्ये तांदळाचे वाटप झालेले नाही. तेव्हा या सर्व प्रश्नांना माननीय मंत्री महोदय सविस्तर उत्तर देतील काय ?

प्रा. वसंत पुरके : 4 लाख 9 हजार विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. प्रायोगिक तत्वावर ही योजना 10 जिल्ह्यामध्ये नव्याने सुरु करण्यात आली. पहिली ते पाचवी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू होती. या योजनेची व्याप्ती वाढवून ती सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना लागू करण्याचे ठराविले. परभणी जिल्हयातील 4 तालुक्यामध्ये तांदुळाचा वेळीच साठा उपलब्ध झाला नाही. बाकीच्या 7 जिल्ह्यामध्ये साठा उपलब्ध झाला. फेब्रुवारी महिन्यामध्ये ही योजना नियमितपणे सुरु झाली. जानेवारीमध्ये ही योजना कार्यान्वित झाली नाही. त्याबाबतीत चौकशी करुन दोषीवर कारवाई करण्यात येईल.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : जानेवारी पासून आतापर्यन्त या जिल्हयांमध्ये किती निधीचे वितरण करण्यात आले ? ही योजना आधी पहिली ते पाचवी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत होती. त्यानंतर योजनेची व्याप्ती वाढवून ती सहावी ते आठवी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आली. 16.1.2008 रोजी या योजनेसाठी 180 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. तेव्हा ही 180 कोटीची तरतूद पहिली ते पाचवी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्याच्या योजनेसाठी केलेली आहे. आता योजनेमध्ये सहावी ते आठवी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांचा समावेश केलेला असल्यामुळे 180 कोटी रु. तरतूद अपुरी पडेल. तेव्हा या योजनेसाठी 180 कोटी रु. पेक्षा जास्त तरतूद करण्यात येणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : मागणीनुसार निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. पाहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना राबविण्याच्या बाबतीत निधीची अडचण होती. निधी वितरणातील दोष दूर करण्यात आलेला आहे. निधी वेळेत मिळत नव्हता. किमान 1 महिना आधी

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. वसंत पुरके.....)

पैसे मिळतील अशी व्यवस्था केलेली आहे. निधी वेळेवर न मिळाल्यामुळे शिक्षकांना बदनामीला सामारे जावे लागते.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)**

... नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके....

आणि म्हणून या योजनेचे पैसे एक महिना तरी आधी मिळाले पाहिजेत. केंद्र सरकारचे पैसे आणि राज्य सरकारचे पैसे या योजनेसाठी आहेत. या योजनेसाठी केंद्र शासनाचे पैसे येतच राहतात. परंतु रिएम्बर्स केंव्हा ना केंव्हा होतच असेल तर मात्र राज्य सरकारने याची इन ॲडव्हान्स तरतूद करावी अशा प्रकारचा शासनाचा मानस आहे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : या योजनेसंदर्भातील किती निधी वितरीत करण्यात आला ? इयत्ता 6 वी ते इयत्ता 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देणार आहात. त्यामुळे या योजनेचा लाभ अतिरिक्त विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. या अतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी या योजनेचा लाभ देण्यासाठी शासन अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, शासनाच्या धोरणानुसार केंद्र शासनाचा दीड रुपया आणि राज्य शासनाचा पन्नास पैसे अशा प्रकारचा निधी उपलब्ध होतो. दिनांक 3.9.2007 मध्ये 157 कोटी रुपयांचा निधी वितरीत झाला आहे. 16..1.2008 मध्ये या योजनेसाठी 180 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेच्या धान्य वितरणाचा मूळ प्रश्न आहे. आपणाला विना मोबदला तांदूळ मिळतो. तो तांदूळ त्या त्या ठिकाणी उपलब्ध असला पाहिजे. हा निधी ठरल्याप्रमाणे 1 रुपया 50 पैसे अधिक 50 पैसे या असा योजनेसाठी उपलब्ध होतो.

**तालिका सभापती** ( श्री.अरविंद सावंत ) : सन्माननीय सदस्यांचा मूळ प्रश्न असा आहे की, ही योजना इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी होती. आता या योजनेचा लाभ इयत्ता 6 ते इयत्ता 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दिला जाणार आहे. त्यामुळे लाभ घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या वाढलेली आहे. पूर्वी या योजनेसाठी 180 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या वाढीव विद्यार्थ्यांसाठी किती तरतूद उपलब्ध करुन देण्यात येणार आहे ? या प्रश्नासंबंधीची सन्माननीय सदस्यांना माहिती हवी आहे.

प्रा.वसंत पुरके : यासाठी 7 कोटी 48 अतिरिक्त तरतूद मंत्रिमंडळाने केलेली आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, हा विद्यार्थ्यांना देण्यात येणारा मध्यान्ह भोजनाचा प्रश्न आहे. ही योजना आतापर्यंत इयत्ता पहिली ते इयत्ता पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी होती. आता इयत्ता सहावी ते इयत्ता आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना वाढविलेली आहे. या योजनेच्या बाबतीत या सभागृहात अनेक वेळा प्रश्न उपस्थित केला आहे. अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

योजनेचा लाभ दिला जातो आहे. ज्या विना अनुदानित शाळा आहेत. त्या शाळेत अनेक गोरगरिबांची मुले शिक्षण घेत आहेत. विना अनुदान शाळेतील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ अद्यापही दिला जात नाही. विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना देखील या योजनेचा लाभ देण्यात यावा म्हणून आम्ही दोन वर्षापासून सातत्याने मागणी करीत आहोत. विना अनुदानित विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू करणार आहोत असे माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर रेकॉर्डवर आलेले आहे. माननीय मंत्री महोदयांकडून यासंदर्भात फक्त आश्वासन मिळालेले आहे. ही योजना विना अनुदानित शाळासांठी लागू झालेली नाही. ही योजना विना अनुदान तत्वावरील शाळेतील विद्यार्थ्यांना निश्चितपणे लागू करण्यात येणार आहे काय ? तसेच यासंबंधीचा धोरणात्मक निर्णय शासन ताबडतोबीने घेणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, विना अनुदानित की कायम विना अनुदानित शाळांचा प्रश्न आहे?

श्री. जयंत प्र.पाटील : विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित अशा दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू करण्यात येईल असे माननीय मंत्र्यांनी जाहीर केलेले आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, ही केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. केंद्र सरकारच्या धोरणात्मक निर्णयानुसार विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू करण्यात आलेली नाही. यासंबंधीचा केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवू तसेच केंद्र शासनास कनव्हिन्स करु.

श्रीमती मंदाताई म्हात्रे : सभापती महोदय, ही अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना या सभागृहात उपस्थित करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी मघाशी प्रश्न उपस्थित केला होता की, या योजनेचे धान्य का उपलब्ध झाले नाही ? त्या प्रश्नास सन्माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, याबाबतीत चौकशी समिती नेमण्यात येईल. ही चौकशी समिती कधी नेमण्यात येईल ? इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार असून त्यासाठी 748 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेच्या धान्य वितरणामध्ये मोठया प्रमाणात गडबड होते. या योजनेत धान्य वितरणामध्ये अधिका-यांनी घोटाळे केले असतील, अनियमितता केली असेल या गोष्टींची तपासणी करण्यासाठी चौकशी समिती कधी नेमण्यात येईल ?

3...



ABG/ SBT/ KTG/ प्रथम श्री. शिगम 14:35

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सभागृह संपण्याच्या पूर्वी एक समिती गठीत केली जाईल.

श्री. श्रीकांत जोशी: सन्माननीय सदस्य श्री. जेथलिया यांनी ज्या उद्देशाने प्रश्न विचारला होता, तो उद्देश माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराने पूर्ण झालेला नाही. त्यांनी खंद व्यक्त केली केली की, या योजनेचा तांदूळ कुठेच दिसून येत नाही. ही योजना कागदावरच राबविण्यात येत आहे. या योजनेचा तांदूळ परभणी जिल्हयात पोहोचलेला नाही अशीही सन्माननीय सदस्यांनी सभागृहास माहिती दिली आहे. माझी यासंदर्भात अशी आहे की, नांदेड जिल्हयातील जिल्हाधिकारी यांनी एका एन.जी.ओ.मार्फत सर्व्हे केला होता. शाळेतील पटावर असलेली उपस्थिती आणि प्रत्यक्षातील उपस्थिती यामध्ये 42 टक्क्यांचा फरक आढळून आला आहे. एन.जी.ओ.ने यासंबंधात अहवाल सादर केलेला आहे. तेवढया विद्यार्थ्यांना लागणारा तांदूळ, त्यांना लागणारी खिचडी, या योजनेसाठी दिले जाणारे अनुदान गडप होत आहे. मराठवाडयातील पाच मागासलेल्या 2 लाख 48 हजार विद्यार्थ्यांसाठी ही योजना राबविली जात आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1 पुढे सुरु...

श्री.श्रीकांत जोशी...

सभापती महोदय, यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न आहे सदनाचे सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी सांगितल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना देण्यासाठी तांदूळच शिल्लक नाही. परभणी जिल्हयातील उदाहरण देण्यात आले.हा जिल्हा अतिमागासलेला आहे. केवळ पटावर विद्यार्थ्यांची संख्या दाखवून तांदूळ हडप केला जाईल. म्हणून याप्रकरणाची सखोल चौकशी शासन करणार आहे काय आणि या प्रकरणामध्ये घोटाळा केलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, येत्या चार दिवसात समितीचे गठन केले जाईल आणि हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भातील निर्णय जाहीर केला जाईल.

श्री. व्हि.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, ही योजना जानेवारीपासून सुरु झाली. जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्याचा तांदूळ दिलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. गडचिरोली जिल्हयाची माहिती माझ्याजवळ आहे. माझा प्रश्न असा आहे की, आता मार्च महिन्याचे तांदूळाचे जे वाटप होईल त्यामध्ये जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्याचा देखील शिल्लक तांदूळ दिला जाईल काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. या प्रश्नाची गंभीरता शासनाच्या लक्षात आल्यामुळे मी याआधीच कबूल केले आहे की, याप्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल. ही योजना नुकतीच सुरु करण्यात आली आहे. 29 डिसेंबर,2007 रोजी या योजनेचा जीआर काढण्यात आला. पुरवठा विभागाकडून क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आदेश मिळेपर्यंत विलंब झालेला आहे. परभणी जिल्हयातील 4 तालुक्यांना एक महिना मालच मिळाला नाही म्हणून यासंदर्भात कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

श्री. व्हि.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, जानेवारी आणि फेब्रुवारी या दोन महिन्यांचा जो तांदूळ मिळालेला नाही तो मार्च महिन्याचा तांदूळाचा पुरवठा करताना देण्यात येईल काय ? म्हणजे मार्च महिन्याचा अधिक मागील दोन महिन्यांचा शिल्लक असलेला तांदूळ असा एकूण 3 महिन्यांचा तांदूळाचा पुरवठा करण्यात येईल काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्याचा सुध्दा तांदूळ देणे आवश्यक आहे.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1 पुढे सुरु ...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना या योजनेमध्ये त्रुटी आहेत हे मान्य केले आहे. डिसेंबरच्या आदेशानुसार ही योजना जानेवारी 2008 पासून अस्तित्वात आली. पहिल्या दोन महिन्यातच या योजनेत घोटाळा झाला आणि त्यासाठी शासन चौकशी समिती सुध्दा नेमणार आहे ? गडचिरोली आणि परभणी जिल्हयांना तांदूळच मिळाला नाही असे याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितलेच आहे. अधिवेशनात प्रश्न उपस्थित झाला नसता तर पैसे खर्च झाले असते आणि विद्यार्थी मात्र या योजनेपासून वंचित राहिले असते. ज्या अधिकाऱ्यांनी या योजनेच्या अंमलबजावणी कसूर केली आहे त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, दोषींवर निश्चितच कारवाई करु. प्रायोगिक तत्वावर ही योजना राबविली जात आहे. परभणी जिल्हयाच्या 4/6 तालुक्यांमध्ये तांदूळ मिळाला नाही अशी तक्रार आहे. याबाबत चौकशी केली जाईल्.

प्रा.शरद पाटील : सभापतीमहोदय, माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्रिमहोदयांनी सांगितले की, विनाअनुदानित आणि कायम अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना ही योजना लागू करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला जाईल. माझा प्रश्न असा आहे की, केंद्र शासनाकडे हा प्रस्ताव केव्हा पाठविला जाईल ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, प्रस्ताव ऑलरेडी पाठविलेला आहे. अजून मान्यता मिळाली नाही. या प्रस्तावाचा पाठपुरावा शासनाकडून केला जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, 16 मे,2002 रोजी शासनाने जो जीआर काढला त्याच्या परिच्छेद 2 मध्ये या योजनेची अंमलबजावणी शाळेच्या व्यवस्थापनाकडे आहे असे म्हटले आहे. या योजनेवर नगरपालिकेचा कंट्रोल नसल्यामुळे खाजगी शाळातील मुलांना याचा फायदा मिळत नाही. म्हणून शासन जीआरमध्ये योग्य तो बदल करणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना तपासून निश्चितपणाने योग्य ती कारवाई केली जाईल.

------

नंतर श्री. भोगले



**पृ. शी.** : विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती या महाविद्यालयाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती.

**मु. शी.** : विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती या महाविद्यालयाच्या परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती यासंबंधी प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" अमरावती विभागातील सर्वात जुन्या व एकमेव अशा शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था या शासकीय महाविद्यालयाच्या परिसरातील रस्त्यांच्या पृष्ठभागाच्या डांबरीकरणाच्या नूतीकरणाच्या कामाकडे गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने दुर्लक्ष होणे, अमरावती महसूल विभागात 1923 साली स्थापन झालेल्या या शासकीय महाविद्यालयाच्या विस्तीर्ण परिसरातील 3575 मीटर लांबीच्या एकूण रस्त्यांची आज अत्यंत वाईट स्थिती असणे, त्यापैकी 740 मीटर लांबीचा भाग अतिप्रमाणात खराब झालेला असणे, याकडे क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे सातत्याने होत असलेले दुर्लक्ष, यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अमरावती विभागामध्ये जे 5 जिल्हे आहेत, त्या 5 जिल्हयातील हे एकमेव शासकीय महाविद्यालय आहे. सर्वात जूने, 1923 साली स्थापन झालेले, त्यावेळच्या मध्यप्रांतात सुरु झालेले हे एकमेव शासकीय महाविद्यालय असून अधिकाऱ्यांचे या महाविद्यालयाकडे दुर्लक्ष झालेले आहे. विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था हे नामवंत महाविद्यालय असून राज्याचे एक मुख्यमंत्री या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. राज्याचे एक मुख्य सचिव या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी होते. एका राज्याचे गव्हर्नर या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी होते. एक लेफ्टनंट गव्हर्नर या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी होते. अनेक मंत्री, अनेक खासदार, अनेक आमदार या महाविद्यालयातून बाहेर पडले. अनेक साहित्यिक, अनेक शास्त्रज्ञ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी होते. या महाविद्यालयातून शिक्षण घेतलेले शास्त्रज्ञ आज नासामध्ये कार्यरत आहेत. 8 वर्षे होऊनही या कॅम्पस्मध्ये करावयाच्या नूतनीकरणाच्या कामाला कोणी अधिकारी हात लावावयास तयार नाही. काही महिन्यापूर्वी अखिल भारतीय राष्ट्रीय स्वरुपाची तलवार क्रीडा स्पर्धा झाली. देशभरातून लोक या महाविद्यालयात आले होते. त्या कॅम्पस्मधील रस्ते पाहून हे झ ोपडपट्टीतील रस्ते याठिकाणी कसे आले असे त्यांनी उद्‌गार काढले होते. तेथील अधिकारी बहुतेक ग्रॅज्युएट असले पाहिजेत. या कामाकडे अक्षम्य अशा प्रकारचे दुर्लक्ष अधिकारी का करीत आहेत? मी जरुर माननीय मंत्रीमहोदयांना व राज्यमंत्री महोदयांना धन्यवाद देतो. त्यांनी या प्रश्नाला वाचा फोडली आहे. प्रश्न असा आहे की, 100-150 एकरामधील 4 हजार मीटर रस्त्याचे काम येत्या 15 दिवसात पूर्ण केले जाईल असे मंत्रीमहोदय ठामपणे सांगतील काय?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, हे काम मार्च अखेरपर्यंत पूर्ण केले जाईल. विशेष रस्ते निधीमधून 10 लाख रुपयांची तरतूद केली आहे. 1640 मीटर रस्त्याचे काम मार्च, 2008 च्या आत पूर्ण केले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सर्व रस्ते मिळून जवळजवळ 3500 ते 4000 मीटर इतके काम आहे. कॅम्पस्मधील या कामाचे तुकडे करु नयेत. अधिकाऱ्यांनी संकोच वाटण्यासारखी गोष्ट आहे. 8-8 वर्षे हात लावत नाहीत. 10 लाखाची तरतूद केली असली तरी त्या रक्कमेमध्ये हे काम पूर्ण होणार नाही. 4-5 लाख रुपये अधिक लागण्याची शक्यता आहे. 3575 मीटर असे निवेदनात म्हटले आहे. परंतु मार्चअखेर हे काम पूर्ण होईल का?

श्री.रविशेठ पाटील : निश्चितपणे मार्चच्या आत पूर्ण होईल.

-------

..3..



**पृ. शी.** : मुंबईतील टॅक्सी व ऑटोरिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविणे

**मु. शी.** : मुंबईतील टॅक्सी व ऑटोरिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविणे यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईत चालणाऱ्या टॅक्सी, ऑटोरिक्षांनी परिवहन विभागाकडून नेमून दिलेल्या छापील तक्त्याप्रमाणे भाडे न आकारता मनाप्रमाणे भाडे आकारणे, त्याचप्रमाणे गाडीमध्ये खोटे छापील भाडे तक्ते ठेवणे व त्यानुसार भाडे आकारणे, मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेने संबंधित टॅक्सी चालकांची परिवहन विभागाकडे तक्रार केली असता चालकांवर कोणतीही कारवाई न केल्यामुळे टॅक्सी व ऑटोरिक्षा चालकांची वाढलेली दंडेली, या संदर्भात परिवहन मंत्र्यांनी दिनांक 31 जुलै, 2007 पासून इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याची अधिसूचना शासनाने निर्गमित करणे, त्याचप्रमाणे हा नियम नवीन टॅक्सी व रिक्षांना त्वरित लागू होईल व जून्या टॅक्सी व रिक्षांना टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रॉनिक मीटर न लावण्यात आल्याने टॅक्सी व रिक्षावाल्यांकडून प्रवाशांची फसवणूक व छळ चालूच असणे, शासनाने अधिसूचना निर्गमित करुनही त्याची शासनाने अंमलबजावणी न करणे, त्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेली शासनाबद्दलची संतापाची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.धर्मरावबाबा आत्राम ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )





श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी 31 जुलै, 2005 रोजी या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा झाली त्यावेळी मंत्रीमहोदयांनी उत्तर असे दिले की, मुंबईतील 58 हजार टॅक्सी व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपनगरातील 1.4 लाख ऑटोरिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यासाठी 9 कंपन्यांनी तयारी दर्शविली असून त्या कंपन्यांच्या नावासंदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल. 31 जुलै, 2005 रोजी मंत्रीमहोदयांनी हे आश्वासन दिलेले आहे. परंतु दोन वर्षे होऊनही अद्याप ही माहिती पटलावर ठेवलेली नाही. 58 हजार टॅक्सी व 1.4 लाख रिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याचे काम सुरु करण्यात आले असे सांगूनही ते अद्याप अंमलात आलेले नाही. त्यानंतर 18 जुलै, 2006 रोजी पुन्हा लक्षवेधी सूचनेसंबंधी उत्तर देताना म्हटले होते की, टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याचे काम ताबडतोब हाती घेणार आहोत. मात्र हे काम पूर्ण होण्यासाठी 2 वर्षे लागतील. नियम 137 मध्ये दुरुस्ती करावी लागेल. दुसरे उत्तर असे दिले की, एका महिन्याच्या आत नियम लागू करण्यात येईल. नियम लागू झाल्यानंतर एका वर्षात 58 हजार टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यात येईल. याबाबत काहीही प्रगती झालेली नाही. काल वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे. 10 ते 12 हजार रिक्षाचालक आहेत. त्यांच्याही काही अडचणी असतील.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण..........

आज मुंबई शहरातील अवस्था पाहिली तर अत्यंत वाईट आहे आणि दररोज त्याबाबत वर्तमानपत्रातून बातम्या येतात. तसेच या टॅक्सींमध्ये टेरिफ कार्ड कसे ठेवले जाते आणि लोकांची कशा प्रकारे लूट करण्यात येते यासंबंधी पेपरमध्ये वाचायला मिळते. परवा आझाद मैदानावर काही रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी धरणे धरले होते म्हणून शासनाने घेतलेल्या निर्णयाला स्थगिती दिली. आपण ज्यावेळेस कायदा करतो आणि असा कायदा केल्यानंतर असे संघटित लोक त्या कायद्याला विरोध करतात. मला मान्य आहे की, हे लोक 12-12 तास कष्ट करुन पोट भरतात परंतु याचा अर्थ असा नव्हे की, मुठभर लोकांना अशा प्रकारे संघटित होऊन, मुंबई शहरात एक कोटी आणि ठाणे शहरात राहणाऱ्या तसेच महाराष्ट्रातील जनतेला अशा प्रकारे वेठीस धरण्याचा अधिकार कोणी दिला ? आणि एकदा कायदा केला की हे संघटित लोक एकत्र येऊन सरकारवर दबाव टाकतात म्हणून केलेल्या कायद्याची अंमलबजावणीच करावयाची नाही काय ? मुंबईतील टॅक्सी खरे तर बसण्याच्याही लायकीच्या नाहीत इतक्या घाणेरडया असतात तसेच काही टॅक्सीचालक तर चार चार दिवस आंघोळ देखील केलेले नसतात. माझा प्रश्न असा आहे की, आपण केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्यामध्ये कुठल्या अडचणी आहेत ? आपण असे म्हटले आहे की, ऑटो रिक्षासाठी प्रिंटरची जी सक्ती केली होती ती रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयाला आपण स्थगिती का दिली ? तसेच मूठभर संघटित लोकांना मुंबईतील लोकांना वेठीस धरण्याचा अधिकार कोणी दिला ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : महोदय, मुंबईमध्ये जवळपास 1 लाख 5 हजार रिक्षा आणि 70 हजार टॅक्सीज आहेत. त्यामध्ये प्रिंटर आणि इलेक्ट्रॉनिक मीटर्स लावण्याचा आपण प्रयत्न केला व त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. रिक्षामध्ये सुध्दा आपण असे मीटर्स लावण्याबाबतचा कायदा केला परंतु काही लोकप्रतिनिधी आणि संघटना शासनाकडे आल्या होत्या पण त्यावेळेस त्यांच्यासोबत चर्चा होऊ शकली नाही. तसेच आमच्या लोकप्रतिनिधीसोबत देखील यासंदर्भातील निर्णय घेण्यापूर्वी चर्चा झाली पाहिजे, कारण काही लोक प्रतिनिधी युनियन्स चालवितात. त्यानुसार 3 सप्टेबर रोजी एक बैठक घेतली होती व त्या बैठकीला 6 आमदार उपस्थित होते. त्यावेळी असा निर्णय घेण्यात आला होता की, यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन निर्णय घेतला

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम .....

जाईल. कलकत्ता, दिल्ली, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये चौकशी केली असता इलेक्ट्रॉनिक मीटर्स लावलेले असल्याची माहिती मिळाली परंतु त्यामध्ये प्रिंटर्स नाहीत. कारण असे प्रिंटर्स ठेवले तर ऑटो रिक्षामध्ये अडचण होईल असे निदर्शनास आले. त्यामुळे प्रिंटर त्यातून डिलीट केले पण इलेक्ट्रॉनिक मीटर्स मात्र ऑटो रिक्षांमध्ये लावले पाहिजेत, असा निर्णय घेण्यात आला. कारण आमचे म्हणणे आहे की, ग्राहकांची सोय झाली पाहिजे, शेवटी लोकांबरोबर आपल्याला काम करावयाचे आहे. त्यामुळे याबाबत सर्व लोकप्रतिनिधी तसेच युनियनचे प्रतिनिधी यांच्यासोबत एकदा बसून त्यांच्याशी चर्चा करुनच फायनल निर्णय घेण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : यापूर्वी सुध्दा टॅक्सी मीटर्सच्या संदर्भात सभागृहात चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या गंभीर प्रश्नाकडे शासन लक्ष देणार की नाही ? उदा. आज मुंबईमध्ये 70 हजार टॅक्सी आहेत. या टॅक्सी कुठल्या तर 15 वर्षापूर्वी बंद पडलेल्या फियाट कंपनीच्या टॅक्सीज दुरुस्त करुन त्याच पुन्हा पुन्हा चालविण्यात येत आहेत. दिल्ली व कलकत्यामध्ये देखील याबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. कारण त्या ठिकाणी सुध्दा घाणेरडया टॅक्सी होत्या, ॲम्बॅसेडर्स गाडया घाणेरडया होत्या परंतु दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे सर्व टॅक्सी बदलण्याबाबतची स्कीम त्या राज्यांनी काढली व या टॅक्सीवाल्यांना मुबलक अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले. अशा प्रकारे टॅक्सी पूर्णपणे बदलण्यात आल्या आणि त्या राज्यांमध्ये गॅसवर चालणाऱ्या टॅक्सीज आज कार्यरत आहेत. याप्रमाणे मुंबईत गॅसवर चालणाऱ्या टॅक्सी आपल्याला सुरु करता येणार नाहीत काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

टॅक्सी संघटनेचे आपल्यावर जरी दडपण असले तरी आपल्याकडे त्यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी मोठया प्रमाणात यंत्रणा आहे. जी कंपनी बंद होऊन 15 वर्षे उलटून गेलेली त्या कंपनीच्या टॅक्सीज आता सुध्दा रोडवरुन धावत आहेत. टॅक्सी जुन्या झाल्यामुळे या गाडयांची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे. सडक्या गाड्यांतून प्रवाशांना नाइलाजास्तव प्रवास करावा लागत आहे. नवीन टॅक्सी देण्याच्या संदर्भात मागे चर्चाही झाली होती व त्यावेळी नवीन टॅक्सीज उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात शासन विचार करीत आहे असे उत्तरही देण्यात आले होते. त्यामुळे नवीन टॅक्सी देण्याच्या संदर्भात शासन आता काय विचार करीत आहे व हा विचार शासन किती दिवसात करणार आहे?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मुंबईमध्ये फ्लिट टॅक्सीच्या संदर्भात योजना तयार झाली असून कोणालाही फोन करुन आता ए.सी. फ्लिट टॅक्सी बोलता येते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले आहे की, मुंबईच्या प्रवाशांना अतिशय खराब टॅक्सीतून प्रवास करावा लागतो. परंतु राज्यसरकारच्या आर्थिक परिस्थितीनुसार नवीन गाडया घेण्यासाठी राज्यसरकारला फंडीग करणे शक्य होणार नाही. नवीन गाडया घेण्याच्या संदर्भात आर्थिक तरतूद झाली तर यासंदर्भातही योग्य रीतीने विचार करता येईल. परंतु मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, टॅक्सींजला इलेक्ट्रॉनिक्स मीटर लागले पाहिजेत ही आमची सुध्दा इच्छा आहे.

**उपसभापती** : इलेक्ट्रॉनिक्स मीटरच्या संदर्भात मी स्वत: एक मिटिंग बोलावली होती. इलेक्ट्रॉनिक्स मीटरच्या संदर्भात जे काही चालले आहे ते काही सरळ चालले नाही. टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक्स मीटर लावण्याच्या संदर्भातील गंभीर चर्चा या ठिकाणी सुरु आहे. ज्यावेळेस मी इलेक्ट्रॉनिक्स मीटरच्या संदर्भात बैठक आयोजित केली होती त्यावेळेस परिवहन खात्याचे अधिकारी इलेक्ट्रॉनिक्स मीटर घेऊन आले होते परंतु ते जसे काही इलेक्ट्रॉनिक्स मीटर विकावयास आले होते या भावनेनेच आले होते. या ठिकाणी मला परिवहन आयुक्तांचे नाव घेण्याची इच्छा नाही. या विषयाच्या संदर्भात जी मिटिंग झाली होती त्या मिटींगच्या संदर्भात पुढे काय झाले हे आपण

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ...

आम्हाला कळवलेले नाही. या विषयाच्या संदर्भात काय असेल ते असेल परंतु बरेच लोक या विषयाच्या संदर्भात श्रेय घेण्याच्या प्रयत्नात आहेत. परंतु या विषयाच्या संदर्भात परिवहन आयुक्तांवर मला ठपका ठेवावासा वाटतो. त्या मिटिंगमध्ये परिवहन आयुक्त शिवाजी पार्कवर जसे फिरावयास जातो तशा पध्दतीने फिरत होते, परिवहन आयुक्तांना या विषयाचे गांभीर्यच नव्हते असे आम्हाला दिसून आलेले आहे. या विषयाच्या संदर्भात परिवहन विभागाकडून सिरिअस कॉग्नीजन्स घेतला गेलेला नाही. त्या मिटिंग मध्ये परिवहन आयुक्त जबाबदारीने वागले नाहीत तसेच त्यांनी जबाबदारीने उत्तरे सुध्दा दिली नाहीत. त्या मिटिंगमध्ये परिवहन आयुक्त ज्या पध्दतीने वागले ती बाब मी कधीही विसरु शकणार नाही. मी जी मिटिंग बोलावली होती त्या मिटिंगच्या वेळेस मुंबई आणि ठाण्याचे लोकप्रतिनिधी सुध्दा उपस्थित होते. असे असतांनाही या मिटिंगची गांभीर्यपूर्वक दखल कोणीही घेतलेली नाही. या मिटिंगच्या संदर्भात शेवटी काय निर्णय घेण्यात आलेला आहे ती माहिती सभागृहाला समजली पाहिजे. मिटिंगच्या संदर्भात माहिती न आल्यामुळे मी सदरची लक्षवेधी सूचना राखून ठेवीत आहे. ज्या अधिका-यांनी मिटिंगचा कॉग्नीजन्स घेतला नाही त्या अधिका-यावंर काय कारवाई करण्यात आलेली आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहाला द्यावी.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यासंबधी</u>**

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना कमांक 4, 5 व 6 पुढे ढकलण्यात आलेली आहे. आता विशेष उल्लेख घेण्यात येतील.

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयात जमीन विक्रीच्या व्यवहारावरुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयात जमीन विक्रीच्या व्यवहारावरुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सिंधुदुर्ग जिल्हा हा "पयर्टन जिल्हा" म्हणून घोषित करण्यात आलेला असल्यामुळे या ठिकाणच्या जमिनीला सोन्याचा भाव आलेला असल्यामुळे या ठिकाणच्या जमिनींवर मोठ मोठया धनाडय लोकांच्या नजरा पडलेल्या आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ..

या जमिनीच्या खरेदीच्या व्यवहारात मारामा-या होत आहोत. भावा भावामध्ये मारामाऱ्या होत आहेत त्यामुळे या ठिकाणी गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून काही भावा भावामधील मारामाऱ्यामध्ये हस्तक्षेप करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मालवण मध्ये घडलेल्या अशा प्रकरणांच्या बाबतीत पोलीस यंत्रणेकडून नोंद घेतली जावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : पाणजू बेट, ता.वसई, जि.ठाणे येथे नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे

मु.शी : पाणजू बेट,ता.वसई, जि.ठाणे येथे नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे.त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लखासंबंधीची सूचना मांडतो :-

" वसई (जि. ठाणे)तालुक्यातील पाणजू हे बेट भर समुद्रात वसलेले असून तेथे नागरी सुविधांचा अभाव आहे. बेटावर रस्ते नाहीत. आरोग्य सुविधा देण्यासाठी आरोग्य विभाग,जिल्हा परिषद यांनी सन 2005-2006 च्या वार्षिक योजनेत या बेटावर आरोग्य केन्द्राची इमारत बांधण्यासाठी सर्व प्रकारच्या परवानग्या घेऊन अनुदानही मंजूर केलेले होते. परंतु त्यानंतर कुठलीही कार्यवाही न झाल्यामुळे आजही इमारती अभावी तेथील ग्रामस्थंना आरोग्य सुविधा पुरवता येत नाहीत. आता तर मंजुर अनुदानही व्यपगत झालेले आहे. आता त्यासाठी पुन्हा नव्याने अनुदान अगर जिल्हा नियोजन समितीमध्ये मंजुरी घ्यावी लागणार असल्याने सध्या तरी या बेटावरील आदिवासी आरोग्य सेवेपासून वंचित आहेत. आरोग्य सेवा मिळत नसल्याने तेथील जनतेच्या मनात शासनाबद्दल तीव्र स्वरुपाचा असंतोष व चिडीची भावना निर्माण झालेली असून त्याचा केव्हाही उद्रेक होण्याची शक्यता आहे. तसे होऊ नये म्हणून सदरची बाब विशेष उल्लेखाव्दारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे तरी याबाबत शासनाने तातडीने कारवाई करावी ही विनंती..

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : नागपूर जिल्हयातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना वेळेवर वेतन देणे

मु.शी :नागपूर जिल्हयातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना वेळेवर वेतन देण्याबाबत श्री.व्ही.यू.डायगव्हाणे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"नागपूर जिल्हयातील सर्वच 215 उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या फेब्रुवारी 2008 च्या वेतनाची देयके वेतन पथक कार्यालय नागपूर यांनी दिनांक 17 फेब्रुवारी 2008 पर्यंत वेतनाच्या धनादेश वेतन पथक कार्यालयाला प्राप्त न झाल्यामुळे नागपूर जिल्हयातील हजारो कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांचे वेतन 31 मार्च पूर्वी होईल किंवा काय याबाबत अनिश्चितता आहे. गेल्या वर्षभरात नागपूर विभागात कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व माध्यमिक शिक्षकांना वेतन अनियमितपणे मिळत आहे. यामुळे प्रत्येक शिक्षक / प्राध्यापकांना जादा व्याजाचा भुर्दड बसत आहे. बी.डी.एस. पध्दती नागपूर विभागातील शिक्षणाधिकारी कार्यालयात सुरळीत कार्यान्वित नाहीत. या योजनेच्या पध्दतीने वेतन पथक व ट्रेझरी कार्यालयात बनाव निर्माण झाला यासाठी सर्व जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देणे आवश्यक आहे सन 2007-2008 मधील सर्व महिन्यांच्या वेतनाच्या वितरणाची स्थिती लक्षात घेऊन पुढील सत्रापासून विलंब होणार नाही याची दक्षता ध्यावी अशी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघांची मागणी आहे यासाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेने दिनांक 7 मार्च 2008 रोजी शिक्षण उपसंचालक नागपूर कार्यालयासमोर आंदोलन केले. शिक्षक कर्मचाऱ्यांना 1 तारखेस वेतन द्यावे या गंभीर विषयाबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी : डीम ट्रेड शिक्षकांना सेवा निवृत्ती योजनेचे सर्व

फायदे देणे

मु.शी : डीम ट्रेड शिक्षकांना सेवा निवृत्तीचे सर्व फायदे देण्याबाबत
श्री.श्रीकांत जोशी,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी .

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो :-

" शालेय शिक्षण व सेवा योजन विभाग शा.नि.क्र.चवेआ 1089 मा.शि.- 2, दिनांक 9.9.1990 नुसार जे अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षक जून 1972 पूर्वी जिल्हा परिषद शाळांमध्ये नियुक्त झाले होते व त्यांना प्रशिक्षित होण्यासाठी शासनाने वेळोवेळी संधी उपलब्ध करुन देऊनही सदर शिक्षक एस.एस.सी.डी.एड. ही शैक्षणिक अर्हता प्राप्त करु शकले नाहीत, अशा दिनांक 01-07-1972 पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना खास बाब म्हणून डीम ट्रेड समजण्यात येऊन त्यांना सेवानिवृत्ती वेतन योजनेचे सर्व फायदे मिळण्यास पात्र समजण्यात यावे असे शासन निर्णय क्रमांक व्ही.एल.एस./ 1083/622 न/प्राशि - 3, दिनांक 4.10.1983 मध्ये नमूद करण्यात येणे, त्यानुसार सदर अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना वेतनश्रेणी 950 -1550 ऐवजी 975-1660 व पाचव्या वेतन आायोगानुसार रु.3050-4590 या वेतनश्रेणीत वेतन निश्चित करुन निवृत्ती वेतनाचा फायदा देण्यात येईल असे शासन निर्णयात नमूद केलेले असणे, सदर वेतनश्रेणी देण्याबाबत विधीमंडळात आश्वासन देऊनही याबाबतीत कोणतीही कार्यवाही न होणे, या अत्यंत महत्वाच्या विषयावर मी आज सभागृहात विशेष उल्लेख उपस्थित करु इच्छितो.

सभापती महोदय, विधीमंडळात जो निर्णय होतो त्याची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत नोकरशहा किती त्रास देतो याचे हे एक उदाहरण आहे. 1972 पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व डीम ट्रेड शिक्षकाना रु. 3200 - 4900 ही वेतन श्रेणी देण्याचा निर्णय माननीय शिक्षण मंत्र्यांनी येथे जाहीर केला होता. 1972 पूर्वी शिक्षक मिळत नव्हते तेव्हा नववी किंवा दहावी उत्तीर्ण झालेल्या हुषार विद्यार्थ्यांना बोलावून त्यांनी शिक्षण देण्याचे पवित्र काम करावे म्हणून प्राथमिक शिक्षक

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



श्री.श्रीकांत जोशी....

म्हणून सेवा करण्याची त्यांच्यावर जवळजवळ सक्ती करण्यात आली होती त्यांनी 30 -35 वर्षे चांगली सेवा दिलेली आहे. एस.एस.सी. डी.एड. झाले नाही म्हणून त्यांना कमी वेतनश्रेणी दिली

होती परंतु त्यांनी शिकवलेले विद्यार्थी डी.एड. झालेल्या शिक्षकांपेक्षाही चांगले होते ते ज्या शाळेत शिकवत होते त्या शाळा अधिका चांगल्या आहेत असे निदर्शनास आल्यामुळे ही चूक दुरुस्त करुन डीम ट्रेड शिक्षक म्हणून त्यांना विशेष सवलती दिल्या आणि रु. 3200-4900 ही वेतनश्रेणी त्यांना दिली होती तसेच निवृत्ती वेतनाचे सर्व फायदे याच वेतनश्रेणीप्रमाणे देण्यात येतील अशी घोषणा करण्यात आली होती. माननीय शिक्षण मंत्र्यांनी विधिमंडळात केलेली ही घोषणा अंमलात आलेली नाही. ग्राम विकास विभाग आणि शिक्षण विभाग यांचे वीळा भोपळयाचे संख्य आहे त्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. शिक्षण मंत्र्यांनी घेतलेला निर्णय आम्हाला कळत नाही असे उद्दामपणाचे उद्‌गार ग्राम विकास विभागाचे उप सचिव काढतात. 60 ते 65 वर्ष वयाचे वृध्द शिक्षक त्यांच्याकडे सतत खेटे घालतात परंतु निर्णय होत नाही. आता श्रीमती शर्वरी गोखले यांच्याकडे ही फाईल आलेली आहे.वेगवेगळया जिल्हा परिषदातील वेगवेगळे शिक्षणाधिकारी वेगवेगळे नियम काढून आम्हाला जोपर्यन्त पत्र येत नाही तोपर्यंत आम्ही काही करु शकत नाही असे उद्दामपणे सांगून या वृध्द शिक्षकांना हाकलून देतात ही बाब महाराष्ट्र सरकारच्या दृष्टीने अत्यंत शरमेची आहे . माननीय शिक्षणमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांनी यामध्ये त्वरित लक्ष घालावे. हे शिक्षक फक्त 2500 आहेत तेव्हा त्यांच्या बाबतीत त्वरित निर्ण्य घेऊन त्यांना या वेतनश्रेणीनुसार निवृत्तीवेतन 31 मार्च पूर्वी मिळेल अशी काळजी घेण्यात येईल असे आश्वासन द्यावे अशी मी सूचना करतो.

----

नंतर श्री.सुंबरे



**पृ.शी.** : राष्ट्रमाता इंदिरा गांधी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय,जालना या संस्थेला शासनाचे आदेश असूनही अद्याप जागा न मिळणे.

**मु.शी.** : राष्ट्रमाता इंदिरा गांधी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय,जालना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या संस्थेला शासनाचे आदेश असूनही अद्याप जागा न मिळणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" राष्ट्रमाता इंदिरा गांधी आर्टस्, सायन्स, कॉमर्स कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय जालना येथे 1990 साली सुरू झाले. संस्थेने इमारतीसाठी जागा मागितली असून शासनाने 17.7.2007 रोजी या संस्थेला जमीन देण्याचे आदेश दिले आहेत. परंतु अद्याप पर्यात संस्थेच्या ताब्यात जमीन आलेली नाही आणि त्याबाबत जिल्हा प्रशासनाने वारंवार जाणून बुजून दुर्लक्षच केले आहे. ही बाब बरोबर नाही आणि म्हणून त्याकडे शासनाचे मी या विशेष उल्लेखाद्वारा लक्ष वेधू इच्छिते. सभापती महोदय, आपण मला यासाठी संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देते.

***

..... एक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मीरा रोड येथे 10वी च्या विद्यार्थ्याला तो परीक्षेला जाताना बसवाहकांनी केलेली मारहाण.

**मु.शी.** : मीरा रोड येथे 10वी च्या विद्यार्थ्याला तो परीक्षेला जाताना बसवाहकांनी केलेली मारहाण याबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आग्रहाची विनंती केल्यामुळे मी त्यांना विशेष उल्लेखाची सूचना मांडावयास परवानगी देत आहे, त्यांनी त्यांची विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" मीरा रोड येथे दिनांक 15.3.2008 रोजी दहावीच्या विद्यार्थ्याने परीक्षेला जाताना सुटे पैसे घेऊन न गेल्याने त्यास चार बसवाहकांनी मारहाण केली आहे. मारहाणीमध्ये त्या विद्यार्थ्याचा हात जायबंदी झाला असून मुकामार देखील लागला आहे. परिणामी त्या विद्यार्थ्यास परीक्षेला मुकावे लागले आहे व त्यामुळे त्या विद्यार्थ्याचे वर्ष वाया गेले आहे. याबाबत तक्रार करूनही सदर बस वाहकांवर कारवाई झालेली नाही. त्यामुळे जनतेत असंतोष व भीतीचे वातावरण पसरलेले आहे. तरी या बाबत शासनाने योग्य ती कारवाई करावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडली आहे.

**उपसभापती** : आता विशेष उल्लेख संपलेले आहेत. यानंतर मध्यंतरादाखल सुटी घ्यावयाची काय ?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार आपल्याला विधेयक संमत करावयाचे आहे, तसेच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तरही आजच व्हावयाचे आहे त्याशिवाय पुरवणी मागण्यांवरील चर्चाही आहे. तेव्हा एकूण कार्यक्रमाची रूपरेशा पाहिल्यास हे सर्व कामकाज आज कसे आटोपावयाचे हा प्रश्नच आहे. तेव्हा या सर्वांसाठी आपल्याला किती वेळ बसून सभागृह चालवावयाचे आहे हे लक्षात घेऊन आपणच याबाबत निर्णय घ्यावा. कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे उर्वरित काम लक्षात घेऊन कामाचे तास

...... एक्स 3 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाढवावयाचे नाहीत आणि हे अधिवेशन 6 आठवड्याचे आहे. तेव्हा आपणच काय ते ठरवावे.

**उपसभापती** : ठीक आहे. मी सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी 3.45 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( दुपारी 3.08 वाजता, 3.45 वाजेपर्यंत मध्यंतर. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला)

**उपसभापती** : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर द्यावे.

श्री. आर.आर. पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाने होत असते. त्याप्रमाणे या वर्षी ती झाली आहे. हे अभिभाषण म्हणजे सरकारने मुख्यत: केलेल्या कामांचा थोडक्यात आढावा आणि पुढील वर्षभरात सरकारने राज्यासाठी केलेल्या नियोजनाचा आराखडा असते. अशाप्रकारे राज्य सरकारच्या कामांची दिशा स्पष्ट करणारे अभिभाषण संसदीय पध्दतीमध्ये दरवर्षी केले जाते. तसेच, भाषण याही वर्षी झाले. दरवर्षीचे माननीय राज्यपालांचे अभिभाषण आणि या वर्षीचे अभिभाषण बघितले आणि वाचले तर ते कुणाच्याही लक्षात येईल . शेतकऱ्यांपासून शेतीपर्यंत, विद्यार्थ्यांपासून औद्योगिकीकरणापर्यंत राज्य सरकारच्या कामाची दिशा स्पष्ट करणारे अत्यंत चांगले अभिभाषण म्हणून या अभिभाषणाचा उल्लेख करावा लागेल. या वर्षी या अभिभाषणाची सुरुवात या राज्यामध्ये आणि देशामध्ये केलेल्या कर्जमाफीच्या मुद्याने झाली. देशभरातील 4 कोटी शेतकऱ्यांसाठी 60 हजार कोटीचे कर्ज माफ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. 5 एकराच्या आतील जे थकबाकीदार आहेत त्यांचे कर्ज या निर्णयामुळे माफ होणार आहे. एकंदरीत या देशातील शेतकऱ्यांची अवस्था बघितली तर 40 वर्षापूर्वी जे शेतकरी 40 एकराचे मालक होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . .

त्यांच्या चार मुलांमध्ये जमिनीची वाटणी केल्यानंतर प्रत्येक मुलाकडे दहा एकर जमीन येते आणि त्या पुढच्या पिढीतील प्रगतीचा विचार करावयाचा तर काहीजण भूमीहीन होत आहेत, तर काहीजण अल्प-भूधारक होत आहेत. आजोबांनी काढलेले कर्ज बाप फेडू शकत नाही. बाप हा आजोबाने आणि त्याने स्वत: काढलेले कर्ज हे व्याजासह त्याच्या मुलांच्या डोक्यावर ठेवतात. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या पिढयानपिढया या कर्जातच जन्माला येत आहेत, कर्जातच जगत आहेत आणि पुढच्या पिढीच्या डोक्यावर कर्ज ठेऊन मरत आहेत. या देशातील शेतकऱ्यांना 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर करण्यात आली असून, इतका मोठा न्याय, एवढी मोठी मदत स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये दुसऱ्या कोणत्याही केंद्र शासनाच्यावतीने कधीही झाली नव्हती. म्हणून शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून या निर्णयाचा उल्लेख करावयाचा झाला तर एक ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण निर्णय असाच करावा लागेल. कित्येक सरकारे आली आणि गेली, परंतु शेतकऱ्यांना एवढी मोठी मदत कधीही देण्यात आली नव्हती. आपल्या माननीय पंतप्रधानांचा उल्लेख हा आंतरराष्ट्रीय किर्तीचे अर्थतज्ज्ञ म्हणून केला जातो. त्यांनी रिझर्व बँकेसारख्या महत्वपूर्ण बँकेमध्ये काम केले आहे. हे सर्व करीत असताना गरिबीशी आणि हा देश ज्या कष्टकऱ्यांच्या सामर्थ्यावर उभा आहे, त्याला अडचणीतून बाहेर काढण्याचा अचूक निर्णय आदरणीय पंतप्रधान यांनी, माननीय अर्थमंत्र्यांनी घेतलेला आहे. योगायोगाने कृषी खाते हे महाराष्ट्राच्या एका सुपूत्राकडे आहे. या राज्यामध्ये ज्यावेळी खाजगी सावकार घेत असलेल्या व्याजाबद्दल टीकेची झोड मी आणि सगळयांनीच उठविली होती, त्यावेळी अनेक सावकारांना अटक करण्यात आली आणि त्याचा परिणाम असा झाला की, सावकार थोडेसे धास्तावले. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज देण्याच्या बाबतीत असलेले एक आऊट लेट बंद झाले. ही अडचण माननीय श्री.शरद पवारसाहेबांपर्यंत गेली. देशभरातील शेतकऱ्यांना 80 हजार कोटी रुपये कर्ज पुरवठा केला जात होता. त्यांनी थोडेसे प्रयत्न केले आणि केवळ तीन वर्षाच्या कालावधीमध्ये 80 हजार कोटी रुपयांचा कर्जपुरवठा 2 लाख 10 हजार कोटी रुपयापर्यंत नेला आणि बँकातील निधीवर, ठेवीवर शेतकऱ्यांचा सुध्दा हक्क आहे. तसेच रिझर्व बँकेच्या धोरणाप्रमाणे या बँकांनी शेतकऱ्यांना फायनान्स केला पाहिजे हे सूत्र स्विकारले गेले. माननीय श्री.शरद पवारसाहेब, या देशाचे कृषीमंत्री होईपर्यंत देशभरातील शेतकऱ्यांना फक्त 80 हजार कोटी रुपयांचा कर्ज पुरवठा केला जात होता आणि हा आकडा 2 लाख 10 हजार कोटी रुपयां....

. . . .झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . .

पर्यंत गेलेला आहे आणि यावर्षी 2 लाख 80 कोटी रुपयांचे फायनान्स देशभरातील बँकांकडून सर्व शेतकऱ्यांना केला जाणार आहे. हे करीत असताना शेतीमधून नफा मिळत नसताना या कर्जावरील व्याज सुध्दा परवडणार नाही म्हणून त्यातही सवलत देण्याची भूमिका स्विकारली गेली. परंतु तरी देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत होत्या, त्याची संकटे संपत नव्हती. आपण महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री पॅकेज दिले, पंतप्रधान पॅकेज दिले परंतु या उपाययोजना पुरेशा होणार नव्हत्या. ऑक्टोबर महिन्यामध्ये माननीय श्री.शरद पवारसाहेबांनीच हे सगळे प्रयत्न करुनही जर बळीराजा आत्महत्येपासून परावृत्त होत नसेल तर आम्हाला कर्ज माफीच्या दिशेने विचार करावा लागेल. किंबहुना मी तो करीन असे ठामपणे अकोला येथे पहिल्यांदा सांगितले. माननीय श्री.शरद पवारसाहेबांसारखा या देशाचा कृषी मंत्री, प्रदीर्घ अनुभव असलेला नेता असे बोलल्यानंतर आता कर्ज माफ होणार अशा पध्दतीचे वातावरण सगळीकडे निर्माण झाले. मग अनेकांना कर्जमाफीचा कंठ फुटावयास सुरुवात झाली. शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल ज्यांनी टिंगल-टवाळया केल्या होत्या, ते सुध्दा या माफीबद्दल बोलावयास लागले. निमित्त काही का असेना, पण शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल पोटतिडकीने बोलले गेले हे सुध्दा मी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण मानतो. माझ्याकडे जे कागद आहेत, ते आजचे नाहीत. पण माझ्याजवळ दि.9 नोव्हेंबर 1998 रोजीचा "महाराष्ट्र टाईम्स" हे वर्तमानपत्र आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय . . . .

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी या सन्माननीय सदस्यांनी बरीच भाषणे ऐकलेली आहे. आपण आता मला संरक्षण द्यावे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा छोटासा मुद्दा आहे. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे अतिशय गंभीर वाक्य म्हणाले की, "शेतकऱ्यांच्या आत्महत्येची टिंगल-टवाळी केली."

**उपसभापती** : पण तुम्हाला ते वाक्य का लागले ?

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, ते का लागले म्हणजे काय ? ते वाक्य गंभीर आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : माननीय गृहमंत्र्यांनी कोणाचेही नाव घेतलेले नाही.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)



RDB/ MMP/ KGS/ SBT/ पूर्वी सौ. रणदिवे 15:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभागृहामध्ये जे घडले त्याबद्दल माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. त्या त्या काळात जे जे मांडले गेले त्याचा जेव्हा ऐतिहासिक रेफरंस देतो तेव्हा ते बोलले जाणार आहे.

श्री. आर. आर. पाटील : सन्माननीय सदस्यांनी आपल्यावर ओढवून घेऊ नये.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण त्यांना समज द्यावी. माननीय उपमुख्यमंत्र्यांचे विधान गंभीर आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा टिंगलटवाळीचा विषय होऊ शकत नाही.

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. आर. आर. पाटील : माझे सगळे म्हणणे ऐकल्यानंतर त्यांना सुध्दा पटेल.

**उपसभापती** : माननीय उपमुख्यमंत्र्यांनी कोणाचाही नामोल्लेख केलेला नाही.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा टिंगलटवाळीचा विषय होऊ शकत नाही.

श्री. आर. आर. पाटील : आपल्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. माझ्या हातामध्ये 9 नोव्हेंबर, 1998 च्या 'महाराष्ट्र टाईम्स' दैनिकाचे कात्रण आहे. 9 नोव्हेंबर, 1998 रोजीच्या 'लोकसत्ता' दैनिकामध्ये, 9 नोव्हेंबर, 1998 च्या 'लोकमत' तसेच महानगर या सगळया वृत्तपत्रांमध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची टिंगलटवाळी केली गेली. सगळेच कर्जामुळे मेलेले नाहीत, एक 72 वर्षाचा दम्यामुळे मेला, खोकून खोकून छातीचा खोका झाल्याने त्याने आत्महत्या केली, एकाने दोन वेळा प्रेमभंग झाल्याने आत्महत्या केली, त्यांनी आमच्याकडे यावयाचे होते, आम्ही त्याला मुलगी दिली असती. अशांसाठी विकास महामंडळ काढले असते असे स्टेटमेंट शिवसेनेच्या वतीने केले गेले आहे. 9 नोव्हेंबर, 1998 ची ही कात्रणे आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हे आक्षेपार्ह आहे. हे स्टेटमेंट कोणाचे आहे ?

श्री. आर. आर. पाटील : ही स्टेटमेंट्स सेनेच्या वतीने काढली गेली आहेत. मी ही कात्रणे सन्माननीय सदस्यांना देण्यास तयार आहे. त्यांनी ती घेऊन वाचावीत. 1998 साली हे स्टेटमेंट मी केलेले नव्हते. तेव्हा आम्ही विरोधी बाकावर होतो.

श्री. अरविंद सावंत : वर्तमानपत्रातील स्टेटमेंट खरे ठरत नाहीत.

...2...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : ज्या सभेमध्ये हे स्टेटमेंट केलेले आहे त्या सभेमध्ये श्री. नितीन गडकरी साहेब सुध्दा हजर होते. त्यांच्या समोर हे स्टेटमेंट केले गेले होते. आपण सत्तेवर असताना 153 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या त्याबद्दल आपलीच वाक्ये वर्तमानपत्रात छापून आलेली आहेत. नंतर त्याचा कोठेही खुलासा झालेला नाही. हे चुकीचे आहे असे कोणीही बोललेले नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आजचा हा विषय 1998 चा नाही. सन 2008 मध्ये माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केले त्यासंदर्भात ही चर्चा आहे. हजारो शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या झाल्या त्याबाबतीत आपण उत्तर द्यावे. त्याबाबतीत आपले भाष्य काय होते ते सांगावे. आपण जुने काय उगाळत बसला आहात ? हे 1998 चे राज्यपाल नाहीत.

श्री. जितेंद आव्हाड : संदर्भाशिवाय राजकारण होत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : तो संदर्भ माननीय राज्यपालांनी द्यावयास पाहिजे होता.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण माझ्या वक्तव्यावर बोलण्यास सन्माननीय सदस्यांना परवानगी दिलेली आहे काय ? मी घेतलेल्या आक्षेपास माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे. मी त्यांना उत्तर देण्यास तयार आहे. श्री. शरद पवार साहेब काय बोलले, श्रीमती सोनिया गांधी काय बोलल्या हे सांगण्यास मी तयार आहे.

**उपसभापती** : मी या ठिकाणी आदरणीय उपमुख्यमंत्री यांच्याशिवाय कोणालाही बोलण्याची परवानगी दिलेली नाही. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आपले उत्तराचे भाषण पुढे सुरु करावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी नाव घेऊ नका असे सांगितले गेले. कारण ज्याचे नाव घेतले ते सभागृहात उत्तर देण्यास उपस्थित नसतात. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी ज्यांचे नाव घेतले ते सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री. आर. आर. पाटील : मी कोणाचेही नाव घेतलेले नाही. मी घेतलेले नाव रेकॉर्डवर दाखवावे.

श्री. अरविंद सावंत : मग ते स्टेटमेंट कोणाचे आहे ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, त्यांनी जेवढी टीका केली ती आम्ही शांतपणे आणि लोकशाही मार्गाने ऐकली. त्यांना हे का झोंबते. हे आपले मत आहे. हे वर्तमानपत्रवाले आमचे कोणी नाहीत.

श्री. अरविंद सावंत : हे स्टेटमेंट कोणाचे आहे ? मी आपल्याला श्री. शरद पवार यांचे स्टेटमेंट दाखवतो. कर्जमाफी करणार नाही असे श्री. शरद पवार म्हणाले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्यांनी या राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्यांची टिंगलटवाळी केली त्यांना शेतक-यांच्या बाजूने बोलावे लागले हा महाराष्ट्रातील शेतक-यांचा विजय आहे....

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांचे हे राजकीय विधान देखील निषेधार्ह आहे. हिंमत असेल तर त्यांनी नाव घेऊन बोलावे.

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

**उपसभापती** : दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य जर आपसात असे बोलत राहिले तर मला सभागृहाची बैठक स्थगित करण्यावाचून पर्याय राहणार नाही. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे अशी मी सगळयांनाच विनंती करतो. सन्माननीय सदस्यांनी माननीय उपमुख्यमंत्र्यांचे उत्तर शांतपणे ऐकून घ्यावे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जर कोणाचे नाव घेतले असेल तर मी ते रेकॉर्डवरुन काढून टाकीन.

श्री.बबनराव पाचपुते : माननीय उपमुख्यमंत्र्यांचे उत्तर सुरु आहे. विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्यांनी अभिभाषणावरील चर्चेत भाग घेत असताना नावे घेऊन भाषणे केलेली आहेत. तेव्हा आता उत्तर ऐकण्याची सुध्दा त्यांनी तयारी ठेवली पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, छोटया छोटया उपाययोजना करुन सुध्दा शेतक-यांच्या आत्महत्या थांबत नव्हत्या. विदर्भातील सहा जिल्हयांमध्ये या आत्महत्या होत होत्या. त्यामुळे राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने यापूर्वी पॅकेजेस् घोषित केलेली होती. त्याच्यातूनही हा प्रश्न सुटत नव्हता, शेतक-यांचे समाधान होत नव्हते. त्यामुळे राज्यामध्ये एक चांगले वातावरण निर्माण करण्याची गरज होती. म्हणून केंद्र सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला, शेतक-यांना या महाराष्ट्रात आणि देशात कधीच मिळाली नव्हती इतकी कर्जमाफीसंबंधी मदत केल्यामुळे महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेच्यावतीने मी केंद्र सरकारचे अभिनंदन करतो.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...)

सभापती महोदय, 5 एकराच्या आतच्या थकबाकीदारांचे कर्ज माफ झालेले आहे आणि त्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक शेतकरी आहेत. वरकस जमिनीची उपज कमी आहे, जिराईत क्षेत्राचे उत्पन्न देखील कमी आहे. तांत्रिकदृष्ट्या 5 एकराचा सरकट निर्णय केल्यामुळे अजूनही काही शेतकरी लाभापासून वंचित राहात आहेत. याबाबतीत राज्य सरकारने आपले स्पष्ट मत केन्द्र सरकारला कळविलेले आहे की, आणखी थोडीशी व्यापक मदत करण्याची भूमिका केन्द्र सरकारने घेतली पाहिजे. प्रश्न असा आहे की, सर्व बाजू केन्द्रावर टाकावी की राज्य सरकारने सुध्दा त्यातील काही हिस्सा उचलावा. माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि आम्ही ही स्पष्ट भूमिका घेतलेली आहे की जे शेतकरी लाभार्थी ठरु शकतात अशा शेतक-यांना केन्द्र सरकार आणि राज्य सरकारने मदत द्यावी. या मदतीमध्ये राज्य सरकार सुध्दा आपला हिसा उचलायला तयार आहे. आमची अन्य कामे थोडीशी बाजूला ठेवू. पण या राज्यातील शेतक-यांना मदत करण्याच्या बाबतीत राज्य सरकार कमी पडणार नाही. केन्द्र सरकारचे पॅकेज आणि डिटेल्स आल्यानंतर जे कर्जबाजारी शेतकरी लाभापासून वंचित राहातील त्यांना मदत करण्याच्या बाबतीत राज्य सरकार निश्चितपणे भूमिका घेईल. एकदा पॅकेज घोषित झाले तेव्हा आपण अनेक मत व्यक्त केली की, बँकांसाठी हे पॅकेज आणले, यामुळे बँकाना फायदा होईल. यापुढेही जाऊन पश्चिम महाराष्ट्रासाठी पॅकेज आणले अशीही मते व्यक्त करण्यात आली. कधी कधी आकडे बघितले जात नाहीत. जे शेतकरी बँकांचे थकबाकीदार आहेत,त्यांना बँकांचे आऊट लेट बंद झालेले आहेत, बँकांतून कर्ज मिळत नसल्यामुळे शेतीत गुंतवणूक करता येत नाही, शेतक-यांना शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. शेतक-यांना कमी व्याजाची बँक कर्जे मिळायची असतील, बँकांचे थकबाकीदार दाखविल्यानंतरही त्यांना पुन्हा कर्ज मिळू शकेल, त्यांची इन्व्हेस्टमेंट वाढू शकेल, त्यांचे उत्पन्न वाढेल म्हणून पहिल्यांदा बँकांची थकबाकी नष्ट करणे आवश्यक होते. राज्य सरकारकडे जी प्राथमिक आकडेवारी उपलब्ध झालेली आहे त्याप्रमाणे जे 60 हजार कोटी रुपये माफ केले जाणार आहोत त्यातील 10446 कोटी रु.इतकी महाराष्ट्रातील कर्जे माफ केली जाणार आहेत. त्यामधील 2748 कोटी पश्चिम महाराष्ट्रासाठी, 208 कोटी कोकणासाठी, 2638 कोटी खानदेशासाठी आहेत. मराठवाडयाला सर्वात जास्त लाभ होणार आहे. मराठवाड्यासाठी 2923 कोटी मिळणार आहेत. विदर्भासाठी 1729

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...

कोटी अधिक पंतप्रधान आणि मुख्यमंत्री पॅकेजच्या वेळी 837 कोटी रु. व्याज भरलेले असल्यामुळे ते व्याज आणि आता मिळणारी मदत असा लाभ मिळणार आहे. राज्य सरकार आणि पंतप्रधान पॅकेज मधून हे पैसे भरले नसते तर तीही रक्कम यामध्ये दिसली असती. तेव्हा ते माफ केलेले कर्ज आणि आता माफ होणारे कर्ज असे एकत्र केले तर पंतप्रधान पॅकेज आणि कर्ज माफी मधून 2566 कोटी इतका लाभ त्या भागातील शेतक-यांना होतोय. महाराष्ट्राच्या सर्व भागातील शेतक-यांना या मदतीचा चांगला फायदा होणार आहे. विदर्भामध्ये 5 एकराखालचे आणि पुढचे अशी स्थिती नाही. त्यामुळे या पॅकेजचा उपयोग महाराष्ट्रातील सर्व भागांना होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतक-यांना खूप चांगला दिलासा मिळू शकेल.

...नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

सभापती महोदय, राज्यात शेतक-यांच्या होत असलेल्या आत्महत्येच्या संदर्भात सभागृहात अनेकांनी आपापली मते व्यक्त केलेली आहेत. या विषयाच्या अनुषंगाने पॅकेज जाहीर केल्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्या थांबतील काय असाही प्रश्न अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केला आहे. मी सगळे कार्यालयीन कामकाज चार दिवस बाजूला सारुन आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी गेलो होतो. त्या चार दिवसांच्या भेटीत, दौ-यात शेतक-यांच्या आत्महत्येची अनेक कारणे मला आढळून आली. नापिकी, शेतक-यांच्या उत्पादित केलेल्या शेतमालास दर न येणे, त्यामुळे निर्माण झालेली गरिबी, सावकारांची कर्जे, सामाजिक कारणे, अशी विविध कारणे माझ्या निदर्शनास आली. एका आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबियास भेटण्यासाठी गेलो होतो. त्या कुटुंबियांची विचारपूस केल्यानंतर तेथून निघताना मला त्या कुटुंबियातील विधवा झालेल्या महिलेने अर्ज दिला. मी त्यांना विचारले की, कसला अर्ज आहे ? त्या विधवा महिलेने सांगितले की, माझ्या मुलाच्या बदलीचा अर्ज आहे. योगायोगाने त्या महिलेचा मुलगा माझ्याच खात्यात नोकरीला आहे. त्या मुलाची पत्नी देखील नागपूर येथे नोकरी करीत आहे. दोघांचा महिन्याला एकूण 21 हजार रुपये पगार आहे. परंतु त्याच्या वडिलांनी चार हजार रुपयांच्या कर्जासाठी आत्महत्या केली. मुले आई-वडिलांना सांभाळत नाहीत असे देखील एक कारण शेतकरी आत्महत्ये मागचे कारण आढळून आले आहे. शेतक-यांच्या आत्महत्येस सामाजिक कारणे आहेत, आर्थिक कारणे आहेत. या विविध कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करतात. शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सरकारी पॅकेज, तसेच सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींनी शेतक-यांना दिलासा देण्याची भूमिका एकत्रितपणे स्वीकारली तर आपण एकाकी आहोत, आपल्याला कोणाचेही पाठबळ नाही. आमचे ऐकून घेणारे कोणी नाही अशी शेतक-यांची धारणा होईल, त्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्येस रोखण्यात आपल्याला यश येऊ शकेल. शेतक-यांच्या आत्महत्येसंदर्भात पंतप्रधान पॅकेज जाहीर करण्यात आले, मुख्यमंत्री पॅकेज जाहीर करण्यात आले. त्यानंतर राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्यांचा आलेख बघितला तर त्यात बदल झालेला आपणास निश्चितपणे दिसून येईल. 2006 या वर्षी 2355 शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या होत्या. 2007 या वर्षी 1985 शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. एकूण आत्महत्या यामध्ये थोडीशी घट झालेली आपल्याला दिसून येईल. आपण पात्र प्रकरणे बघितली तर 1028 वरुन 590 वर आलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्री.आर.आर.पाटील...

राज्यात शेतक-यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत ही गोष्ट कबूल आहे. परंतु एक स्पष्ट करु इच्छितो की, महाराष्ट्रात सध्या शेतक-याच्या आत्महत्या कमी व्हावयास लागल्या आहेत. हा डिक्लाईनींग ट्रेण्ड यापुढे सुध्दा असाच राहिला पाहिजे आपण सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. 50 कोटी रुपयांचे पॅकेज महाराष्ट्रातील सहा जिल्हयांसाठी दिले गेले. या सहा जिल्हयांसाठी मुख्यमंत्र्यांचे 75 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले गेले. सदर पॅकेजची अंमलबजावणी तीन वर्षात करावयाची होती. पंतप्रधान पॅकेजचा 62 टक्के खर्च म्हणजे 2338 कोटी रुपयांचा खर्च या सहा जिल्हयात करण्यात आला आहे. राज्य सरकारने 1075 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. त्या पॅकेजच्या अगेन्स 1109 कोटी रुपये या सहा जिल्हयात खर्च झालेला आहे. या दोन्ही पॅकेजमधील 837 कोटी रुपये व्याजासाठी भरलेले आहेत. त्यामुळे त्या विभागातील शेतक-यांना निश्चितपणे फायदा झालेला आहे. त्या परिसरात सेंद्रीय शेतीचे प्रयोग यशस्वी झाले आहेत. त्याचप्रमाणे शेतक-यांना चांगल्या प्रतीचे बियाणे दिल्यामुळे शेतक-यांची चांगले उत्पन्न मिळविलेले आहे. ही शेतक-यांची जमेची बाजू आहे. परंतु या ठिकाणी मला दुसरी बाजू देखील सांगणे क्रमप्राप्त आहे. सदरहू पॅकेजची संवेदनशीलतेने अंमबजावणी झाली असती तर त्याचा लाभ अधिक शेतक-यांना झाला असता. या चार दिवसाच्या दौ-यात माझ्या असेही लक्षात आले की, ज्या शेतक-यांने बैल नाही, अशा शेतक-याच्या दारामध्ये सरकारने दिलेली बैलगाडी उभी आहे. ज्या शेतक-यांच्या शेतात विहीर नाही, त्या शेतक-याला इलेक्ट्रीक पंप दिलेला आहे. या पॅकेज अंतर्गत चांगल्या प्रकारची जनावरे संबंधित अधिका-यांनी दिली नाहीत. ज्या ठिकाणी शेतक-यांना चांगली जनावरे दिली आहेत, तेथे दूध विकत घेणारी कोणतीही यंत्रणा नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : या सहा जिल्हयात कागदोपत्री जनावरे वितरीत केल्याचे दाखविले गेले आहे.

श्री. आर.आर.पाटील : तसे घडले असल्याची शक्यता मी नाकारीत नाही. पॅकेजमधील लाभ देताना त्रुटी राहिल्या आहेत, चुका झाल्या आहेत. त्याबाबतीत जागेवर निर्णय घेण्याची भूमिका आम्ही स्वीकारलेली आहे. पण यामध्ये चुका करणारे यंत्रणेतील जे कोणी चोर असतील, मढयाच्या टाळूवरील लोणी खाताना मागे पुढे बघत नाहीत, असे अस्थनीतील निखारे बाजूला केल्याशिवाय राज्य सरकार शांत बसणार नाही या गोष्टीची मी ग्वाही देतो. अशा लोकांना निश्चितपणे

3....



ABG/ SBT/ KTG/ प्रथम श्री. शिगम 16:10

श्री. आर.आर.पाटील....

वठणीवर आणले जाईल. परंतु काही अधिका-यांनी अतिशय संवेदनशीलपणाने या विभागातील शेतक-यांपर्यंत जाऊन धीर देण्याचे आणि नेटके काम केलेले आहे..

यानंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

जे कुणी चुकले असतील त्यांना माफ करण्याची भूमिका राज्यसरकार मार्फत निश्चितच घेतली जाणार नाही.....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री महोदय अभ्यास करुन आपले विचार व्यक्त करीत आहेत. एवढे सगळे झाल्यानंतर आणि सर्व प्रकारची पॅकेज दिल्यानंतर आजही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत याचा अभ्यास करुन त्यावर दोन मिनिटे भाष्य केले तर जास्त चांगले होईल.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आत्महत्यांची कारणे शोधण्यासाठी तज्ज्ञ समित्या नेमलेल्या आहेत. त्यामध्ये आत्महत्यांची अनेक कारणे सांगितलेली आहेत. यावर उपाययोजना म्हणून पंतप्रधान पॅकेज, मुख्यमंत्री पॅकेज, कर्जमाफी यासारख्या वेगवेगळया उपाययोजना सरकारने केलेल्या आहेत त्याबाबतीत अधिक विश्लेषण करण्याची आवश्यकता नाही. एक निश्चित आहे की, आत्महत्या कमी होतील. आत्महत्यांच्या अनेक कारणांपैकी शेतीमधील नुकसान हे एक कारण आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची अनेक कारणे तज्ज्ञांनी सांगितलेली आहेत. आत्महत्या कमी होण्यासाठी एक सामाजिक प्रबोधन सुध्दा त्या परिसरामध्ये केले जाण्याची गरज आहे. तज्ज्ञांनी सुचविलेल्या उपाययोजना राज्य शासनाने अंमलात आणल्या आहेत. पंतप्रधान पॅकेज, मुख्यमंत्री पॅकेज दिलेले आहे. हे सर्व काही आकाशातून पडलेले नाही. या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, शेती क्षेत्रामध्ये काम करणारी माणसे यांनी ज्या उपाययोजना सुचविल्या होत्या त्याच उपाययोजना राज्य शासनाने त्या परिसरात अंमलात आणल्या आहेत.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणाच्या बाजूने या बाजूकडील माननीय सदस्य बोलतात आणि विरोधी पक्षाकडून परंतु खेद होतो असे म्हणून त्यातील त्रुटी दाखविण्याचे काम केले जाते. आम्ही सुध्दा एक काळ विरोधी पक्षाच्या बाकावर बसून हे काम केलेले आहे. पण कितीही घणाघाती टीका केली तरी ज्या योजना चांगल्या होत्या त्या योजनांना चांगले म्हणण्याचा दिलदारपणा आम्ही त्या काळामध्ये दाखविला होता. केवळ सत्ताधारी पक्षाच्या बाजूची जबाबदारी होती आणि विरोधकांचे काम केवळ विरोध करणे असा असतो असा अर्थ काढून उपयोगाचे नाही. काही प्रश्न राजकारण बाजूला ठेऊन सोडवावयाचे असतात. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ज्या काही उपाययोजना सुचविल्या असतील त्याची अंमलबजावणी करण्यासाठी

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ 16:15

श्री. आर.आर.पाटील ....

एकत्रितपणे काम केले तर एक चांगला संदेश राज्यामध्ये जाऊ शकतो. पण निवडणुका तोंडावर आल्या आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 'देता का जाता ' ही घोषणा दिली. तुमच्या पार्टीमध्ये असे होऊ शकते. कोण काय काम करते हे आम्हांलाही माहीत आहे. देता का जाता हे आंदोलन सुरु झाले. त्यावेळी आम्ही ठामपणाने सांगितले होते की, दिल्याशिवाय राहणार नाही आणि जाणार तर मुळीच नाही. आता ' जाता का पळता ' एवढेच म्हणावे लागेल. एवढे मोठे कर्ज माफ झाल्यानंतर जसे कडक उन्हात पाऊस पडल्यावर सगळे वातावरण बदलून जाते त्याप्रमाणे राज्यामध्ये बदलले गेलेले वातावरण लक्षात घेऊन विरोधकांना वैफल्य येणे मी समजू शकतो. वैफल्य आले नसेल तर ती अतिशय चांगली गोष्ट आहे. विरोधी पक्षनेत्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांना सगळे सदन नेहमीच अभ्यासू सदस्य म्हणून पाहते. आपण त्यांचे गेल्यावर्षीचे भाषण ग्रंथालयातून काढून पहा. तेच मुद्दे यावर्षीच्या भाषणामध्ये आहेत. एखादी नवीन रेकॉर्ड वाजवली तरी खरखर असा आवाज तरी येतो. पण त्यांच्या भाषणामध्ये स्वल्पविराम,अर्थविराम,पॉज हे सर्व मागील भाषणामध्ये आहे तेच आजच्या भाषणामध्ये आहे. मी त्यांची अनेक भाषणे ऐकलेली आहेत. ज्यावेळी भाषण करण्यासाठी मुद्दा असतो त्यावेळी खूप संयमाने, ठामपणाने व्यक्ती बोलत असते. परंतु ज्यावेळी मुद्दा नसतो त्यावेळी कोटया करुन आणि नकला करुन वेळ घालवावा लागतो. कर्जमाफ आल्यानंतर वैफल्याची छाप कोणावर आधी पडली असेल तर ती गडकरी साहेबांचे भाषण ऐकल्यावर एकदम जाणवली.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अंग हलविणे मी समजू शकतो. परंतु सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी अंग हलवू लागले, हातवारे करावयास लागले. ते तरी दुसरे काय करणार? राज्यपालांच्या अभिभाषणावर तेच तेच मुद्दे होते. वेगळे मुद्दे नाहीत. विदर्भावर अन्याय होत आहे. विजेच्या बाबतीत, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत, भ्रष्टाचाराबाबतचे मुद्दे होते. मी विनम्रपणे सांगू इच्छितो की, राज्य सरकारने केवळ महाराष्ट्राचा भौगोलिक नकाशा एकसंघ ठेवून राज्याच्या भावनेचे ऐक्य सुध्दा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने राज्याच्या सगळ्या रिजनचा विकास झाला पाहिजे हीच लोकशाही आघाडी सरकारची धारणा आहे. 5 वर्षे युती सरकार सत्तेवर होते. आम्ही सुध्दा गेली 9 वर्षे सत्तेवर आहोत. जर आकडेवारी सांगितली तर विदर्भाबद्दल, मराठवाड्याबद्दल बोलण्याचा विरोधी पक्षाला नैतिक अधिकार उरतो का? याचा आकडेवारीवरुन आपण विचार करावा. मी हेत्वारोप करीत नाही.

सभापती महोदय, 1996-97 साली युती सरकार सत्तेत असताना विदर्भ सिंचन महामंडळाला विदर्भातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी 101 कोटी रुपये देण्यात आले. 1997-98 साली 241 कोटी रुपये, 1998-99 साली 296 कोटी रुपये देण्यात आले. 1999-2000 साली लोकशाही आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर 296 कोटी रुपयांवरुन 522 कोटी रुपये इतका निधी विदर्भ सिंचनासाठी देण्यात आला. इतकेच नव्हे तर 2005-06 साली 1168 कोटी रुपये, 2006-07 साली 1505 कोटी रुपये, 2007-08 मध्ये 2277 कोटी रुपये देण्यात आले. 1996-97 साली युती सरकार सत्तेवर असताना 101 कोटी रुपये आपण दिले. यावर्षी विदर्भ सिंचन प्रकल्पांसाठी 2277 कोटी रुपये दिले गेले आहेत. युती सरकारच्या 4 वर्षाच्या काळात केलेला खर्च आणि लोकशाही आघाडी सरकारने विदर्भ सिंचनासाठी एका वर्षात केलेला खर्च तुमच्या चार वर्षाच्या खर्चाच्या दुप्पट असताना राज्य सरकार विदर्भावर अन्याय करीत आहे अशा प्रकारची भूमिका व्यक्त करणे हे सुध्दा चुकीचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत त्या काळात सभागृहाचे सदस्य नव्हते. या राज्यामध्ये अनुशेष वाढविण्याचे काम जर कोणी केले असेल तर त्यावेळी विदर्भातील, मराठवाड्यातील मागास भागांच्या रस्त्यांची आठवण यांना होत नव्हती, त्या काळात यांना मुंबईतील पुलांची आठवण होत होती. नाका तेथे पूल हे सिध्द करुन दाखविले. मुंबईतील 55 उड्डाणपूल यांना आठवत होते. मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्ग यांना आठवत होता. त्या

.2..

17-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) FF.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..........

काळात जी कॉन्ट्रॅक्ट दिली गेली होती ती निधीचा अंदाज न घेता दिली गेली. तो सुध्दा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. निधीचा पत्ता नसताना काशीच्या कारागिराने पट्टे पाडत सुटावे तशी अनेक कामे निधी नसताना सुरु केली. विदर्भात नाराजी, पश्चिम महाराष्ट्रात कामे होत नाहीत म्हणून नाराजी होती. हेच पुन्हा उलट विचारतात, राज्यावर कर्ज का झाले? यांनी सुरु केलेली अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी आणखी कर्जाची आवश्यकता होती. यांनी काढलेले कर्ज भागविण्यासाठी कर्जाची आवश्यकता होती. आज राज्यावर कर्ज वाढत असले तरी एकूण वाढलेल्या बजेटच्या तुलनेमध्ये राज्यावरचे कर्ज वाढणार नाही अशा प्रकारची भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. कर्जाची परतफेड आणि व्याजासाठी राज्य शासनाला 2002-03 साली एकूण उत्पन्नाच्या 40.6 टक्के एवढा खर्च करावा लागत होता. 2007-08 मध्ये हेच प्रमाण फक्त 24 टक्क्यावर आले आहे. युती सरकारच्या काळात एकूण प्लॅनच्या 47 टक्के रक्कम या कामासाठी खर्च होत होती. ती टक्केवारी राज्याचे उत्पन्न वाढल्यामुळे कमी झाली. अनेकवेळा अभ्यास न करता महाराष्ट्राचे वर्णन करताना यांनी राज्य कर्जबाजारी केले म्हणून सांगितले. यासाठी अन्य राज्यांवर किती कर्ज आहे, स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत त्यांचे एकूण दायित्व किती आहे त्याचे प्रमाण मला याठिकाणी सांगितले पाहिजे.

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.........

त्यानुसार आंध्र प्रदेश या राज्याच्या स्थूल उत्पन्नाशी त्या राज्याच्या दायित्वाचे प्रमाण 43 टक्के आहे, बिहारचे हे प्रमाण 75 टक्के आहे, छत्तीसगड राज्याचे 27 टक्के, गोवा राज्याचे 48 टक्के, गुजरातचे दायित्वाचे प्रमाण 22 टक्के, हरियानाचे 25 टक्के, झारखंड 34 टक्के, कर्नाटक राज्याचे 29 टक्के, केरळचे 39.9 टक्के, मध्य प्रदेशाचे 41 टक्के, महाराष्ट्राचे 26 टक्के, ओरिसा 51 टक्के, पंजाबचे 45 टक्के, राजस्थान 48 टक्के, तामिळनाडू 26 टक्के, उत्तर प्रदेश 47 टक्के अशा प्रकारे वेगवेगळया राज्यांच्या स्थूल उत्पन्नाशी दायित्वाचे प्रमाण आहे. भारतीय जनता पक्षाची राजवट असलेली जी राज्ये आहेत त्यातील कुठल्याही राज्याच्या स्थूल उत्पन्नाशी तुलना केली तर त्या राज्यांच्या दायित्वाची टक्केवारी आपल्या राज्यापेक्षा जास्त आहे. असे असताना सुध्दा हे राज्य दिवाळखोरीत गेले, म्हणून आकडेवारी न बघता, राज्य व देशाचा विचार न करता, शासनापुढील अडचणी न बघता केवळ हवेतच टीका करावी असे काम विरोधी पक्षाने केले, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आज आपला महाराष्ट्र आर्थिकदृष्टया स्थिरस्थावर आहे. परंतु विरोधी पक्षाकडून मात्र असे आरोप करण्यात येत होते की, सरकारच्या खजिन्यात पैसे नाहीत. मी त्याबाबत सभागृहाला तसेच राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, आजही कुठल्याही चांगल्या कामाला शासनाकडे पैसे कमी पडणार नाहीत याची मी ग्वाही देईन. आज शासनाच्या तिजोरीत खडखडाट नाही तर खणखणाट आहे आणि या खडखडाटापासून खणखणाटापर्यंत तिजोरी नेण्याची बहादुरी या लोकशाही आघाडीच्या शासनाने दाखविलेली आहे. म्हणून विरोधकांनी कर्जाची काळजी करु नये, कर्ज फेडायला राज्य सरकार सक्षम आहे. त्या काळात मी एक प्रश्न उपस्थित केला होता की, सेना भाजपाच्या सरकारने इतक्या मोठया प्रमाणात कर्जे काढली, परंतु आम्ही पुन्हा सत्तेवर येणार आहोत त्यावेळी इतकी कर्जे आम्ही कशी फेडायची ? त्यावेळी विधानसभेत माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर रेकॉर्डवर आहेत. ते म्हणाले होते की, कर्ज काढतो तो मर्द असतो आणि मर्दच कर्ज काढण्याची हिंमत करतो. मी विनम्रपणे असेही विचारले होते की, मर्दानगीचा आणि कर्जाचा काय संबंध आहे ? त्यावेळी तुम्ही कर्ज काढल्यामुळे मर्द ठरत असाल तर आज तुमच्या तिप्पट कर्ज आम्ही काढले आहे, याचा अर्थ आम्ही तिप्पट मर्द आहोत असे मी म्हणत नाही तर तुम्ही एकूण जे उत्पन्न मिळवित होता त्याच्या 40 टक्के रक्कम

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.......

व्याज आणि कर्जाच्या पोटी तुम्हाला खर्च करावी लागत होती. आमची मर्दानगी कशात असेल तर ती केवळ कर्ज काढण्यात नसून राज्याचे उत्पन्न वाढविण्यातही आम्ही खरा पुरुषार्थ आणि मर्दानगी दाखविलेली आहे. राज्याचा प्लॅन मोठा होत चालला आहे......अडथळा.......आपण व्हॅटच्या संदर्भात बोलत आहात परंतु आज व्हॅट फक्त आपल्याच राज्यात नाही तर इतर अनेक राज्यांमध्ये व्हॅटलागू झालेला आहे. भारतीय जनता पक्षाच्या राज्यांमध्ये सुध्दा व्हॅट लागू आहे. असे असतांना सुध्दा दायित्वाचे इतके मोठे प्रमाण या राज्यांमध्ये दिसून येत आहे.........

श्री. मधुकर सरपोतदार : महोदय, माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या संपूर्ण भाषणाला नाही तर फक्त एकाच मुद्याच्या बाबतीत हरकत आहे. तो म्हणजे कर्जाची तुलना मर्दानगीबरोबर करण्याची भाषा चालली आहे ती चांगली गोष्ट आहे. कर्ज काढण्याबद्दल आपल्याला उत्पन्न मिळत आहे असे देखील आपण गृहित धरु या. परंतु या 1.50 लाख कोटी कर्जाच्या संदर्भात प्रश्न एकच आहे की, या संपूर्ण कर्जाच्या संदर्भात शासनाने एक श्वेत पत्रिका काढून या कर्जाची कशी विल्हेवाट लावली आहे, यासंबंधीची माहिती राज्यातील जनतेला देणार काय ?

श्री.आर.आर.पाटील : महोदय, राज्यामध्ये आर्थिक प्रश्नावर श्वेत पत्रिका काढावी ही मागणी पहिल्यांदा मीच केली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी सर यांनी दिलेले उत्तर असे आहे की, राज्याच्या विकास कामांवर परिणाम करणारी भूमिका माननीय सदस्य श्री. आर.आर.पाटील मांडत असतील तर ते महाराष्ट्राशी द्रोह करीत आहेत, त्यामुळे त्यांची ही मागणी मान्य करता येणार नाही, त्यांनी खाजगीत येऊन माझ्याशी चर्चा करावी. असे तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सांगितले आणि मी त्यांना मानणारा असल्यामुळे श्वेत पत्रिकेचे दुष्परिणाम त्यांनी मला समजावून सांगितल्यामुळे मी ती भूमिका सोडून दिली होती. मी सभागृहाला अतिशय विनम्रपणे सांगू इच्छितो की, आपल्या राज्याची बदनामी आपल्या राज्याच्या शत्रुंनी करावी, किमान ती आपण तरी करता उपयोगाचे नाही. राज्यात जे काही प्रश्न असतील त्याबाबत आपण काय बोलतो आणि कोण बोलता यावर तरी ते अवलंबून नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

सभापती महोदय, आज राज्यामध्ये सर्व परिस्थिती अनुकूल असल्यामुळे गुंतवणुकीच्या बाबतीत आज महाराष्ट्राची स्पर्धा देशातील राज्याबरोबर नसून गेल्या वर्षी स्वित्झर्लंडच्या एका संस्थेने केलेल्या सर्व्हेक्षणा प्रमाणे महाराष्ट्राने गुंतवणुकीच्या दृष्टीने इटली, रशिया, दक्षिण कोरिया आणि पोलंड या पुढारलेल्या देशांना मागे टाकलेले आहे. छत्रपती शिवरायांच्या या महाराष्ट्राची जगातील पुढारलेल्या राष्ट्राबरोबर स्पर्धा सुरु झालेली आहे. आता महाराष्ट्राच्या पासंगालाही दुसरे राज्य पुरु शकत नाही अशी चौफेर गुंतवणूक आज महाराष्ट्रात येत आहे. केवळ येथील सा-या व्यवस्थांवर विश्वास असल्यामुळे दिवसेंदिवस महाराष्ट्रातील गुंतवणूक वाढत चालली आहे. म्हणून औद्योगिक प्रगतीच्या बाबतीमध्ये राज्याची चौफेर प्रगती निश्चितपणे होत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती माझा हरकतीचा मुद्दा आहे. महाराष्ट्रात आता वीजच नाही त्यामुळे महाराष्ट्राची विना विजेची चौफेर प्रगती कशी काय चालली आहे ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी विधान परिषदेतील रेकॉर्ड काढून दाखवतो. या विषयाच्या संदर्भात त्या वेळी आज तुम्ही ज्या बाकावर बसलेले आहात त्याच बाकावर माहिती देण्यात आली होती, त्यावेळेस मी प्रेक्षक गॅलरीतून त्यावेळचे भाषण ऐकत होतो कारण त्यावेळेस मी विधानसभेचा सदस्य होतो एवढाच काय तो फरक होता. विजेच्या संदर्भात माननीय पवार साहेब विरोधी पक्ष नेता असतांना विजेच्या प्रश्नाच्या संदर्भात त्यांनी महाराष्ट्राची विजेची मागणी कशी वाढत जाईल, एनरॉनच्या प्रश्नावर तुम्ही राजकारण आणू नका, आर्थिक प्रश्न राजकीय दृष्टीने बघू नका असे टाहो फोडून सांगत असतांना, सगळयांच्या टीका-टिप्पण्या झेलत महाराष्ट्रात भविष्य काळात काय घडू शकेल यासंदर्भातील भूमिका पवार साहेबांनी मांडली होती. परंतु त्यावेळी चोहो बाजूने टीकेची झोड उठवली गेली. खेडया गावातील जत्रेत अंगाला तेल लावून एखादा पहिलवान नाचत नाचत यावा तसे आम्ही सत्तेत आलो तर एनरॉन अरबी समुद्रात बुडवू अशा राणा भीमदेवी थाटात घोषणा करत काही बहाद्दर मंडळींनी एन्रॉन अरबी समुद्रात बुडवला. संत तुकारामाची गाथा वर यावी तसे तिप्पट मोठे होऊन एन्रॉन महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसले. सुरुवातीला एका बाजूने एन्रॉन आवश्यकता नाही म्हणून भूमिका घेवून एन्रॉन बंद केले व पुन्हा ते तिप्पट मोठे केले. जादूई कामगिरी त्यावेळी एनरॉनच्या

.....2

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

बाबतीत झाली. आपण समोर बसला आहात म्हणून मी मुद्दाम स्पष्ट बोलतो परंतु अनेकांच्या बद्दल धड बोलताही येत नाही. यानंतर विजेच्या संदर्भात तज्ज्ञांचा एक अभ्यासगट नेमला गेला. गोडबोले साहेब महाराष्ट्राच्या विजेच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी आले व तज्ज्ञांनी रिपोर्ट दिला की, या राज्याची डिमांड अशा अशा पध्दतीने वाढत जाईल. अमक्या अमक्या प्रोजेक्टची आवश्यकता नाही. समोरच्या बाजूने टीका होत होती. तज्ज्ञ वेगळा सल्ला देत होते. मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेबांना मनापासून विनंती करतो की, तज्ज्ञांचे अंदाज चुकले, आपले अंदाज चुकले, फक्त खुर्चीचे अंदाज बरोबर आले होते. "महाराष्ट्राला विजेसाठी कटोरा घेऊन फिरावे लागेल" हे त्याच चेअरवरुन बोलले गेले होते. परंतु कधी कधी क्षुल्लक राजकारणासाठी नको त्या टीका केल्या जातात आणि चांगल्या भूमिका दबून टाकल्या जातात. विजेच्या संदर्भात त्याच वेळी इशारा दिलेला असतांना सुध्दा विजेच्या बाबतीत बोटचेपे धोरण स्वीकारले गेले आणि त्याचा परिणाम म्हणून आज एका मोठया संकटाला महाराष्ट्राला सामोरे जावे लागत आहे. 1993-94 साली आपला महाराष्ट्र गोवा, आंध्र, गुजरात, मध्यप्रदेश अशा चार राज्यांना वीज विकत होता. परंतु आता महाराष्ट्र 8 राज्याकडून वीज विकत घेत आहे अशी परिस्थिती आहे. ज्या राज्यांना महाराष्ट्र वीज विकत होता आज त्याच राज्याकडून महाराष्ट्राला वीज विकत घ्यावी लागत आहे. एखादी राजवट चुकीची आली तर त्यांची चूक दुरुस्त करण्यास किती कालावधी लागतो, आर्थिक प्रश्नामध्ये राजकारण आले तर आर्थिक घडी कशी फिसकटते याची प्रचीती आज महाराष्ट्र घेत आहे. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अगदी बरोबर आहे. या विषयाच्या संदर्भात उपाययोजना करण्याची राज्य सरकारची तयारी आहे. आज मुलांना अधांरात अभ्यास करावा लागतो ही वस्तुस्थिती कोणीही नाकारु शकत नाही. या पापामध्ये राज्यसरकार 60 टक्के दोषी असले तरी त्याही पाच वर्षामध्ये काहीही वीज तयार झाली नव्हती त्यामुळे 40 टक्के दोषी आपण सुध्दा आहात. जर 60 टक्के दोष मी स्वीकारावयास तयार असतांना आपल्याला सुध्दा 40 टक्के दोष स्वीकारावाच लागेल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

आपला साडेचार वर्षाचा कालावधी तसाच गेला होता. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हसत आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, पाच वर्षे देशातील उर्जा खाते आपल्याकडे होते परंतु एकसुध्दा केन्द्रीय विद्युत निर्मीतीचा प्रकल्प त्या काळात महाराष्ट्र राज्यात येऊ शकला नाही.परंतु आज श्री. सुशिल कुमार शिंदे यांनी महाराष्ट्राला दिलेली अतिरीक्त वीज पाहिल्यानंतर त्यांचे अभिनंदन करावेसे वाटते. या निमित्ताने मी आपल्याला एवढाच प्रश्न विचारु इच्छितो की, श्री.सुशीलकुमार शिंदे यांना नॅशनल ग्रीडमधून आज महाराष्ट्र राज्याला वीज देता येते परंतु श्री .गिते आणि श्री.प्रभू हे केन्द्रीय उर्जा मंत्री असतांना ही वीज राज्याला का मिळू शकली नाही.? श्री.सुशील कुमार शिंदे हे केन्द्रीय उर्जा मंत्री झाल्यानंतर एन्‍रॉन कंपनी केन्द्र सरकार घेऊन चालवू शकते आणि महाराष्ट्राला स्वस्त दराज वीज देऊ शकते . अशा प्रकारची गोष्ट आज घडू शकते परंतु हीच गोष्ट त्या वेळी का घडू शकली नाही. ? केन्द्रीय उर्जा मंत्री श्री. प्रभू हे एक कार्यक्षम मंत्री होते. मी सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत यांना सांगू इच्छितो की, श्री.प्रभू यांना मी आयुष्यात कधीही वैयक्तिक काम सांगितले नाही. परंतु एन्‍रॉनच्या प्रश्नाबाबत केन्द्र सरकारने पुढाकार घ्यावा आणि हा प्रकल्प सुरु करुन महाराष्ट्राला वीज द्यावी अशा प्रकारची विनंती मी स्वत: त्यांना केली होती. अशा प्रकारे मी त्यांना सांगितले होते किंवा नाही ही गोष्ट तुम्ही त्यांना खाजगीत विचारु शकता. आपण सत्तेत असतांना दुरगामीपणाने विचार करुन कोणतेही निर्णय घेतलेले नाहीत. विरोधकांचे काम खूप सोपे असते. त्यांना दोन्ही बाजूने ढोल वाजविता येतो. पाच एकरा पर्यंतचे कर्ज माफ करण्यात आले तर दहा एकरापर्यंतचे कर्ज माफ का करण्यात आले नाही ? दहा एकरापर्यंतचे कर्ज माफ करण्यात आले तर 20 एकरापर्यंतचे कर्ज माफ का करण्यात आले नाही ? ते कर्ज माफ करण्यात यावे अशी विरोधक मागणी करतात. कर्ज माफीची मर्यादा वाढविण्यात यावी अशी मागणी करणे फार सोपे असते. एक रुपयामध्ये तुम्ही झुणका भाकर कशी देणार आहात ? असे विचारण्यात आल्यावर मर्द असतील ते एक रुपयामध्ये झुणका भाकर देतील अशा प्रकारचे उत्तर त्यावेळी श्री. मनोहर जोशी यांनी दिल्याचे मला आठवते. त्यावेळी मी त्यांना असे विचारले की, "तुम्ही यामध्ये विशेष काय करीत आहात ? एक रुपयामध्ये तुम्ही झुणका भाकर देत आहात ." पंरतु आम्ही जर सत्तेत आलो तर एक रुपयामध्ये लोकांच्या तोंडात घास घालू असे सांगितले होते. सत्तेत नसतांना आश्वासने देणे सोपे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

असते. मी देखील विचारु शकतो की, "27 लाख नोकऱ्या कोठे गेल्या आहेत ? 40 लाख घरे कोठे गेली आहेत ? सभापती महोदय, सत्तेवर येण्यापूर्वी आपला वचननामा काय होता हे आपण वाचा व आठवा . आपण सत्तेवर आल्यानंतर त्यानुसार अंमलबजावणी करीत असतांना कोणत्या अडचणी येतात हे बारकाईने पहावे.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. त्या प्रश्नाच्या उत्तराची संपूर्ण् राज्याला अपेक्षा आहे. विजेची टंचाई अशीच ठेवून राज्यामधील उद्योगधंदे आणि शेती तसेच वीज ग्राहक यांचे जीवन सुखकारक होऊ शकत नाही. गेल्या तीन वर्षा पासून अत्यंत सक्षमपणाने विजेच्या बाबतीत जे काही निर्णय घेणे आवश्यक आहे ते निर्णय आम्ही घेतलेले आहेत आणि त्याचा परिणाम असा झाला आहे की परळी येथील 250 मेगॅवॅटसचे विद्युत निर्मितीचे केंद्र जून 2009 मध्ये सुरु होत आहे पारस येथील 250 मेगॅवॅटसचे विद्युत निर्मिती केन्द्र जून 2009 मध्ये पूर्ण् होत आहे, खापरखेडा येथील 500 मेगॅवॅटसचे विद्युत निर्मिती केन्द्र जून 2010 मध्ये पूर्ण होत आहे. भूसावळ येथील 1000 मेगॅवॅटसचे विद्युत निर्मिती केन्द्र ऑगस्ट 2008 मध्ये पूर्ण् होत आहे पुढच्या वर्षीच्या डिसेंबरपर्यंत 2000 मेगॅवॅटस विजेची भर महाराष्ट्रात पडणार आहे.परंतु एकंदर विजेची वाढती मागणी लक्षात घेंऊन कोराडी येथे 660 मेगॅवॅटसचे 3 संच, चंद्रपूर येथे 500 मेगॅवॅटसचे 2 संच सुरु करण्याच्या दृष्टीने या दोन्ही प्रकल्पाचे नियोजन केलेले असून काही दिवसातच या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात होणे अपेक्षित आहे. परळी, पारस आणि भुसावळ येथे अस्तित्वात असलेल्या विद्युत निर्मिती संचाची वाढ करुन 250 मेगॅवॅटस या प्रमाणे प्रत्येक संचातून अतिरिक्त वीज निर्मिती केली जाणार असून त्याचे देखील संपूर्ण नियोजन आज करण्यात आलेले आहे. भविष्य काळात कधी विजेची कमतरता निर्माण होऊ नये म्हणून अकराव्या पंचवार्षिक योजने अखेर राज्याला भार नियमनातून मुक्त करणारे धोरण राज्य सरकारने आखलेले आहे. जे.एस.डब्ल्यू.चे1200 मेगॅवॅटस ,आदानीचे 1980 मेगॅवॅटस , एम्कोचे 520 मेगॅवॅटस, वर्धा पॉवरचे 540 मेगॅवॅटस या प्रमाणे प्रकल्प उभारण्यात येणार आहे. पुढे निर्माण होणारी विजेची वाढीव मागणी लक्षात घेऊन दूरदृष्टी ठेवून अशा प्रकारे प्रकल्पाची उभारणी आणि निर्मितीची प्रक्रिया आज महाराष्ट्रात सुर करण्यात आलेली आहे.सभापती महोदय, अर्थात या प्रकल्पातून वीज निर्माण व्हावयाला काही वर्षाचा कालावधी लागणार आहे. आज जर आपण एखाद्या खेडयात गेलो तर तेथे दहा वीस शेतकऱ्यांचे विद्युत पंप असतात . परंतु सगळे गाव प्रत्यक्षात वीज वापरत असते . त्यामुळे सिंगल फेजीग केले आणि गावठाणाचे फिडर्स सेपरेट

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

केले तर गावामध्ये जास्त वीज मिळू शकेल. फिडर सेपरेशन करण्याच्या कार्यक्रमामध्ये 15 हजार 500 गावांचा पहिल्या टप्यात समावेश करण्यात आला होता आणि दुसऱ्या टप्यात 12 हजार 600 गावांचा सामावेश करण्यात आला होता. ही दोन्ही कामे जवळजवळ पूर्ण होत आलेली आहेत. त्यामुळे आज गावामध्ये मोठया प्रमाणावर वीज नसल्यामुळे सरसकट लोकांना विजेच्या संकटाला सामोरे जावे लागते

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ....

त्यातून काही प्रमाणात लोकांना रिलिफ मिळेल. शेतीसाठी काही ठराविक तास वीज मिळाली तरी गावांमध्ये ती जास्तीत जास्त काळ राहील अशा प्रकारे या फेडरेशनचे सेपरेशन करण्याचे काम, सिंगल फेजिंगचे काम अत्यंत गतीने सुरू आहे. आज विजेचा प्रश्न ऐरणीवर आला असला तरी नजिकच्या काळात यासाठी जे काही करता येणे शक्य आहे, जी महाग वीज विकत घेणे शक्य आहे ती देखील प्रसंगी विकत घेण्याची तयारी आपली आहे. तसेच खाजगी पॉवर आहे तिचाही प्रसंगी वापर करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. थोडक्यात सांगावयाचे तर विजेच्या टंचाईतून मुक्त होण्यासाठी असे जे काही मार्ग काढणे शक्य आहे त्या सगळ्या मार्गांचा अवलं करण्याची तयारी राज्य सरकारने दाखविली आहे. म्हणूनच लोकांनी देखील या बाबत थोडे सहकार्य केले तर ते सरकारला पाहिजे आहे. त्यासाठी मी सदनाला आणि सदनामार्फत जनतेला माहिती देऊन विनंती करीन की, आज देशामध्ये केवळ एक हजार मेगावॅट वीज ट्रेडेबल आहे. म्हणजे जास्तीत जास्त 1 हजार मे.वॅ. वीजेची देशात खरेदी-विक्री होऊ शकते आहे आणि काही राज्यांनी ती वीज बुक केलेली आहे. म्हणजे आपण कितीही रक्कम ती वीज खरेदी करण्यासाठी घेऊन गेलो तरी ती आपल्याला मिळू शकणार नाही. आज देशातील बहुतांश राज्यामध्ये विजेचे शॉर्टेज आहे. आज देखील वीज निर्मितीमध्ये आणि वापरामध्ये महाराष्ट्राचाच देशात वरचा क्रमांक आहे. याचाच दुसरा अर्थ असाही आहे की, विजेच्या बाबतीत दुसऱ्या राज्यांची परिस्थिती आपल्यापेक्षाही चिंताजनक आहे. सभापती महोदय, आज पंजाबची तूट पाहिली तर ती 22 टक्के आहे, राजस्थानची 15 टक्के आहे, मध्य प्रदेशची 15.6 टक्के आहे. जवळपास सगळीच राज्ये विजेच्या बाबतीत तुटीची आहेत. त्यामुळे बाहेरून वीज मिळविणे देखील शक्य होत नाही. तेव्हा या अडचणीतून बाहेर येण्यासाठी लोकांनीही सरकारला सहकार्य दिले पाहिजे. विजेचे वेस्टेज आता या राज्याला काही काळ तरी परवडणारे नाही म्हणून आवश्यकता नसतानाही मोठे दिवे लावणे, मोठमोठ्या जाहिराती करणे, कार्यालय बंद असतानाही कार्यालयातील दिवे चालू ठेवणे, हे प्रकार आपण सगळ्यांनीच, जनतेने टाळल्या पाहिजेत. सभापती महोदय, राज्यासमोरच नाही तर संपूर्ण देशासमोर आज विजेचा प्रश्न आहे आणि त्यामुळे या बाबतीत मार्ग निघेपर्यंत लोकांनी देखील सहकार्य करण्याची भूमिका घेतली तर ही अडचण थोडी लवकर संपू शकेल.

...... जेजे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा : एनटीपीसी मौदा येथील जो प्रोजेक्ट नागपूर येथे आहे त्याचा उल्लेख आपण केला नाही...

श्री.आर.आर.पाटील : ठीक आहे, आपले स्टेटमेंट माझ्या भाषणात मी समाविष्ट करून घेतो. ... सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब गव्हाच्या प्रश्नावर फार बोलले. खूप गहू त्यांनी चघळला. त्याद्वारे त्यांनी माननीय श्री.शरद पवार यांच्यावर टीका केली. मी आता आणखी टीका करीत नाही, पण जेव्हा शेतीतील न कळणारी माणसे सत्तेवर येतात तेव्हा ती पुढचा दूरदृष्टीने कधी विचार करीत नाहीत. आपण लोकसभेमध्ये खासदार असताना चर्चा ऐकली होती की, एकेकाळी या देशात अशी परिस्थिती होती की देशातील कोठारे धान्याने भरलेली होती आणि या धान्याचे काय करायचे हा प्रश्न देशासमोर होता. त्याचवेळी आपले लोक सत्तेवर आले. शेतकऱ्याला दिलासा देणारी धोरण कधी तेव्हा तुम्ही घेतली नाहीत. त्याचा परिणाम म्हणून अन्य धान्याच्या पिकापासून शेतकरी दुसऱ्याच पिकांकडे वळला. केंद्रामध्ये श्री.अटलबिहारी बाजपेयी यांच्या नेतृत्त्वाखालील सरकार सत्तेवर आले तेव्हा गव्हाची किंमत 580 रूपये क्विंटल होती. त्यांचा चार वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर जेव्हा त्यांनी सत्ता सोडली तेव्हा गव्हाची किंमत ही 630 रूपये होती. म्हणजे एवढ्या कालावधीत गव्हाला शेतकऱ्यांना वाढ म्हणून केवळ 50 रूपये वाढ करून दिली गेली होती.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्यावेळी गॅसची किंमत 100 रूपये होती. त्या काळात आणि त्यानंतरच्या काळात महागाई ज्या प्रमाणात वाढली त्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या मालाच्या किंमती वाढल्या किंवा वाढल्या नाहीत हे आपण जरा समजावून सांगितले तर बरे होईल. त्या काळात गॅस 100 रूपयामध्ये मिळत होता. गव्हाला 500-600 रूपये भाव मिळाला असला तरी त्या काळात पेट्रोलचा दर काय होता ? खाद्यतेलाचा भाव काय होता ? डिझेलचा काय भाव होता ? याचीही तुलना आपण करावी. केवळ गव्हाचीच नुसती तुलना करू नका. सभापती महोदय, मी परवा सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांच्या भाषणाच्या वेळी सभागृहात नव्हतो. त्यामुळे ते तेव्हा काय बोलले हे मला माहिती नाही. परंतु केवळ त्यांच्याच भाषणावर मंत्र्यांना बोलावयाचे असेल तर त्यांनी सर्वच गोष्टींची तुलना केली पाहिजे.

..... जेजे 3 ...



KBS/ KTG/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 16:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कोठल्याही देशाच्या पाच वर्षाच्या इतिहासामध्ये फक्त 50 रूपये वाढ ही आपल्याच काळात झाली. त्या अगोदरही स्वस्ताई होती, सगळ्याच बाबतीत होती. पण वाढ मात्र अनेकदा 50 पेक्षा अधिक राहिली.

( यानंतर श्री. सरफरे .....केके 1 ...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

सभापती महोदय, तुलनेमध्ये गेल्या चार वर्षात केंद्र सरकारने गव्हाच्या किंमतीमध्ये 370 रुपयांची मोठी दरवाढ देण्याची भूमिका घेतली. या देशाच्या इतिहासामधील पंच वार्षिक योजनेमध्ये अशाप्रकारची टक्केवारीमध्ये वाढ देण्याचा कधीही निर्णय घेतला गेला नव्हता. माझी निश्चितपणे खात्री आहे की, अशा पध्दतीने वाढ दिल्यामुळे देशातील शेतकरी भविष्यात गव्हाचे उत्पादन करतील आणि केंद्र सरकारवर गहू आयात करण्याचा प्रसंग येणार नाही. गेल्या चार वर्षापूर्वी शेतकऱ्याला कधीही मदत न करण्याची भूमिका त्यावेळच्या शासनाने घेतल्यामुळे लोकांच्या दोन वेळा चूली पेटल्या पाहिजेत म्हणून नाईलाजास्तव गहू आयात करावा लागला होता. या पापाचे दातृत्व कुणीतरी स्वीकारले पाहिजे...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. गव्हाच्या विषयावर बोलत असतांना देशामध्ये नवीन केंद्रीय कृषी मंत्री आल्यानंतर आपल्या धोरणामध्ये बदल झाला आणि त्याचा परिणाम म्हणून या देशाच्या सरकारला जनावरेसुध्दा खाणार नाहीत असा सडका लाल गहू, आयात करुन कां आणावा लागला? आणि तो जबरदस्तीने स्वस्त धान्याच्या दुकानांवर वाटण्यात आला त्याबाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कां केला नाही?

श्री. आर. आर. पाटील : माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी गव्हाचा विषय खूप चघळला म्हणून त्याबाबत मला उत्तर द्यावे लागले. त्यांच्या सरकारने शेतकऱ्यांना मदत न दिल्यामुळे नासका, कुजका लाल गहू आयात करावा लागला. त्यामुळे निश्चितपणे या पापाचा बाप निश्चित केला पाहिजे आणि त्याचे दातृत्व आपण स्वीकारले पाहिजे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार दिल्लीमध्ये होते त्यावेळी मी शेतकरी होतो. गहू, तांदूळ पेरणाऱ्या शेतकऱ्यांनी दुसऱ्या पिकाकडे वळले पाहिजे असे माननीय श्री. शरद पवार साहेबांनी चार वर्षापूर्वी सांगितले होते. तेव्हा चार वर्षापूर्वी शेतकरी दुसऱ्या पिकाकडे वळल्यामुळे आता गव्हाचा तुटवडा निर्माण झाला आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण बघितल्यानंतर वर्धा, यवतमाळ, नांदेड, पुसद, धुळे, शिरपूर, इंदूर हा 462 किलोमीटरच्या नवीन रेल्वे मार्गाला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. त्या खर्चामध्ये राज्य सरकारने आपला हिस्सा देण्याचे कबूल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

केले आहे. एवढया मोठया प्रमाणावर केंद्र सरकारच्या बजेटमध्ये पहिल्यांदा आपला प्रोजेक्ट स्वीकारला जात आहे. अशाप्रकारे महाराष्ट्राच्या दळण वळणामध्ये चांगली भर पडणार आहे. तसेच, सर्वसामान्य लोकांना जलद न्याय मिळाला पाहिजे म्हणून हायकोर्टातील न्यायाधीशांची संख्या 64 वरुन 75 करण्याचा निर्णय घेतला आहे. आपण आधुनिकीकरणापासून बाजूला राहू शकत नाही. महाराष्ट्र राज्याला प्रगती करावयाची असेल तर आधुनिक तंत्रज्ञान प्रशासनामध्ये व राज्यामध्ये आणले पाहिजे. म्हणून सन 2008 हे वर्ष ई-गव्हर्नन्स, डिजिटल महाराष्ट्र करण्याचे ठरविले आहे. हे महाराष्ट्र राज्य अत्याधुनिक सुविधा व तंत्रज्ञानाच्या बाबतीत या देशामध्ये नेहमी पुढे असते. आणि भविष्यात ते अधिक पुढे राहिले पाहिजे अशी भूमिका शासनाने घेतली आहे. राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था चांगली रहावी व पोलिसांवरील ताण कमी झाला पाहिजे यासाठी 55 हजार अतिरिक्त पोलीस कर्मचारी भरण्याचा निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे दर वर्षी 11 हजार याप्रमाणे गेल्या दोन वर्षामध्ये 22 हजार कॉस्टेबल मेरिटवर भरण्यात आले आहेत. या वर्षी सुध्दा राज्य सरकारने आणखी 11 हजार कॉस्टेबलची भरती करण्याचे ठरविले आहे. तेव्हा एका बाजूने न्यायाधीशांची संख्या आणि दुसऱ्या बाजूने पोलिसांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे गाव पातळीवरील न्याय निवाडयाची पध्दत पुर्नजीवित करण्यासाठी महात्मा गांधी तंटा मुक्त गाव मोहीम या नावाने राज्य शासनाने योजना सुरु केली. त्यामुळे यावर्षी महाराष्ट्रामध्ये 500 गावे तंटामुक्त होतील अशी ही योजना करतांना आम्हाला वाटले होते. आज राज्य सरकारला यासंबंधी निधी देत असतांना आमच्यासमोर मोठा प्रश्न उभा रहावा एवढे मोठे काम या योजनेव्दारे झाले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामधून या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. राज्य सरकारच्या अंदाजापेक्षा पाच पट गावे राज्यात तंटामुक्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

काही जिल्हे असे आहेत की, एकूण जिल्हयामध्ये असणाऱ्या तंटयाच्या 65 टक्के तंटे हे लोकांनी गावपातळीवर तडजोड करुन न्यायालयातून परत घेतलेले आहेत. एका बाजूने गावा-गावातील वातावरण चांगले होण्यास सुरुवात झालेली आहे.

सभापती महोदय, आपण महाराष्ट्रामध्ये "निर्मल ग्राम योजना" सुरु केली होती. त्यामध्ये पहिल्या वर्षी देशामध्ये एकंदर 39 गावे आली, त्यापैकी महाराष्ट्रातील 13 गावे होती. या योजनेमध्ये महाराष्ट्रातील 1/3 गावे आली या गोष्टीचा महाराष्ट्राला अभिमान होता. आपले 13 गावातील सरपंच माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते पारितोषिक स्विकारण्यासाठी दिल्लीला गेले होते. दुसऱ्या वर्षी देशस्तरावर 760 गावे आली, त्यापैकी 350 गावे महाराष्ट्रातील होती आणि यावर्षी 6011 गावे निर्मल बनत आहेत. पहिल्या वर्षी देशाच्या 1/3, दुसऱ्या वर्षी निम्मी आणि यावर्षी देशातील गावांपेक्षा 75 टक्के गावे ही महाराष्ट्रातील असणार आहेत. आतापर्यंत प्रत्येक गावातील सरपंचांना स्वत:माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार दिला गेला आहे. आता महाराष्ट्रातूनच 6000 सरपंच पुरस्कार घेण्यासाठी जाणार असतील तर यांना पुरस्कार देण्यासाठी दिल्ली सुध्दा कमी पडेल एवढे मोठे आव्हान स्वच्छतेच्या बाबतीत चांगले काम करुन महाराष्ट्र राज्याने निर्माण केलेले आहे. आजही महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये चांगुलपणा किती ठासून भरलेला आहे याचीच यातून प्रचिती येते.

महाराष्ट्रामध्ये प्रयत्नांची पराकाष्टा केल्यानंतर सुध्दा क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रमाण कमी राहिलेले आहे. पण याला महाराष्ट्राची भौगोलिक कारणे आहेत. असे असले तरी सुध्दा विदर्भाला पॅकेजेस व्दारे आर्थिक मदत देऊन खरा दिलासा मिळणार नाही. फुंडकरसाहेब, मला वर्तमानपत्रामधून तुमचे एखादे अभिनंदनाचे स्टेटमेंट वाचावयास मिळावे यासाठी मी आतूर होतो. मी आपल्याकडूनच थोडीशी अपेक्षा व्यक्त करु शकतो. गोसीखूर्द प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून दर्जा मिळाल्यामुळे फक्त चार वर्षामध्ये 7777 कोटी रुपयांचा हा प्रकल्प पूर्ण होणार आहे आणि विदर्भातील अडीच लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. यामध्ये केंद्र शासनाने मोठा हिस्सा उचलण्याचे ठरविले आहे. मागच्या चार वर्षामध्ये 11 हजार कोटी रुपये खर्च करुन 4 लाख हेक्टरने महाराष्ट्राची सिंचन क्षमता वाढविण्यासाठी जलसंपदा विभागाला यश मिळालेले आहे. शेतीला आणि शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या या भूमिका निश्चितच अभिनंदनीय आहेत. पण ज्यांनी

. . . .2 एल-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कधी शेतकऱ्यांच्या तोंडावर दोन पैसे, दोन कवडया सुध्दा फेकल्या नव्हत्या, तेच ज्यावेळी फार पुळका काढून बोलत आहेत. पण आजकाल बोलणाऱ्यांच्या एरंडया विकल्या जात आहेत, पण न बोलणाऱ्यांचे गहूही विकले जात नाहीत, चांगले असले तरी देखील विकले जात नाहीत. मी या निमित्ताने एवढेच सांगेन की, राज्य शासनाने जेवढे केले आहे, तेवढेच आम्ही जनतेसमोर ठेऊ. केंद्र शासनाने महाराष्ट्राला जे काही दिले आहे, तेही लोकांसमोर ठेऊ. या अर्थसंकल्पावर दिल्ली मध्येही टीका झाली आहे. हा अर्थसंकल्प निवडणुका डोळयासमोर ठेऊन मांडला आहे असे सांगण्यात आले. होय. सत्तेतील माणसे मग ती दिल्लीतील असू दे किंवा मुंबईतील असू दे, निरपेक्षपणे काम करण्यासाठी कोणतेही पक्ष हे साधु-सन्यासांचे बनलेले नाहीत. जे पक्ष साधु-सन्यासांचे आहेत, ते सुध्दा सत्तेवर आल्यानंतर कसे वागले आहेत आणि किती बिघडलेले आहेत याची संपूर्ण जगाने प्रचिती घेतलेली आहे. म्हणून राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाने घेतलेले निर्णय हे निवडणुका डोळयासमोर ठेऊन घेतले असतील तर ते फार काही चुकीचे केले आहे असे मी मानत नाही. पण गोरगरीब माणूस आणि आम आदमी यांना केंद्र बिंदू मानून घेतलेले हे निर्णय आहेत. या निर्णयामुळे काहींना स्वप्न पडत होती की, आता आपले जमेल. हा काहीजणांचा झालेला स्वप्नभंग त्यांना वैफल्यग्रस्त बनविणारा आहे हे सुध्दा तितकेच खरे आहे. पण आमचे सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी एक गोष्ट सांगितली होती. मी महाराष्ट्रामधील प्रत्येक सभेमध्ये ती गोष्ट सांगितली आणि लोकांनी देखील आवडीने ऐकली. त्यांची ओरिजनल गोष्ट आहे. अलिकडच्या काळातील तुम्ही शेतकऱ्यांसाठी घेतलेली झटण्याची भूमिका आम्हाला भावत होती. तुम्ही शेतकऱ्यांसाठी काढलेले मोर्चे आम्हाला आवडत होते. तुम्ही शेतकऱ्यांसाठी मारलेले हंटर, आम्ही हसत होतो पण तरीसुध्दा योग्य वाटत होते. शेतकऱ्यांसाठी काही केले पाहिजे या तुमच्या भूमिका आणि भावना या निश्चितच बरोबर होत्या. पण काही लोकांच्या या भूमिका सत्तेमध्ये नसताना असतात. पण सत्तेमध्ये असताना काय भावना असतात ? त्या मी सुरुवातीला वाचून दाखविल्या आहेत. त्यामुळे भाषणाच्या शेवटी मी पुन्हा एकदा सुरवातीसारखे वातावरण करु इच्छित नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) MM-1

RDB/ SBT/ KGS/ MMP/ KTG/ पूर्वी सौ. रणदिवे 16:55

श्री. आर. आर. पाटील......

सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी सांगितलेली गोष्ट अशी आहे की, एकदा लक्ष्मी आणि शनी दोघेही एकाचवेळी देवापुढे येऊन उभे राहतात आणि देवाला प्रश्न विचारतात की, आमच्यापैकी सुंदर कोण आहे ते सांगावे. देवाला प्रश्न पडला. लक्ष्मीला सुंदर म्हटले तर शनी मागे लागेल आणि शनीला सुंदर म्हटले तर लक्ष्मी पाठ फिरवून निघून जाईल. नंतर देवाने लक्ष्मीला सांगितले की, तु पुढे ये आणि शनीला सांगितले की, तू पाठीमागे जा. मग देवाने शनीला सांगितले की, तू जाताना चांगला दिसतोस आणि लक्ष्मीला सांगितले की, तू येताना चांगली दिसतेस. आपली भूमिका, आपली भाषणे विरोधी पक्षात असताना चांगली असतात आणि सत्तेवर आल्यानंतर आपण बिघडता. जे लोक सत्तेवर आल्यानंतर बिघडतात त्यांच्या हातामध्ये सत्ता देऊन ती बिघडणार नाही याची दक्षता महाराष्ट्रातील जनता जरुर घेईल. आपल्यातील चांगूलपणाचा लोकशाहीसाठी वापर व्हावयाचा असेल तर आपण सध्या आहात त्याच बाजूला अत्यंत प्रभावीपणे काम करीत आहात आणि करत राहा. आपण वाट बघत राहा. आम्ही शेतकऱ्यांसाठी करत राहू. आम्ही लोकांना देऊ परंतु जाणार मुळीच नाही असे ठासून सांगतो आणि धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

**तालिका सभापती ( श्री. उल्हास पवार )** : आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय उपमुख्यमत्र्यांनी सुरुवातीला शेतकऱ्यांच्या आत्महत्येंबाबत आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत सांगितले. मी त्यांचे संपूर्ण भाषण ऐकत होतो. ज्या दिवशी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरु झाली त्या दिवशी मी या ठिकाणी उपस्थित नव्हतो त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब काय बोलले, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब काय बोलले, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेब काय बोलले हे मला माहीत नाही. आपण या ठिकाणी चर्चेला उत्तर देत असताना आपण सांगितले की, 5 एकर पर्यंतच्या शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. पण विदर्भातील सहा जिल्ह्यात जे कोरडवाहू शेतकरी आहेत त्यांचे जमिनीचे होल्डिंग जास्त आहे त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा लाभ कमी होणार आहे. त्यासंबंधी आपण खुलासेवार उत्तर दिलेले नाही. माझ्याकडे लोकमत वर्तमानपत्राचा अंक आहे. हा आपलाच पेपर आहे. त्यामध्ये सर्व उत्तरे दिलेली आहेत. विदर्भातील कोरडवाहू शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंबंधी नीट खुलासा झालेला नाही. ते आपण केंद्र सरकारवर ढकलले आहे. दुसरी बाब अशी की, आपण अवैध सावकारीसंबंधी सभागृहाच्या बाहेर वल्गना केल्या. कर्जमाफी झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी श्री. शरद पवार साहेबांनी सांगितले की, सावकारांचे कर्ज देऊ नका. तिसऱ्या दिवशी आपण सांगितले की, सावकारांनी पंधरा दिवसाच्या आत शेतकऱ्यांची जमीन परत करावी. आपण घोषणा करुन मोकळे झालात. महाराष्ट्रातील एकाही सावकाराने कोणत्याही शेतकऱ्याची जमीन परत केलेली नाही. गेली तीन वर्षे आपण सावकारी कायदा विधानसभेत आणतो असे बोलला परंतु अजूनपर्यंत सावकारी कायदा महाराष्ट्रामध्ये आणला गेला नाही. माननीय आबासाहेब, आपण अतिशय चांगल्या पध्दतीने भाषण करता. आपली बाजू चांगल्या पध्दतीने मांडता. आपण जर हायकोर्टामध्ये किंवा सुप्रीम कोर्टामध्ये वकील असता तर कदाचित या देशातील वकिलांचा उच्चांक मोडला असता आणि आपण एक नंबरवर राहिला असता. आपण ज्या ज्या घोषणा केल्या त्या घोषणांसबंधी आपण काही बोलला नाही. आपण या ठिकाणी वेगळेच भाषण केले. आपण या दोन तीन गोष्टींसबंधी या ठिकाणी खुलासा केला तर योग्य होईल्. विदर्भातील 5 एकरच्या वरच्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे काय आणि सावकारी कायदा आणण्यासंबंधी काय करणार यासंबंधी आपण खुलासा केला तर बरे होईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : गोसीखूर्द प्रकल्पाबाबत मी माझ्या भाषणामध्ये उल्लेख केला होता. गेली कित्येक वर्षापासून तो प्रकल्प प्रलंबित राहिलेला आहे. आता त्याला भारत सरकारची मान्यता घेतली हे चांगले काम केले आहे. परंतु तो प्रकल्प वेळेवर होईल काय असा प्रश्न आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....
मी अभिभाषणातील प्रत्येक मुद्याला अनुसरुन भाषण केले होते.

श्री.आर.आर.पाटील : माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी गोसीखूर्द प्रकल्पाचा उल्लेख केला होता. परंतु माननीय विरोधी पक्ष नेते हे विदर्भातील आहेत आणि गोसीखूर्द प्रकल्प सुध्दा विदर्भात असल्यामुळे विदर्भातील अनेक लोकप्रतिनिधी या प्रकल्पासंबंधी बोलले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : ज्यावेळी केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर झाला आम्ही बाहेरगावी होतो. केंद्रीय बजेटमध्ये गोसीखूर्द प्रकल्पाचा उल्लेख झाल्यामुळे मी केंद्र सरकारचे अभिनंदन केले आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विदर्भामध्ये होल्डिंग एरिया जास्त आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळी भाग जास्त आहे. कोकणामध्ये डोंगरी भाग आहे, तेथील लोकांच्या नावावर क्षेत्र जास्त आहे. ते देखील जमीन कसत आहेत. असे लोक या योजनेपासून वंचित राहिले असतील. परंतु त्यांना लाभ देण्यासंबंधी सरकारने आजच भूमिका घेणे योग्य होणार नाही. केंद्र सरकारकडून महाराष्ट्राच्या वाटयाला किती मदत मिळणार आहे त्याबाबतची माहिती अधिक स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारकडून राज्याला किती पैसा मिळणार आहे ते आपण पाहू. त्यानंतर या शेतक-यांसाठी केंद्र सरकारने आणखी मदत देऊ केली आणि राज्य सरकारला हिस्सा टाकण्यास सांगण्यात आले तर राज्य सरकार जे या लाभापासून वंचित राहिले आहेत अशा शेतक-यांसाठी काही तरी मदत देण्याची भूमिका निश्चित घेईल. समजा केंद्र सरकारने तशी भूमिका घेतली नाही तर जे शेतकरी लाभापासून वंचित राहिले आहेत त्यांच्यासाठी काही ना काही निश्चित मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी खाजगी सावकाराचा मुद्दा मांडला आहे. सावकारीच्या प्रश्नासंबंधी आपल्या इतकीच माझ्याही भावना तीव्र आहेत. सरकारने आतापर्यंत 1700 सावकारांविरुध्द कारवाई केलेली आहे. देशामध्ये सर्वात अधिकची ही कारवाई आहे. आपल्याला अधिकार असोत नसोत, पण पोलिसांनी केवळ माझ्या सूचनेमुळे अनेक सावकारांना अटक केली आहे. माननीय सदस्य ज्यांचा उल्लेख करीत आहेत त्यांनी अटकपूर्व जामीन घेतल्यामुळे पोलिसांना अटक करता आलेली नाही. तरी सुध्दा 3 केसेसमध्ये संबंधितांविरुध्द चार्जशीट दाखल केलेली आहे, त्याबाबत पक्षभेद केलेला नाही. परंतु हे सावकार

2....

श्री.आर.आर.पाटील......

सापडत नाहीत. त्यामुळे सरकारने सावकारीसंबंधी कायदा करण्याचे ठरविले आहे. विदर्भामध्ये काही सावकारांनी तर कास्तकारांकडून मृत्यूपत्र लिहून घेतले आहे. सर्व जमीन त्यांच्या नावावर आहे. काही सावकारांनी जमिनींचे खरेदीखत करुन घेतले आहे. शेतक-यांच्या जमिनी सावकारांच्या नावावर आहेत. शेतकरी जमीन कसत असला तरी 7/12 वर आपले नाव लावून घेतले आहे. काही ठिकाणी रेडिरेक्नरचे दर दिलेले नाहीत, तरी सुध्दा जमिनी खरेदी केलेल्या आहेत. सावकारांनी जास्तीत जास्त मध्यवर्ती बँकांच्या व्याज दरा एवढे व्याज घ्यावे अशा सूचना आहेत. परंतु त्यापेक्षा जास्त दराने सावकार व्याज घेत आहेत. महाराष्ट्रामध्ये सावकारांना पकडले असून यामध्ये 100 रुपये कर्ज घेतले असेल तर महिन्याला 10 रुपये व्याज आकारणा-या सावकारांचा सुध्दा समावेश आहे. म्हणजे वर्षाला 120 टक्क्याप्रमाणे व्याज घेणा-या सावकारांना राज्यात पकडण्यात आले आहे. मध्यवर्ती बँकेच्या दरापेक्षा जादा दराने व्याज आकारणारे सावकार आहेत, शेतकरी जमीन कसत असतानाही त्याची जमीन आपल्या नावावर करुन घेणारे सावकार आहेत, त्याला पायबंद घालण्यासाठी सहकार विभागामार्फत कायदा केला जात आहे. त्या कायद्याची प्रक्रिया जवळजवळ पूर्ण होत आली आहे. हा कायदा लवकरच केला जाईल. विदर्भातील ज्या शेतक-यांना लाभ मिळालेला नाही त्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने हा कायदा करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. या कायद्याचा भाग म्हणून या सावकारांच्या विरोधात तालुका स्तरावर सर्वपक्षीय समित्या गठित केल्या जातील. त्यामध्ये काही अधिका-यांचाही समावेश केला जाईल आणि सध्या डी.डी.आर.यांना पुरेसे अधिकार नसल्यामुळे नवीन कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्तावित कायद्यात कडक तरतुदी केल्या जातील. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझ्या भाषणाबद्दल वक्तव्य केले. मी माझ्या भाषणातून वस्तुस्थिती मांडली आहे. जे सत्य आहे ते सांगत होतो. आपण म्हटले की, मी कोर्टात असतो तर वकिलांमध्ये क्रमांक 1 वर असतो. परंतु मी येथे तर क्रमांक 2 वर आहे. मी वस्तुस्थिती सांगितली आहे. केवळ भाषण करण्याच्या भूमिकेतून मी बोललो नाही. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे दोन्ही मुद्दे मी स्वीकारलेले आहेत. याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

------

यानंतर श्री.शिगम....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2007-2008च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

**तालिका सभापती** : पुरवणी मागण्यावरील चर्चा आज व मंगळवार, दिनांक 18 मार्च 2008 रोजी घ्यावयाची आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पुरवणी मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमाक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना साांगवयास नकोच.

कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यावरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**<u>विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या</u>**

**तालिका सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

1) मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - ए-1,ए-4,ए-6,एफ-3,जे-1,जे-2, एन-1,क्यू-1,क्यू-2,क्यू-3, आणि क्यू-4
2) सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एच-5,एच-8,
3) ग्रामविकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एल-1 व एल-2
4) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक जी-3, जी-5, जी-6, जी-10, ओ-7, ओ-8, आणि ओ-9
5) पणन, रोजगार हमी योजना, संसदी कार्य, महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एक्स-1 व एक्स-2
6) कृषि, जलसंधारण व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - डी-4, डी-9 व एल-3

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

7) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - आर-1 व आर-2

8) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - टी-1, टी-2, टी,-3, टी-4,टी-5 व टी-6

9) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2, एम-3 व एम-4

सभागृहाची वेळ 6.00 वाजेपर्यन्त वाढविण्यात आलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरलेले आहे की, सायंकाळी 6.00 वाजल्यानंतर सभागृहाचे कोणतेही कामकाज होणार नाही.

श्री. जयंत पाटील : राज्याच्या हिताच्यादृष्टीने ही चर्चा चांगली झाली पाहिजे यासाठी सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवावी अशी माझी विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : पुरवणी मागण्या अथवा कोणताही विषय असला तरी सायंकाळी 6.00 नंतर या सदनामध्ये कोणीही बसणार नाही असे आम्ही कामकाज सल्लागार समितीमध्ये सांगितलेले आहे.

**तालिका सभापती** : माननीय वित्त मंत्र्यांनी केलेली सूचना स्वीकारायला हरकत नाही. आपण 6.00 वाजेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविलेली आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी आपले भाषण सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2007-2008च्या पुरवणी मागण्यांवरील विभागनिहाय चर्चा आज सुरु झालेली आहे. या चर्चेची सुरुवात मी करीत आहे. आज जे विभाग आहेत त्यामधील पहिला विभाग हा माननीय मुख्यमंत्र्यांचा आहे.

बाब क्रमांक 2 - माहिती व तंत्रज्ञान संचालनालय कार्यालयासाठी मंत्रालयात सातव्या मजल्यावर नवीन बांधकाम करणे - असा विषय आहे. मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर काय काय कामे चालतात याची मला माहिती नाही. परंतु यापूर्वीच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी देखील हा प्रश्न मी उपस्थित करुन सांगितले होते की मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर जी जी बांधकामे झ ाालेली आहेत त्याची सर्व माहिती आम्हाला द्यावी. आम्हाला अशी निश्चित माहिती मिळाली होती की दुपारी किंवा संध्याकाळी त्या मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर नमाज पढण्यासाठी जागा दिलेली आहे, शेड बांधलेली आहे. त्याबाबत सदनामध्ये माहिती विचारली होती.

...नंतर श्री. गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

परंतु ती माहिती राज्य सरकारने अजूनपर्यंत दिली नाही. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या कार्यालयासाठी मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर नवीन बांधकाम करणे यासंबंधीची ही बाब आहे. मी या बाबीच्या अनुषंगाने मघाशी जो मुद्दा उपस्थित केला, त्यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 4, बृहन्मुंबई क्षेत्रासाठी राज्य माहिती आयुक्त कार्यालय स्थापन करणे या विषयाची आहे. बृहन्मुंबई क्षेत्रासाठी राज्य माहिती आयोगाचे कार्यालय स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असून त्यासाठी काही पदांची निर्मिती करण्यात आली आहे. शासनाने अतिशय चांगला निर्णय घेतलेला आहे. या राज्यात माहितीचा अधिकार कायदा अस्तित्वात आलेला आहे. माहितीच्या अधिकाराची प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहेत याची शासनाला देखील जाणीव आहे. माहितीच्या आधारे माहिती मिळविण्यासाठी हजारो अर्ज विविध खात्यांकडे प्रलंबीत आहेत. विचारलेली माहिती या कार्यालयांकडून वेळेवर मिळत नाही. विभागांकडून माहिती मिळावी म्हणून काही व्यक्ती हायकोर्टात देखील गेल्या आहेत. हा कायदा अस्तित्वात आला. तद्नंतर या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किती कर्मचारी लागतील यासंबंधी सामान्य प्रशासन विभागाने पूर्वीच काळजी घेतली पाहिजे होती. परंतु कर्मचारी निर्मितीच्या बाबतीत काळजी घेतली गेली नाही म्हणून आज पदे निर्मितीची पूरक मागणी मंजुर करुन घेण्याची वेळ आली आहे. पदे निर्मितीसंबंधीचा आढावा सामान्य प्रशासन विभागाने आधीच का घेतला नाही यासंबंधीचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक-5 मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च भागविण्यासाठी 13 कोटी 33 लाख 30 हजार रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. हा अधिक खर्च मुख्यत्वेकरुन महागाई भत्त्याच्या दरात झालेली वाढ, कार्यालयीन खर्च आणि देशांतर्गत प्रवास खर्च यासाठी करण्यात आलेला असून तो खर्च भागविण्यासाठी ही पूरक मागणी सभागृहासमोर मांडण्यात आली आहे. महागाई भत्त्यात झालेली वाढ, कार्यालयीन खर्च, देशांतर्गत प्रवास खर्च इत्यादी बाबीसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जात असते. या बाबीवर खर्च करण्यासाठी आकस्मिकता निधी का खर्च केला गेला याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

.....2....

श्री. मधुकर सरपोतदार....

सभापती महोदय, कृषि, पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाची बाब क्रमांक 24 - सूक्ष्म सिंचन योजनेअंतर्गत अर्थसहाय्याची तरतूद करणे या विषयाची आहे. राज्यात 80:20 या प्रमाणात सूक्ष्म सिंचन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी, भारत सरकारने रुपये 85 कोटी 24 लाख 95 हजार इतकी रक्कम दिली आहे. राज्याचा हिस्सा म्हणून रुपये 21 कोटी 26 लाख 1 हजार इतक्या एकूण हिश्शापैकी अर्थसंकल्पात करण्यात आलेली रुपये 10 कोटी 2 लाख इतकी तरतूद अपुरी असल्याचे आढळून आले आहे. म्ळणून अर्थसंकल्पात रुपये 21 कोटी 24 लाख 1 हजार इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. आकस्मिक निधीचा विनियोग कोणकोणत्या प्रयोजनासाठी करावा यासंबंधी मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत. केवळ अर्थसंकल्पातील तुट भरुन काढण्यासाठी आकस्मिक निधीचा विनियोग करणे हे बरोबर नाही. म्हणून या अनुषंगाने माझी शासनास सूचना आहे की, मूळ अर्थसंकल्प सादर करताना प्रत्येक बाबीवर भरीव तरतूद केली पाहिजे. या बाबीसाठी आकस्मिक निधीचा वापर का केला गेला याही गोष्टीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ 17:15

श्री. मधुकर सरपोतदार ....

सभापती महोदय, यानंतर बाब क्र. 25 बाबत मला बोलावयाचे आहे. बियाण्यांचा गुणात्मक दर्जा वाढविणे व शेतीच्या मूलभूत सुविधांचा विकास करणे यासाठी अर्थसहाय्य या शीर्षकाखाली ही पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. कृषी खात्याचा हा विषय आहे. सध्या बाजारामध्ये बोगस बियाण्यांचे जबरदस्त पीक आलेले आहे. बियाणे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही. त्यामुळे गरीब शेतकरी अशा प्रकारचे बोगस बियाणे खरेदी करतात आणि त्यांची फसवणूक केली जाते. शेवटी शेतकरी आत्महत्या करतो. म्हणून संपूर्ण राज्यात कृषी खात्यामार्फत योजना राबवून कुठेही बोगस बियाणे विकले जाणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. सभापती महोदय, बाब क्र. 26 पशुसंवर्धन विभागाशी संबंधित आहे. यासाठी 68 लाख 23 हजार रुपयांची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. पशुधन विकास अधिकाऱ्यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे त्यांच्या वेतन व भत्ते यासाठी खर्च दाखविण्यात आला असून त्यासाठी ही पूरक मागणी आहे. नव्याने कोणते अधिकारी नेमले याची माहिती मिळणे आवश्यक आहे. ही धोरणात्मक बाब आहे. तांत्रिक अडचणी आहेत त्या पूरक मागण्या सादर करताना दाखवाव्या लागतात. नियुक्ती केल्यानंतर कार्यालयीन खर्चातून हा खर्च का दाखविण्यात आला नाही हा प्रश्न निर्माण होते.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 39 बाब क्रमांक 36 सेच्छानिवृत्ती आणि लायसन नूतनीकरण यासाठी 95 लाख 46 हजार रुपयांची रक्कम पुरवणी मागणीद्वारे मागण्यात आली आहे. स्वेच्छानिवृत्ती योजना म्हणजे संपूर्ण खातेच बंद करण्याची योजना अंमलात आणली जात आहे काय याचा खुलासा होणे आवश्यक आहे. कारण हा कार्यालयीन खर्च आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 44, बाब क्रमांक 45 यामध्ये मार्ग आणि पुलांचे परिरक्षण व दुरुस्ती यासाठी 3 कोटी 66 हजारांची मागणी करण्यात आली आहे. अर्थसंकल्पात रुपये 25 कोटी अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, रस्ते आणि पूल यांचे परिरक्षण संपूर्ण वर्षभर सुरु असते. पावसाळा गेल्यानंतर सगळया पुलांचे परिरक्षण तसेच दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद ही अंदाजपत्रकात येते. अंदाजपत्रकात 25 कोटी इतकी रक्कम पुलांच्या परिरक्षणासाठी कोणत्या भागातील हे पूल आहेत याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ 17:15

श्री. मधुकर सरपोतदार ....

सभापती महोदय, बाब क्रमांक 31 तळोजा, नवी मुंबई येथे नवीन मध्यवर्ती कारागृहाच्या चालू असलेल्या बांधकामासाठी अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली आहे. नवीन कारागृहामध्ये किती कैद्यांची क्षमता आहे हे समजणे आवश्यक आहे. कैद्यांना भेटायला येणाऱ्यांसाठी तुरुंगाबाहेर ज्या सुविधांची आवश्यकता आहे त्या मिळत नाहीत असे दिसून येते. कैद्यांना भेटायला येणाऱ्यांना तुरुंगाबाहेर थांबावे लागते. तळोजा येथे कैद्यांसाठी जी नवीन इमारत उभी केली जाणार आहे त्यामध्ये अशा प्रकारच्या सुविधा आणि व्यवस्था केलेली आहे काय ? आर्थररोड जेलची परिस्थिती पाहिली तर त्याठिकाणी कैद्यांना भेटायला येणाऱ्यांसाठी कोणत्याही प्रकारची सुविधा नाही. त्यामुळे त्यांचे हाल होतात.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाशी बाब क्रमांक 55, पृष्ठ क्रमांक 61 संबंधित आहे. फ्रँकींगसाठी मशीन खरेदी करणे हा विषय आहे. खरे पाहता अर्थखात्याशी संबंधित हा प्रश्न आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...............

या फ्रँकिंग मशिनमध्ये काय घोटाळे झाले? किती मशिन्स फेकून देण्यात आल्या? या संदर्भात आजच्या दैनिक लोकसत्तेच्या अंकामध्ये विस्तृत बातमी छापून आलेली आहे. या संदर्भात 34.63 लाख रुपयांची पुरवणी मागणी सादर केलेली आहे.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : आज विधी व न्याय विभागाच्या मागण्या चर्चेसाठी घेण्यात आलेल्या नाहीत.

श्री.मधुकर सरपोतदार : तसे असेल तर मी या संदर्भातील विचार मांडू इच्छित नाही. सन्माननीय सभापती महोदय, ज्या विभागाच्या मागण्या आज चर्चेला घेण्यात आल्या आहेत, त्या त्या विभागाच्या मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहण्याची आवश्यकता आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, खालच्या सभागृहामध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु असल्यामुळे काही विभागांचे मंत्रीमहोदय खालच्या सभागृहात उपस्थित आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : खालच्या सभागृहाचे कारण याठिकाणी देण्यात येऊ नये. प्रत्येक विभागासाठी दोन-दोन मंत्री असतात. एक कॅबिनेट दर्जाचे आणि एक राज्यमंत्री आहेत. सभापती महोदय, सदनामध्ये काय चालले आहे? ही या सदनाची प्रतिष्ठा आहे का? पीठासीन अधिकारी म्हणून आपल्याला संबंधित मंत्रीमहोदयांनी अनुपस्थित राहण्याबद्दलची माहिती दिली आहे का?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील सर्व मुद्यांची नोंद घेण्यात येत असून त्या मुद्यांना समर्पक उत्तर देण्यात येईल. काही विभागांचे मंत्रीमहोदय पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने खालच्या सभागृहात उपस्थित आहेत.

**तालिका सभापती** : माननीय मुख्यमंत्री, माननीय पणनमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील, माननीय सामाजिक न्यायमंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी पत्र दिलेले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : ही माहिती सदनाला दिली पाहिजे. या सदनामध्ये शिस्त नाही का? वरिष्ठ सभागृह म्हटले जाते. मग याठिकाणी शिस्त पाळणार नाही का? मंत्रीमहोदयांनी पत्र देऊन कळविले असेल तर सभागृहात तसे जाहीर केले पाहिजे. अगोदर कल्पना दिली पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री सभागृहात हजर राहू शकतात. याठिकाणी जे मुद्दे मांडले जातात त्यांची नोंद घेतली पाहिजे. केवळ 'अनुकूल', 'प्रतिकूल', 'होय चे बहुमत' म्हणून चालणार नाही. चटावरचे श्राध्द उरकण्याचा प्रकार होऊ नये.

श्री.अनिल देशमुख : खालच्या सभागृहात देखील पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु आहे. काही मंत्रीमहोदय खालच्या सभागृहात आहेत. परंतु याठिकाणी सर्व मंत्र्यांची फौज तयार आहे. याठिकाणी मांडण्यात येणाऱ्या मुद्यांची नोंद घेत आहोत.

श्री.मधुकर सरपोतदार : तुमच्या फौजेशी काही कर्तव्य नाही. आपण फौज घेऊन फिरायला जावे, आमची काही हरकत नाही. सभापती महोदय, आम्ही आपल्याकडून संरक्षणाची अपेक्षा करीत आहोत. फक्त उजव्या बाजूला लक्ष देऊ नये. डाव्या बाजूला देखील लक्ष द्यावे.

**तालिका सभापती** : चर्चेद्वारे जे मुद्दे मांडले जात आहेत त्यांची नोंद घेऊन त्या मुद्यांना समर्पक उत्तर दिले जाईल यादृष्टीने काळजी घेतली जात आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बाब क्र. 73 व 74, पृ.क्र. 77 - अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या संदर्भात मला पहिल्यांदा सांगावयाचे आहे की, या ठिकाणी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या दोन्ही मंत्र्यांपैकी एकही मंत्री उपस्थित नाहीत.

श्री. अनिल देशमुख : सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील सर्व मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे, कृपया त्यांनी आपले भाषण सुरु ठेवावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सर्व मंत्री महोदयांना माझा एकच प्रश्न आहे की, सभागृहाचे कामकाज चालविण्याची हीच पध्दत आहे काय ? अर्थसंकल्पावरील पुरवणी मागण्यांवर सभागृहात चर्चा सुरु असतांना संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित नाहीत म्हणून कोणी तरी मंत्री म्हणतात की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे, हे योग्य नाही.

महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाने नवीन ग्राम धान्य कोष स्थापन करण्यासाठी चालू वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये कोणतीच तरतूद नसल्यामुळे शासकीय ज्ञापन वित्त विभाग, दिनांक 16 जानेवारी, 2008 अन्वये आकस्मिकता निधीतून 1,35,54,200/- एवढी आगावू रक्कम काढण्यात आहे व त्याच्या विनियोजनार्थ आदेश दि. 9 जानेवारी, 2008 अन्वये काढण्यात आले. हा जो शासकीय नवीन ग्राम धान्य कोष नव्याने स्थापन करण्यात आला आहे, त्याची संकल्पना काय आहे ? आणि त्याचा शेतकऱ्यांना कितपत फायदा होणार आहे, याची माहिती द्यावी.

सभापती महोदय, बाब क्र. 74, राज्य ग्राहक संरक्षण निधीत रक्कम जमा करण्यासाठी ही अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. राज्य संरक्षण कक्ष हा नव्याने निर्माण झालेला आहे व त्याच्या निधीमध्ये रक्कम जमा करण्यासाठीच ही तरतूद केली आहे, ती देखील आकस्मिकता निधीतून करण्यात आली. त्याची परिस्थिती काय आहे ? यासंबंधीची माहिती देण्यात यावी.

महोदय, नियोजन विभाग, पृ.क्र.85, बाब क्र. 80, आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम, सन 2006-07 या ठिकाणी देखील आमदार स्थानिक विकास निधी योजनेअंतर्गत सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश उर्फ बच्चू कडू यांच्या मतदारसंघाविषयी ही 13.22 लाखाची तरतूद केली आहे. त्यावेळेस आचारसंहिता लागू झाल्यामुळे हा निधी खर्च होऊ शकला नाही म्हणून आकस्मिकतानिधीतून रक्कम काढून ही रक्कम सुपूर्द करणार आहे, असे येथे सांगितले.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..........

यासंदर्भात मला एकच गोष्ट निदर्शनास आणावयाची आहे की, आमदार निधी हा जिल्हाधिकाऱ्यांकडे असतो. एकदा डीपीडीसीमध्ये मंजुरी मिळाल्यानंतर त्यानुसार कामे सुरु करण्यासाठी आचारसंहिता का आडवी येते याची माहिती सदनाला देण्यात यावी. जर या निधीला मान्यता मिळाली नाही तर प्रश्नच येत नाही, परंतु एकदा डीपीडीसीची मान्यता मिळाल्यानंतर मात्र आचारसंहिता आडवी यायला नको. तसेच माननीय पालकमंत्र्यांनी वेळोवेळी जर डीपीडीसीच्या बैठका घेतल्या तर ही वेळच येणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ......

सभापती महोदय, मी आता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 88 व 90 वर विचार व्यक्त करणार आहे. सर्वोपचार रुग्णालय, गोंदिया येथे सी.टी.स्कॅन यंत्रसामग्री खरेदी केलेल्या प्रलंबित देयकांचे प्रदान करण्यासाठी अतिरिक्त तरतूद 18 लक्ष रुपयांची करण्यात आलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात मला असे विचारावयाचे आहे की, सी.टी.स्कॅन यंत्र कधी आणले, प्रत्यक्षात या यंत्राचा वापर केव्हा सुरु झाला आणि या यंत्राचा फायदा प्रत्यक्षात किती लोकांनी घेतला याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तराच्या भाषणात द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 90 च्या संदर्भात, मराठवाडयातील जिल्हा व उप जिल्हा रुग्णालये येथील फिरत्या पथकाच्या कर्मचारीवर्गाच्या वेतन व भत्ते यासाठी 1,91,75,000 रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. आरोग्य खाते मोठया प्रमाणात पैशांची तरतूद करतांना दिसते परंतु त्या तुलनेत जनतेचे आरोग्य काही सुधारतांना दिसत नाही. जनतेचे आरोग्य सुधारण्याऐवजी जनतेचे आरोग्य बिघडत चालले आहे. आज राज्यामध्ये दररोज 20 बालकांचा मृत्यू होत आहे असे सकाळी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत यांनी सांगितलेले आहे. आज महाराष्ट्र शासनाचे कुपोषित बालकांकडे दुर्लक्ष होत आहे हेच यावरुन दिसून येत आहे. आज जनतेचे आरोग्य वाढण्याऐवजी बिघडत चालले आहे. आज महाराष्ट्रातील गरीब जनतेला चांगल्या सोयी सुविधा आरोग्य खात्याकडून पुरविल्या जात नाहीत. आज एकीकडे बोगस औषधे विकण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यामुळे आता तरी आपण महाराष्ट्रील गरीब जनतेकडे लक्ष देणार आहात काय? एवढेच मला या निमित्ताने विचारावयाचे आहे. जोपर्यंत सार्वजनिक आरोग्य विभाग परिणामकारक उपाययोजना करीत नाही तोपर्यंत गरीब जनतेला काहीही सोयी सुविधा मिळणार नाहीत असे मला वाटते त्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाने महाराष्ट्रातील गरीब जनतेच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे अशी माझी कळकळीची विनंती आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 17.35

श्री.मधुकर सरपोतदार ...

सभापती महोदय,या नंतर मला आदिवासी विकास विभागाची बाब क्रमांक 102 पान नंबर 113 संबंधी बोलावयाचे आहे. राज्याच्या जनजाती क्षेत्रामध्ये व जनजाती क्षेत्रा बाहेरील क्षेत्रामध्ये आरोग्य सुविधा पुरविण्याकरिता 2 कोटी 40 लाख 90 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. सन्माननीय आदिवासी विकास मंत्री हे डॉक्टर आहेत. आदिवासी भागातील आरोग्य सेवेसंबंधी मला एवढेच सांगावयाचे आहे की, आज आरोग्याच्या बाबतीत आदिवासीचे हाल सुरु आहेत. तेव्हा त्यांचे होणारे हाल त्वरित थांबविण्यात यावेत आणि आदिवासींना आरोग्याच्या दृष्टीने सर्व सोयी सुविधा त्वरित कशा मिळतील या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावे. त्यांच्याकरिता कोटयावधी रुपयांचा निधी दिला जातो परंतु त्या निधीचा त्यांना प्रत्यक्षात फायदा होत नाही. सन्माननीय मंत्री महोदयांना मला असे सांगावयाचे आहे की, पक्षाची आणि मंत्र्यांची आपसात भांडणे सुरु आहेत त्यामुळे या समाजाकडे दुर्लक्ष होत आहे. सत्ता मिळविण्यासाठी जरुर भांडावे परंतु सत्ता मिळाल्यानंतर या समाजाकडे दुर्लक्ष करता कामा नये. आदिवासींचे जीवन कसे सुधारता येईल या दृष्टीने शासनाने जास्तीत जास्त काळजी घ्यावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर आदिवासी विकास विभागाची बाब क्रमांक 103 पान नंबर 113 संबंधी मला बोलावयाचे आहे. नागरी आदिवासी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत नगरपालिकांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी 6 कोटी 71 लाख 96 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. नागरी आदिवासी वस्ती सुधारण्यासाठी नगरपालिकांना सहाय्यक अनुदान दिले जावे आणि आदिवासी वस्तीला चांगल्या नागरी सुविधा देण्यात याव्यात अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर महिला व बाल कल्याण विभागाची बाब क्रमांक 114 पान नंबर 131 संबंधी मला बोलावयाचे आहे. देवदासींना निर्वाह भत्ता देण्यासाठी अतिरिक्त सहाय्यक अनुदान देण्याकरिता एक हजार रुपयांची दत्तमत पूरक मागणी करण्यात आलेली आहे. पूर्वी देवदासींना 300 रुपये निर्वाह भत्ता देण्यात येत होता. त्यामध्ये 200 रुपयांची वाढ करुन आता 500 रुपये निर्वाह भत्ता देण्यात येणार आहे. मला असे सांगावयाचे आहे की, 500 रुपये निर्वाह भत्ता ही फारच कमी रक्कम आहे. त्यामुळे या रकमेमध्ये त्यांचा निर्वाह होणे कठीण आहे. 500 रुपयामध्ये

श्री.मधुकर सरपोतदार...

त्यांचा निर्वाह होऊ शकणार नसल्यामुळे त्यात कमीत कमी एक हजार रुपये इतकी वाढ करणे आवश्यक आहे. रुपयांचे अवमूल्यन झालेले असल्यामुळे पूर्वीचे 300 रुपये आता 100 रुपये
झालेले आहेत . या देवदासींना 300 रुपया ऐवजी आता 500 रुपये देण्यात येणार असून त्यात फक्त 200 रुपयांची वाढ करण्यात आलेली आहे तेव्हा कमीत कमी त्यांना एक हजार रुपये निर्वाह भत्ता देण्यात यावा त्यातून त्यांना चांगल्या प्रकारे जीवन जगता येईल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ( विधान सभेने निवडलेल्या ) :सभापती महोदय, 2007-2008 सालच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे. सर्व प्रथम मला कृषी विभागाची बाब क्रमांक 24 पान नंबर 25 संबंधी बोलावयाचे आहे.शेतकऱ्यांवरील कर्ज माफ करण्याचा केन्द्र शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्या संदर्भात मला एक सूचना करावयाची आहे की, आता या शेतकऱ्यांवरील कर्ज माफ केल्यानंतर हे शेतकरी पुन्हा कर्ज बाजारी होणार नाहीत या दृष्टीने शासनाने योग्य ती काळजी घेतली पाहिजे. त्यांना मोफत बी बियाणे देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांना मोफत बी बियाणे देण्याचा निर्णय घेतला होता त्या प्रमाणे या शेतकऱ्यांना मोफत बी बियाणे देण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना करता येणे शक्य आहे त्या दृष्टीने शासनाने निर्णय घेतला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. यानंतर मला सेंद्रीय शेती संबंधी मला एक सूचना करावयाची आहे. ट्रेनिंग सेंटर फॉर हार्ल्टीकल्चर हे ठाणे जिल्हयात आहे. त्याचे उप केंद्र मराठवाडयात व विदर्भात सुरु करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर नगर विकास विभागाची बाब क्रमांक 31, पान नंबर 33 संबंधी मला बोलावयाचे आहे. मंजूर अनुदानापेक्षा झालेला अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त अनुदान देण्यासाठी 69 कोटी 45 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. शहरी विभागाच्या दृष्टीने एक गंभीर बाब मला माननीय नगर विकास राज्य मंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. बीड आणि परळी या शहरातील अनेक गटारे उघडी आहेत त्यातून पाणी वाहून जाऊ शकत नाही.या उघडया गटारातूनच पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन जाते व ही पाईप लाईन लिकेज असल्यामुळे तेथील नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागते . बॅक वॉटरचे पाणी मिळून देखील विजेच्या बिलाचा प्रश्न निर्माण झाला असल्यामुळे या शहरातील लोकांना पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा केला जात नाही. तेव्हा माझी या पूरक मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने अशी मागणी करावयाची आहे की या दोन शहरातील भूमिगत गटारी करण्याच्या दृष्टीने नगरविकास विभागाने प्रयत्न करावा. त्याचबरोबर या शहरामध्ये घण कचऱ्याचे ढीग मोठया प्रमाणावर असल्यामुळे तेथे डासांचा प्रादूर्भाव वाढलेला आहे त्याची दखल विभागाने घ्यावी अशी मी विनंती करते.

4.



श्रीमती उषाताई दराडे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 32 आणि 33 संबंधी मला बोलावयाचे आहे.केन्द्र सरकारकडे महिला कोष आहे. या महिला कोषामुळे महिलांना 4 टक्के दराने महिलांना कर्ज पुरवठा केला जातो त्या पध्दतीने राज्यामध्ये देखील 4 टक्के व्याजाने लघू उद्योगांना मायक्रो फायनान्स देण्यासाठी महिलांना कर्ज उपलब्ध करुन दिले जावे अशी लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे. यासाठी केन्द्राच्या धर्तीवर राज्य सरकारने राज्य महिला कोषाची स्थापना करावी याच विषयाच्या संदर्भात आज प्रश्न विचारण्यात आला होता परंतु तो प्रश्न बराच मागे असल्यामुळे आज चर्चेसाठी येऊ शकला नाही. त्या प्रश्नाला उत्तर देतांना असे सांगण्यात आलेले आहे की, या बाबतीतील धोरण अद्यापी ठरलेले नाही तेव्हा तातडीने हे धोरण ठरविण्यात यावे अशी मी या निमित्ताने विनंती करते त्याच प्रमाणे राज्य महिला कोष स्थापन करुन महिलांना कमी व्याज दराने लघू उद्योगासाठी कर्ज उपलब्ध करुन दिले पाहिजे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या पूरक मागण्या आज चर्चेसाठी नाहीत . त्या खात्याचे मंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित नाहीत तरी संबंधित मंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी अशी मी या निमित्ताने विनंती करते. आज या पूरक मागण्यांवर बोलत असतांना उद्या पुन्हा बोलणे मला योग्य वाटत नाही ...

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ....

राज्यातील जी शहरे एक लाख लोकसंख्येपेक्षा जास्तीची झालेली आहेत, तेथे ॲडिशनल आणि डिस्ट्रिक्ट कोर्टस् उभे करण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करीत आहोत. त्याच धर्तीवर परळीचे न्यायालय उभे करण्याचा प्रयत्न चालू होता. परंतु परळीला जागा उपलब्ध नव्हती म्हणून तेथे ॲडिशनल कोर्ट होत नव्हते. त्या संदर्भात माननीय राज्यमंत्र्यांकडे काही बैठका झाल्या आणि परवाच बांधकाम खात्याने, गोदावरी खोरे महामंडळाकडून त्यांचे तेथील इरिगेशनचे रेस्ट हाऊस आहे ते न्यायालयाने ताब्यात घ्यावे अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे तेथील जागेचा प्रश्न आता सुटलेला आहे. ती जागा ताब्यात घेण्याच्या दृष्टीने तालुका न्यायालयाने हायकोर्टाकडे परवानगी देखील मागितली आहे. तेव्हा परळीच्या सेशन कोर्टाचा प्रश्न आता ताबडतोब सुटेल अशी अपेक्षा आहे. तसेच कौटुंबिक न्यायालयांची संख्या वाढवावी अशीही माझी या निमित्ताने एक सूचना आहे. आज बीडमध्ये कौटुंबिक न्यायालय होणे खूप गरजेचे आहे. महिला आपले प्रश्न तेथे दाखल करतात परंतु त्यांना उशीरा न्याय मिळतो आणि उशिरा न्याय मिळणे म्हणजे एक प्रकारे ते त्यांना न्याय देणे नसते म्हणून त्या दृष्टीने कौटुंबिक न्यायालयांची संख्या वाढवावी.

सभापती महोदय, माझी आणखी एक सूचना आरोग्य विभागासंबंधात आहे. बाब क्रमांक 86, पृष्ठ क्रमांक 93 च्या संदर्भात मी आपल्याला विनंती करू इच्छिते की, बीडमध्ये कर्करोग निदान उपकेंद्र सुरू करावे. आज बीडमध्ये अशी परिस्थिती आहे की, त्या ठिकाणी ग्रामीण आणि शहरी भागामध्येदेखील गर्भाशयाचे प्रॉब्लेम्स खूप आहेत., लेप्रोस्कोपिक ऑपरेशनसाठी डॉक्टर्सच उपलब्ध नाहीत. पळसकर नावाचे एक डॉक्टर 15 दिवसाला एकदा औरंगाबादहून येतात आणि वेगवेगळ्या दवाखान्यांमधून खाजगी प्रॅक्टिस करतात. तेव्हा या सुविधा किमान जिल्ह्याच्या ठिकाणी तरी करायला आपल्याला काय हरकत आहे ? तेव्हा बाब क्रमांक 86, 87 च्या संदर्भात मी ही सूचना या ठिकाणी करते आहे. म्हणजे आम्हाला किमान एक तरी कर्करोग निदान उपकेंद्र उपलब्ध करून द्यावे आणि कमीत कमी लॅप्रोस्कोपिक ऑपरेशनची सुविधा तरी बीड जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध व्हावी. सभापती महोदय, आमच्या बीडच्या सिव्हिल हॉस्पिटलच्या आयसीयूमध्ये 24 तास डॉक्टर नाहीत. अपघात झालेला एखादा पेशंट त्या दवाखान्यामध्ये, हॉस्पिटलमध्ये आलाच तर घरी झ ोपलेल्या डॉक्टरला शोधून आणण्यामध्ये 4-4 तास घालावे लागतात. मध्यंतरी काही दिवसापूर्वी

..... V V 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दराडे ...

तेथे एक मृत्यू झाला त्यातून तेथे अत्यंत अशांततापूर्ण असे वातावरण निर्माण झाले होते. तेव्हा या ज्या छोट्या छोट्या बाबी आहेत त्याकडे शासनाने लक्ष द्यावे असे मला आवर्जून येथे सांगावयाचे आहे. तेथे डॉक्टरांची अनेक पदे रिक्त आहेत. तेव्हा बीड जिल्ह्यातील अशी सर्व पदे ताबडतोब भरण्याची सूचना संबंधितांना आपण द्यावी अशा प्रकारची सूचना मी या निमित्ताने आपल्याकडे करते. सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील उपकेंद्रांपैकी 95 टक्के उपकेंद्रे आज बंद आहेत. तेथे गवत उगवलेले आहे हे मी आमदार झाल्यापासून 3 ते 4 वेळा या सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले आहे. या उपकेंद्रांच्या दरवाजांना कुलुपे लागली आहेत. कोणीही तेथे जात नाही, स्टाफदेखील तेथे नसतो. तेव्हा याची गांभीर्याने आपण दखल घेणे गरजेचे आहे, अन्यथा ती उपकेंद्रे तरी आपण बंद करून टाकावीत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 113, 114, 115 च्या संदर्भात मला आपल्याला सांगावयाचे आहे की, महिला व बालकल्याण विभागामार्फत बचतगटाच्या सक्षमीकरणाची बाब लक्षात घेत असताना एका गोष्टीकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे असे मला आवर्जून सांगावयाचे आहे. हा विषय कृषी क्षेत्राशी देखील संबंधित आहे. तेव्हा या दोन्ही खात्यांनी मिळून ग्रामीण भागातील सर्व महिलांचा शेती क्षेत्रातील सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने आणि त्यांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने, बचत गटांना शेती व्यवसायाचे प्रशिक्षण देणे आणि चांगल्या पद्धतीने शेती करण्यास प्रोत्साहन देणे, ज्ञान देणे गरजेचे आहे. त्या महिला श्रम तर करीतच आहेत. पुरूष 8 तास करीत असतील तर महिला निश्चितपणे 16-16 तास काम करीत असतात. घरातील काम करतात, बाहेरची शेती वगैरेचीही कामे करतात, शारीरिक, बौद्धिक अशी सर्वच कामे करतात. पण त्यांना त्या कामांचे योग्य असे प्रशिक्षण नसते. विशेष करून शेतीच्या बाबतीत मी म्हणेन की, बी-बियाणे कसे वापरायचे, पेरणी कशी करायची, खुरपणी कशी करायची, पाणी कसे व किती द्यायला पाहिजे, पाणी वाफ्यातून फूटून कसे जायला नको, सेंद्रीय शेती असेल, कीटकनाशके असतील तर ती कशी व किती प्रमाणात दिली गेली पाहिजे वगैरे प्रकारचे प्रशिक्षण आपण देत नाही. कोठली फवारणी कोठल्या वेळी कोणत्या पिकांवर करायची याचे साधे ज्ञान देखील दिले जात नाही. त्यातूनही मग शेतकऱ्यांचे नुकसान होते. म्हणून महिलांना 'शेती क्षेत्रातील महिलांचा सहभाग' या विषयीचे विशेष

...... V V 3 ...

प्रशिक्षण दिले पाहिजे. बचतगट आणि कृषी क्षेत्र यांनी संयुक्त विचार करून महाराष्ट्रात कृषीतंत्र  ज्ञ ाान विकसित करीत असताना त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

त्याच बरोबर शेवटचा मुद्दा मी सांगून माझे भाषण संपविणार आहे. सेंद्रिय शेती हा विषय अभ्यासक्रमामध्येच आज नाही. ही आश्चर्याची बाब आहे. हा विषय सर्व विद्यापीठांना सक्तीचा केला पाहिजे असे मला वाटते. महाराष्ट्रातील शेतकरी आज जो कर्जबाजारी होतो आहे त्यातील हेही एक कारण आहे की, महाग असलेली बी-बियाणे, रासायनिक खते शेतकरी कर्ज काढून घेतात, त्यामुळे एकीकडे जमिनी नापिकी होताहेत. पण त्यांना सेंद्रिय शेतीची माहिती आपल्याकडे दिली जात नाही. म्हणून त्या अर्थाने सर्वच विद्यापीठांनी आणि शाळांमध्ये देखील कृषी विषय हा सक्तीचा करावा आणि त्यातल्या त्यात महिला बचतगटांना जाणीवपूर्वक याचे प्रशिक्षण द्यावे एवढे नमूद करून मी भाषण संपविते.

( यानंतर श्री. सरफरे .... WW 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 44 व बाब क्रमांक 37 मध्ये "मार्ग व पूलांच्या परिरक्षण व दुरुस्तीसाठी अतिरिक्त अनुदाने" याकरिता तरतूद करण्यात आली आहे. माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख यांनी अलिकडेच आम्हा सर्व आमदारांना पत्रे पाठविली आहेत. पेडर रोड येथील नवीन उड्डाण पूल बांधण्याबाबत आपले अभिमत पाठवावे. हा काय तमाशा चालू आहे? या विषयावर सभागृहामध्ये चर्चा करण्यात आली, पूलाच्या बांधकामाचे प्लॅन आणि एस्टिमेंट मंजूर करण्यात आले. आदरणीय श्रीमती लता मंगेशकरजी यांनी वर्तमानपत्रामध्ये सांगितले आहे की, माझी या पूलाला हरकत नाही....

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी याठिकाणी भाषण करीत असतांना "तमाशा" हा शब्द वापरला आहे.हा शब्द असंसदीय असल्यामुळे त्यांनी तो वापरु नये अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, त्याऐवजी गोंधळ शब्द वापरतो. "तमाशा" हा शब्द असंसदीय नाही. तमाशाला आपण अनुदान दिले आहे, आपण राजमान्यता दिली आहे. तसे या मागण्यांच्या पुस्तकामध्ये म्हटले आहे.

श्री. अनिल देशमुख : सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून तो शब्द वापरला असेल...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हा असंसदीय शब्द नाही. आपण प्रतोद परिषदेच्या वेळी परदेशी पाहुण्यांच्या करमणुकीकरिता त्यांना तमाशाचा कार्यक्रम दाखविला आहे...

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य या शब्दाऐवजी दुसरा शब्द वापरु शकतात...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, "तमाशा" हा शब्द असंसदीय कसा होऊ शकतो?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अकलूजच्या लावणी महोत्सवाच्या कार्यक्रमाच्या वेळी आपण पहिल्या रांगेमध्ये बसल्याचे मी आपल्याला टी.व्ही. वर बघितले आहे, आपण तमाशाचा एवढा आदर करता...

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : मंत्रिमहोदयांचे असे म्हणणे आहे की, सांस्कृतिक दृष्टया तो शब्द योग्य आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला असे म्हणावयाचे आहे की, आपण पाठविलेले पत्र योग्य आहे. आपण जे काम करीत आहात त्याला अधिक पाठबळ मिळावे आणि लोकप्रतिनिधी व सर्व जनतेला हा पूल होणे आवश्यक आहे असे वाटावे याकरिता हे पत्र पाठविण्यात आले आहे काय? समजा आमचे पत्र आपल्याला आले नाही किंवा आम्ही आपल्याला पत्राचे उत्तर पाठविले नाही तरमग काय करणार? आम्ही उत्तर देणार आहोत. कारण हे चांगले काम असून ते झाले पाहिजे यासाठी आम्ही उत्तर पाठविणारच. परंतु हे कशासाठी चालले आहे? जे सी-लिंक पूलाच्या बाबतीत झाले तेच या पूलाच्या बाबतीत होणार आहे. हा पूल सुरुवातीला 400 कोटींचा होता, त्यानंतर तो 1200 कोटींचा झाला आणि आता त्यानंतर 1600 कोटींचा होणार. ज्यांनी निविदा भरल्या आहेत त्यांना आपण पुन्हा निविदा भरण्यास सांगणार. याबाबत मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरामध्ये आम्हाला सांगितले पाहिजे. त्यांनी आम्हाला पत्र पाठविले म्हणून आम्ही ही मागणी केली आहे. आपण याबाबत कुणाला खूष करण्यासाठी हे करीत आहात, या पूलाला कुणाचा विरोध आहे? कुणाची नाराजी आहे? या मुंबई शहरामध्ये वहातुकीची कोंडी होत चालली आहे. टाटाची एक लाखाची गाडी मुंबईच्या रस्त्यावर येणार आहे, त्यांना शासनाने कोणत्याही प्रकारची अट घातली नाही. वास्तविक पहातां काही शहरांमध्ये याबाबत अट घालण्याबाबत सुचविले आहे की, हे थिकली पॉप्युलेटेड शहर असल्यामुळे या शहरामध्ये 1 लाखाची गाडी आणावी की नाही ? म्हणून या ठिकाणी पूल होणे आवश्यक आहे. सकाळी मंत्रिमहोदयांनी आपल्या भाषणामध्ये टिंगल केली. आमच्या राज्यात मुंबई शहरामध्ये 52 उड्डाण पूलांची कामे झाली म्हणून आज आपण लाल दिव्याच्या गाडीमधून लूक लूक करीत जात आहात. नाहीतर तुम्ही ट्रॅफिकमध्ये सहा तास थांबाल. माजी सभापती श्री. जयंतराव टिळक साहेब गाडीमधून पुण्याला जात असतांना वहातुकीच्या कोंडीमुळे बोरघाटामध्ये सहा तास थांबले होते. त्यानंतर हे सर्व पूल मार्गी लागले.मला असे म्हणावयाचे आहे की, तुम्ही एखादी गोष्ट ठरविल्यानंतर ती डिटरमिनेशन करावी. त्याबाबत आपण दृढनिश्चय करा. आदरणीय श्रीमती लता मंगेशकर यांचेबाबत भारतातील सर्व लोकांच्या मनामध्ये आदर आहे. परंतु एखादी आदरणीय व्यक्तीं विकासाच्या कामाच्या आड येत असतील तर त्यांचा आदर बाजूला ठेवून त्यांना सांगावे लागेल की, तुमचे लाड आम्ही पुरविणार नाही. तुमच्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण....

एकटयासाठी ही मुंबई नाही. मुंबई ही सर्वसामान्य माणसासाठी आहे. आणि म्हणून याबाबतीत मंत्रिमहोदयांनी उत्तर देणे आवश्यक आहे की, पेडर रोड पूलाच्या बांधकामाकरिता अशातऱ्हेने पत्र मागण्याची आवश्यकता आपल्याला कां भासली? अशी मी आपणास विचारणा करीत आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. पृष्ठ क्र. 89, बाब क्रमांक 82 मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण विभागाच्या मागणीवर बोलणार आहे. याठिकाणी माननीय ॲड. प्रीतमकुमार शेगावकर हे उपस्थित असावयास हवे होते. त्यांच्या नावाने मी पत्र पाठविले होते की, मी आपणावर सभागृहामध्ये आरोप करणार आहे. तरीसुध्दा ते कां आले नाहीत? हे मला माहीत नाही. सभापती महोदय, श्रीमती सुषमा संजय गुप्ता नावाच्या महिलेला म्हाडाच्या सदनिकेमध्ये लॉटरी लागली आणि त्यांना एक घर मिळाले. त्या अगोदरच्या व्यक्तीने नियमाप्रमाणे त्या घराचा स्वीकार केला नाही म्हणून नियमाप्रमाणे त्याठिकाणी असलेले घर श्रीमती गुप्ता यांना दिले गेले. त्यानंतर त्यांना घराचे पैसे भरण्यास सांगितले गेले. त्याप्रमाणे त्यांनी सुमारे 2 लाख 1312 रुपये भरले. ही रक्कम भरल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र बँकेमधून आपल्याला कर्ज मिळावे म्हणून म्हाडाकडे ना हरकत प्रमाणपत्र मागितले.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

मी माननीय मंत्री महोदय श्री.रणजित कांबळे यांना विचार इच्छितो की, मी माननीय मंत्री श्री.प्रीतमकुमार शेगावकर यांच्याबद्दल किंवा त्या खात्याबद्दल जे बोलणार आहे, त्याचीही आपण नोंद घेत आहात काय ? जर तसे असेल तर मग आपण त्यांना सांगावे की, मी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करीत आहे. याठिकाणी मी सौ.सुषमा संजय गुप्ता यांचे एक पत्र वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "मी खालील सही करणार श्रीमती सुषमा संजय गुप्ता, म्हाडाच्या संकेत क्र.191 प्रतीक्षा नगर, सायन हया योजनेतील यशस्वी अर्जदार आहे. माझ्या म्हाडातर्फे दि.14-6-2005 रोजी काढण्यात आलेल्या सोडतीत प्रतीक्षा यादीवर नंबर लागला होता. (प्राधान्य क्र.75) व तसे म्हाडाने मला कळविले होते. (प्रत माहितीस्तव सोबत जोडण्यात आलेली आहे :- प्रपत्र क्र.1) तद्‌नंतर म्हाडाने प्रतीक्षा यादीत माझ्यापेक्षा वरचा क्रमांक असलेल्या व्यक्तीचे वितरण रद्द केल्याने मला दि.26-6-2007 च्या पत्रान्वये सायन प्रतीक्षा नगर येथील सदनिका क्रमांक 002, बिल्डींग क्र.L6B (C0de No, SION, Category : GP) ही वितरित करण्यात येत असून त्यापोटी सदनिकेच्या एकूण किंमतीच्या 25 टक्के इतकी रक्कम म्हाडाकडे भरण्याबाबत कळविले होते.(प्रत माहितीस्तव सोबत जोडलेली आहे. प्रपत्र क्र.2) त्यानुसार मी दि.2-7-2007 रोजी "बँक ऑफ महाराष्ट्र" मार्फत म्हाडाकडे रु.2,01,312.50 /- इतक्या रकमेचा धनादेशाव्दारे भरणा केला आहे.

त्यानंतर बँकेकडून सदर सदनिकेसाठी घ्यावयाच्या गृहकर्जासाठी म्हाडाच्या नियमानुसार देण्यात येणाऱ्या "ना हरकत प्रमाणपत्राची" वारंवार मागणी केल्यानंतर सुध्दा मला आजपावेतो "ना हरकत प्रमाणपत्र" म्हाडातर्फे देण्यात आलेले नाही. उलट टपाली म्हाडातर्फे मला सदनिकेच्या वितरण प्रक्रियेत प्रशासकीय अडचण निर्माण झाली असल्याने म्हाडाने "ना हरकत प्रमाणपत्र" देण्याबाबत असमर्थता दर्शविली होती. (प्रत माहितीस्तर सोबत जोडली आहे. प्रपत्र क्र.3)

मला वितरीत करण्यात आलेली सदनिका ही माझ्यापेक्षा प्रतीक्षा यादीत वरच्या क्रमांकावर असलेल्या व्यक्तीने म्हाडाच्या नियमानुसार विहित मुदतीत पैसे न भरल्याने रद्द केली आहे व ही सदनिका मला वितरित करण्याचे आदेश नियमानुसार म्हाडातर्फे देण्यात आले होते. नियमानुसार देय असणारी 25 टक्के रक्कम भरल्यानंतर जवळपास 8 महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटला असून मला अद्यापपावेतो "ना हरकत प्रमाणपत्र" देण्याबाबत वारंवार विनंती अर्ज करुन सुध्दा चालढकल करण्यात येत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदरहू प्रकरणात माहिती घेतली असता माझ्यापेक्षा प्रतीक्षा यादीत वरच्या क्रमांकावर असलेल्या व्यक्तीने विहित मर्यादेमध्ये सदनिकेची पूर्ण किंमत म्हाडाकडे भरणा न केल्याने म्हाडाच्या नियमानुसार सदरहू व्यक्तीचे वितरण रद्द करण्यात येऊन मला देकारपत्र देण्यात आले होते. त्या नंतर मी सदनिकेची 25 टक्के रक्कम म्हाडाकडे विहित मुदतीत भरल्यानंतर माझ्या अगोदरच्या अर्जदारास अंदाजे 6 महिन्यानंतर पुन्हा रक्कम भरण्यास संधी देऊन त्यास वितरण करण्याचे प्रयत्न सुरु असून माझे वितरण रद्द करण्यात येत असल्याचे समजते. त्यामुळे माझ्यावर मोठा अन्याय झाला आहे. वास्तविक मला विहित मार्गाने व नियमानुसार वितरण करण्यात आलेल्या सदनिकेचे वितरण रद्द करण्यात आल्यास तो माझ्यावर फार मोठा अन्याय केल्यासारखा होईल." असा माननीय मुख्यमंत्र्यांकडे अर्ज केला.

सभापती महोदय, म्हाडाचा असा नियम आहे की, जर सोडतीमध्ये आपला नंबर लागला आणि आपण विहित मुदतीमध्ये सदनिका घेतली नाही तर पुढच्या क्रमांकावरील व्यक्तिला ती देण्यात येते. याठिकाणी आमच्या माननीय मंत्री महोदयांकडे कोणीतरी ॲप्रोच झाला. दुसरीकडे श्रीमती गुप्ता यांनी कर्ज काढून 2 लाखाच्या वर रक्कम म्हाडाकडे भरली. त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहीले आहे. तसेच 17 स्मरणपत्रे दिली की, माझ्यावर अन्याय का करीत आहात? माननीय मंत्री महोदय कधीही तेथे जाऊन बसत नाहीत. परंतु श्रीमती गुप्ता यांना डावलून बेकायदेशीररित्या माननीय मंत्री श्री.प्रीतमकुमार साहेबांनी अगोदरच्या अर्जदारास पैसे भरण्यास सांगितले आणि त्याला सदनिका देत आहेत. आपले हे काय चालले आहे ? मी माननीय मंत्री महोदयांना वारंवार सांगतो की, तुम्ही म्हाडाच्या ऑफीसमध्ये जाऊन बसावे. आपल्याला श्री.रामदास आठवले यांच्या कृपेने मंत्रीपद मिळालेले आहे. आपण त्याठिकाणी परमपूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर.पी.आय.पक्षातर्फे निवडून आला आहात. परमपूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी गोर-गरीब, दलित, पीडित, श्रमिक, कष्टकरी यांना न्याय मिळवून देण्यासाठी जी विचारधारा निर्माण केली, त्याचे आपण याठिकाणी अतिशय रुबाबदारपणे प्रतिनिधीत्व करीत आहात. पण तुम्ही मंत्री असून बेकायदेशीरपणे काम करता ? श्रीमती गुप्ता यांनी 17-17 वेळा स्मरणपत्रे पाठविली, 25 टक्के रक्कम देखील भरलेली आहे आणि तुमच्यासमोर कोणता तरी दलाल आल्यानंतर, तुम्ही ती सदनिका दुसऱ्या माणसाला देता ? मंत्री म्हाडाचा कारभार चालवित नाहीत

. . . .2 एक्स-3



श्री.मधुकर चव्हाण . . . .

तर दलाल चालवित आहेत. जेव्हा बजेटवर चर्चा होईल, तेव्हा मी याबाबतीत बोलणार आहे. अशा परिस्थितीत श्रीमती गुप्ता यांनी नाईलाजास्तव माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहीले. ठीक आहे, कोणाच्या तरी ओळखीने किंवा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींकडे एखादी व्यक्ती येत असते. पण असे हजारो लोक आहेत की जे नगरसेवकाकडे, लोकप्रतिनिधींकडे, खासदारांकडे जाऊ शकत नाहीत. मग त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला कोण वाचा फोडणार आहे ? माझ्याकडे श्रीमती गुप्ता यांचे एक प्रकरण आले म्हणून मी ते आपल्या सर्वांसमोर सभागृहामध्ये मांडू शकतो. माननीय मंत्री महोदय म्हाडाच्या कार्यालयामध्ये जाऊन बसलेले आहेत काय ? त्यांनी तेथील इस्टेट डिपार्टमेंट कधी पाहिले आहे काय ? ॲलॉटमेंट डिपार्टमेंट कधी पाहिले आहे काय ? म्हाडाच्या ज्या चाळी आहेत, त्यांची अवस्था काय आहे, हे कधी पाहिले आहे काय ? बी.जे.शिर्के या कंपनीने 30-40 वर्षापूर्वी सिपोरेक्स टाईपच्या इमारती बांधल्या. पण आता ते टेक्नीक कालबाह्य झालेले आहे. त्या इमारती केव्हाही कोसळतील अशा स्थितीत आहेत. इंजिनिअर असे सांगत आहेत की, तेथे स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी नाही.पण तिकडेही लक्ष दिले जात नाही. म्हणजे तुम्ही केवळ आर.पी.आय.च्या कोटयातून मंत्रीपद द्या, कारण आम्ही तुम्हाला सत्तेसाठी टेकू लावलेला आहे. सकाळी माननीय मंत्री महोदयांनी गरीबांचे कसे हाल होत आहेत हे सांगितले नाही. फक्त आमच्या राज्यात काय चालले आहे ? आमच्या राज्यात काय चालले आहे ? आणि तुमच्या राज्यामध्ये काय झाले ? वगैरे. पण आता तुम्हाला दिवे लावावयास संधी दिली आहे ना, मग आता लोकांना उजेड दाखवा. हे केवळ एकच प्रकरण नाही. तर मी तुम्हाला अशी हजारो प्रकरणे देऊ शकतो. याची चौकशी झाली पाहिजे. या प्रकरणामध्ये प्रत्यक्ष माननीय मंत्री महोदयांनी बेकायदेशीर आदेश दिलेले आहेत. सभापती महोदया, मी ही बाब रेकॉर्डवर आणत आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

मी माननीय मंत्रिमहोदयांना अनेक वेळा सांगितले की, म्हाडा हे कार्यक्षेत्र असे आहे की, आपण त्या ठिकाणी जाऊन बसावे. त्या ठिकाणी सर्वसामान्यांशी संबंधित असलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण आहे. त्या ठिकाणी श्रीमंत लोक जात नाहीत तर 225 चौरस फुटाचे घर मिळावे, ट्रान्झीट कॅम्पमध्ये जागा मिळावी या एका छोट्याशा अपेक्षेने सामान्य लोक त्या ठिकाणी जात असतात आणि त्या ठिकाणी अक्षरश: कुत्र्यासारखी वागणूक मिळते. मी आपल्या माध्यमातून हे पत्र मंत्रिमहोदयांकडे देणार आहे. आपण ते त्यांना द्यावे. मला असे वाटते की, याबाबत संबंधित माननीय मंत्रिमहोदयांनीच उत्तर दिले पाहिजे. सकाळी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी जे सांगितले त्याप्रमाणे पुरवणी मागण्यांचा अर्थच असा आहे की, सदनातील कोणत्याही सदस्याने पुरवणी मागण्यावर भाष्य केले तर त्यासंबंधीची आपली टिप्पणी किंवा आपले जे मत असते त्याबाबत शासनाच्या वतीने संबंधित मंत्र्यांनी या ठिकाणी उत्तर देणे आवश्यक आहे. आता संध्याकाळी या ठिकाणी काय होईल ते बघावे. एक-एक मंत्री उभे राहतील आणि म्हणतील की, अमुक अमुक मागण्या मंजूर कराव्यात. अनुकूल असतील त्यांनी "होय" म्हणावे, प्रतिकूल असतील त्यांनी नाही म्हणावे असे झाल्यानंतर मागण्या मंजूर होतील. म्हणजे आम्ही या ठिकाणी जे बोलतो ते आमचे अरण्यरुदन आहे काय ? आमचे शब्द म्हणजे काठावर जाऊन बुडबुडा जसा फुटतो तसे फुटणार आहेत काय ? आम्ही या ठिकाणी जे शब्द उच्चारतो त्याला व्याकरणातील शब्दापलीकडे काही अर्थ नाही काय ? या प्रकरणाची कोण दखल घेणार ? या प्रकरणाची आपण नोंद घ्यावी अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी माननीय मंत्रिमहोदय श्री. रणजित कांबळे यांच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 86, पृष्ठ क्रमांक 91 बाबत बोलणार आहे. मी एकच मुद्दा आपल्याला सांगतो. शासनाच्या अहवालात जी आकडेवारी दिलेली आहे त्याप्रमाणे ही किती चिंतेची बाब आहे हे आपण बघावे. महाराष्ट्रामध्ये मलेरियाच्या साथीच्या बाबतीत 2005-06 मध्ये जे हाय रिस्क डिस्ट्रीक्ट होते त्यामध्ये रायगडमध्ये 8 टक्के प्रमाण आहे. उर्वरित महाराष्ट्रामध्ये 37 टक्के आहे आणि मुंबईमध्ये ती 29 टक्के प्रमाण आहे. सन 2005-06 मध्ये मुंबईमध्ये मलेरिया

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण .....

डिटेक्ट झालेल्या केसेस 19169 आहेत व मृत्यू 107 आहेत आणि सगळ्या राज्यामध्ये 133 मृत्यू आहेत. म्हणजे मुंबई शहरामध्ये किती भयानक प्रकार आहे हे आपण लक्षात घ्यावे. हाय रिस्क डिस्ट्रीक्ट यामध्ये सन 2006-07 मध्ये उर्वरित महाराष्ट्राचे प्रमाण 83 टक्के आहे. गडचिरोली जिल्ह्याचे प्रमाण 1 टक्का आहे. चंद्रपूरमध्ये 4 टक्के तर मुंबईमध्ये 34 टक्के प्रमाण आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपण फक्त टेंडर पास करत बसता. बाकी ही कामे कोणी करावयाची हेही त्या ठिकाणी विचारावे. डेंग्युच्या केसेसच्या बाबतीत सांगावयाचे तर 2006-07 मध्ये मुंबईमध्ये 14 केसेस कन्फर्म झाल्या आणि सर्व 14 लोकांचा मृत्यू झाला. संपूर्ण राज्यामध्ये 602 केसेस डिटेक्ट झाल्या आणि मृत्यू 27 आहेत. म्हणजे मुंबई शहरामध्ये केसेस डिटेक्ट झाल्यानंतर 100 टक्के मृत्यू झालेले आहेत. 2007-08 मधील शेवटच्या तीन महिन्यात मुंबईमध्ये डेंग्यूच्या 16 केसेस कन्फर्म झाल्या. त्यातील दोघांचा मृत्यू झाला. सगळ्या राज्यात 54 केसेस कन्फर्म झाल्या आणि त्यापैकी तिघांचा मृत्यू झाला. याची कारणे काय दिलेली आहेत ते पहावे. हा आपलाच अहवाल आहे. हा अहवाल आमचा नाही. आम्ही बोललो तर आपण म्हणाल की, तुम्ही जातीयवादी आहात, महाराष्ट्रवादी आहात. मुंबई शहरात रोग पसरण्याची काय कारणे दिलेली आहेत ते मी सांगतो आणि या बाबीवरचे माझे बोलणे संपवतो. यामध्ये असे म्हटले आहे की, "Factors Responsible For Increasing Malaria Trend In Mumbai Corporation. 1) Increase in population from 55 lakhs in 1961 to 1.30 crores in 2006." या मलेरियासाठी, डेंग्युसाठी जो स्टाफ आहे तो 1961 साली 374 होता. त्यावेळी मुंबईची लोकसंख्या 35 लाख होती. आता मुंबई हे गलिच्छ शहर झालेले आहे. आता मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 25 लाख आहे. मलेरियासाठी 1961 साली 374 एवढा स्टाफ होता आणि 2006 साली सुध्दा 374 एवढाच स्टाफ होता. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील हे मघाशी राज्याच्या प्रगतीचे पाढे वाचत होते. त्यावेळी आदराने बोलावयाचे असते म्हणून आम्ही काही बोललो नाही. आपण काय केले असे ते आम्हाला टोमणे मारत होते. श्री. मनोहर जोशी यांनी काय सांगितले याबाबत सांगत होते. आपण आईच्या पोटातून येतानाचा सत्तेचा मुकूट घेऊन आला आहात. नेहरु घराण्याला डोळ्यासमोर ठेऊन सत्ता मिळवावयाची. बाकी आपल्याला कोणी मिळत नाही, ते मिळवा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण .....

ना. काही तरी दिवे लावून दाखवा ना. हे कोण बघणार आहे ? माननीय मंत्रिमहोदय म्हणत आहेत की, हे राजकीय भाष्य आहे. मघाशी त्यांनी सुध्दा राजकीय भाषणच केले. स्टाफ का वाढवला नाही ? माननीय मंत्रिमहोदयांनी उभे राहून हरकत घ्यावी. सन्माननीय मंत्रिमहोदय डॉ. सुनील देशमुख यांना सांगू इच्छितो की, मघाशी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितले की, आम्ही जाणार तर नाहीच. आम्ही कायम राहणार.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : माननीय उपमुख्यमंत्र्यांनी राज्यपालांच्या भाषणावरील चर्चेला उत्तर दिले होते. राज्यपालांनी असे म्हटले नव्हते की, माझ्या आघाडीचे सरकार कधीच जाणार नाही. आजची चर्चा उद्या सुरु करता येईल.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** : सभागृहाची वेळ 1 तासाने वाढवावयाची काय ?

श्री.मधुकर सरपोतदार : सभागृहाचा सेंस घेऊन आपण वेळ वाढविली पाहिजे.

**तालिका सभापती** : सभागृहाला मला विनंती करावयाची आहे. पुरवणी मागण्यांवर आणखी 10-12 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. त्याशिवाय मंत्रिमहोदयांची उत्तरे होतील. आपण कामाचे असे ओव्हर लॅपिंग करु नये. माननीय सदस्यांनी चर्चा पुढे सुरु करावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत कामकाजाच्या वेळेसंबंधी चर्चा झाली होती. रोज रात्री 10 वाजेपर्यंत बसणे बरोबर नाही. अधिवेशनाचा कालखंड कमी करावयाचा आणि रोजच्या कामकाजाचे तास वाढवावयाचे हे योग्य नाही अशी चर्चा झाली होती. चर्चेअंती सभागृहाचे कामकाज संध्याकाळी 6 वाजेपर्यंत घेण्याचे ठरले होते. माननीय उपसभापतींसमोर सुध्दा मी यासंबंधीचा उल्लेख केला होता. त्या चर्चेच्या अनुषंगाने सभागृहाचे कामकाज 6 वाजेपर्यंत संपवावे अशी सर्व माननीय सदस्यांनी सूचना केली आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदया, महिलांना संध्याकाळी 7 वाजेपर्यंत घरी पोहोचता यावे यादृष्टीकोनातून कोर्टाने सुध्दा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे ही चर्चा उद्या घेण्यात यावी.

**तालिका सभापती** : मला आपल्या सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. आज सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजता सुरु झालेली आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविलेले कामकाज संपवावयाचे असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य करावे. त्यामुळे सभागृहाची वेळ एक तासाने वाढवू या.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, हे शासन शेकडो वर्षे राहणार आहे, त्यामुळे सरकारला कशाची घाई आहे ?

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आजच्या यादीमधील ब-याच सन्माननीय सदस्यांना मागण्यांवर बोलावयाचे आहे. आजच्या आणि उद्याच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला 19 मंत्र्यांची उत्तरे व्हावयाची आहेत. उद्या इतके कामकाज कसे काय शक्य होणार ?

श्री.दिवाकर रावते : हे सरकार अवाढव्य खर्च करीत आहे, वाहयात खर्च करीत आहे आणि त्या खर्चाला सभागृहाची परवानगी मागत आहे.

श्री.अरविंद सावंत : उद्या सकाळी 11 वाजता सभागृहाची बैठक घ्यावी.

**तालिका सभापती** : सकाळी 11 वाजता बैठक सुरु केली तरी उद्याचे संपूर्ण कामकाज संपणार नाही.

डॉ.सुनील देशमुख : एखाद्या दिवशी अपवाद म्हणून अधिक वेळ बसून काम करण्याचे कामगार सल्लागार समितीच्या बैठकीत ठरले आहे.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : वेळ पडल्यास अधिवेशनाचा कालावधी वाढवावा. परंतु बैठक सायंकाळी 6.00 वाजता स्थगित करावी असे आम्ही कामकाज सल्लागार समितीमध्ये सांगितलेले आहे.

**तालिका सभापती** : सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षाता घेता सभागृहाची आजची बैठक मी स्थगित करते.....

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदय, आपण सभागृहाची बैठक स्थगित करण्यापूर्वी मला एक सूचना करावयाची आहे. या सदनामध्ये असा निर्णय घेण्यात आला होता की, अधिवेशन कालावधीमध्ये कोणत्याही विधेयकाच्या संदर्भातील संयुक्त बैठक घेतली जाणार नाही. असे असताना आम्हाला उद्याच्या बैठकीचे निमंत्रण आलेले आहे.

**तालिका सभापती** : तातडी असल्यामुळे ही बैठक बोलावलेली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 18.3.2008 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 11.40 वाजेपर्यन्त विशेष बैठक होईल. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 6 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 18.3.2008 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही